प्रशान्त निर्वाण

१६६१
म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं क्र.

REFBK-0011638

३८६०२

१२।८।६५

ना. शा.

७२४९

With the compliments of
the Director of Publicity,
Government of Maharashtra.
Sachivalaya, Bombay 32.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नोंद दि ........

# भगवान् श्रीनित्यानंद

: निवेदक :

बाबूराव अनाळकर

REFBK-0011638

किंमत २ रुपये

● प्रकाशक :

बाबूराव अर्नाळकर,
अभ्यंकर बिल्डिंग, स्लेटर रोड,
ग्रँटरोड, मुंबई ७.

● प्रथमावृत्ति एप्रिल १९६१

● सर्व हक्क प्रकाशकाधीन.

● मुद्रक :

चिंतामण रघुनाथ देसाई,
न्यू भारत प्रिंटिंग प्रेस,
६, केळेवाडी, गिरगांव, मुंबई ४.

**RAJBHAVAN**
Maharastra Governor's Camp.

# FOREWORD



Having learnt of the health-giving properties of the waters at Vajreshwari near Ganeshpuri in the district of Thana (Maharashtra State), I went towards the end of February, 1960, to take baths in the hot springs there, and stayed at the clinic of Dr. (Mrs.) Kothawala. I found these very refreshing, and I felt very much better for the visit.

There I learnt of Swami Nityanand who has taken up his residence in the neighbourhood, and attracts to himself large numbers of men and women who come to him for inspiration and spiritual peace. At the pressing desire of some local citizens, I also went up to see Swamiji

The Swamiji originally came from Kerala, but now lives at Vajreshwari. I was happy to find him a very human person without any self-righteous unction, that is not unusual with the general run of Swamis, and which

keeps so many persons away from them or even have prejudices against them. I had a pleasant chat with him, and came away with the feeling that his influence is all for the good on his admirers and devotees.

The Swamiji's followers credit him with power for performing miracles. I had no occasion to see any, and so I am in no position to say anything on the subject. Shri Baburao Arnalkar has written a biography of Swamiji in Marathi; and since I had seen the Swamiji, he is anxious that I should write a few words as a foreword to his book. I am therefore doing so.

Unlike others, I am not averse to the institution of Swamis, and feel that they can do much good work by spreading knowledge among the public of both ancient and modern lore. Their influence is very much greater than that of the ordinary intellectual because the mode of their lives is in consonance with the ideal that the generality of our people have for a teacher, and also because everyone can go to them, without the observance of the usual rules and the payment of the usual fees prescribed for those who want to study at a modern college or university.

I hope that this book will enable many more persons to avail themselves of the opportunities that the presence of Swami Nityanand affords, and that their contacts with him would be beneficial to them in every way.

April 16, 1961 }

Sri Prakasa
Governor of Maharashtra.

# पुरस्कार



आपल्या रहस्यपूर्ण कथानकांकडे गेली कित्येक वर्षे मराठी वाचकवर्गाला ज्यांनी आकृष्ट करून ठेवलें आहे त्या श्री. बाबूराव अर्नाळकरांच्या प्रभावी लेखणींतून आज एका महान् संतांचें चरित्र रेखाटण्यांत आलें आहे, हें पाहून कोणालाहि आनंद होणें सहाजिक आहे. मराठी वाचकवर्गाला श्री. अर्नाळकर माहीत ते केवळ रहस्यकथा लेखक म्हणूनच. आजवर त्यांनीं अगणित रहस्य-कथा सहजतेने लिहिल्या आहेत आणि गंमत अशी की संत-चरित्र-लेखन हा वाङ्मयप्रकार त्यांच्या आजवरच्या लेखनाशी सर्वस्वी विसंगत असूनहि त्यांनी श्री. नित्यानंद स्वामींचें चरित्र एखाद्या खंद्या चरित्र लेखकाइतकेंच सहजसुलभतेनें लिहिले आहे हें विशेष. वास्तवतेंत घडूं शकण्यासारखी रहस्यें प्रथम कल्पनेनें निर्माण करावयाची आणि अत्यंत खुबीने त्या रहस्यांचा उलगडा करावयाचा हा श्री. अर्नाळकरांचा व्यवसाय. मला वाटतें, म्हणूनच श्री. नित्यानंद स्वामींसारख्या वरवर 'वेड्या' भासणाऱ्या व्यक्तीच्या जीवनांतील परब्रह्ममयी पण सत्यमय 'रहस्यांचा' त्यांना चांगला उलगडा करतां आला आणि गुरूदेव हा श्री दत्तात्रेयांचा मानला जाणारा आधुनिक अवतार त्यांनीं सर्व वाचकवर्गाला आपल्या कथनशैलीद्वारें चित्रित केला आहे. योग्यांच्या चरित्रांतील चमत्कार कथनामुळें 'सत्य' आणि 'शाश्वत' बाजूला राहून बहुधा अंधश्रद्धेलाच फार मोठा वाव मिळतो असें आपल्याला सर्वत्र दिसून येतें. या चरित्रांत देण्यांत आलेल्या तपःसामर्थ्यानें परब्रह्माचा चिदानंदमयी साक्षात्कार अनुभवून भक्तांना त्याचा आनंद देणाऱ्या एका परमेश्वरी अवताराच्या ह्या लीला म्हणजे मनःशांतीची गीताच होय असें क्षणभर वाटतें. याला कारण म्हणजे केवळ जगाला भोंदविण्यासाठीं केलेले हे चमत्कार नाहींत हें होय. तर ह्या चमत्कारांमुळें अनेक संसार उभे राहिले आहेत. ही अनुभवाची गाथा लेखकानें बुद्धिवादाच्या निकषावर घासून, पारखून नंतर उद्धृत केलेली आहे असे समग्र वाचनानंतर म्हणावेसें वाटतें.

परमतत्वाशीं समरस होऊन देखील 'रंजल्या गांजलेल्यां'ना 'आपुलें' म्हणणाऱ्या थोर सत्पुरुषांची महती केव्हांहि अलौकिकच ठरेल पण बहुतांशी त्यांच्या भोंवती निर्माण केल्या जाणाऱ्या आभासात्मक व काल्पनिक वलयांमुळें त्यांच्या या आगळेपणाला कमीपणा प्राप्त होतो. याला कारण म्हणजे त्यांच्या भोंवती जमणाऱ्या अत्यंत भोळ्या भक्तांची अतिशयोक्त कल्पना व चरित्र लेखकाची केवळ रहस्यांकडे झुकण्याची अनिवार इच्छा. या प्रवृत्तींना टाळण्याचा प्रस्तुत ग्रंथांत लेखकाने प्रामाणिक प्रयत्न केला आहे. एकंदरीत हें चरित्र महागुणांनींच भरलेलें आहे असें म्हणावें लागेल.

एक वेळ अशी येईल कीं त्यावेळीं प्रलय होऊन ही पृथ्वी नाश पावेल आणि त्यानंतर तो जगन्नियंता पुनश्च या चराचरसृष्टीची मांडणी करील असें पुराणांतरी वचन आहे. ह्या अणू आणि परमाणूंच्या आंदोलनांचा विचार करीत असतांना क्षणभर वाटतें कीं :पुराणांत वर्णिलेला तो प्रलयकाल आता दूर नाहीं. त्यावेळीं काय होईल याचा विचारहि करवत नाहीं. मात्र त्यावेळीं अतिप्रगत राष्ट्रांपैकीं व मानवांपैकीं कोणीहि सहाय्य करूं शकणार नाहीं. तो प्रलय करण्याची व थांबविण्याची शक्ति एका त्या परमेश्वराचीच. पण पाश्चात्य विचारसरणीच्या प्रभावाने आपण आपल्या अनादि परंपरेला विसरून आपली श्रद्धा गमावून बसलो आहोंत. कोणत्याच प्रकारची श्रद्धा, उत्कटता आपल्यांत राहिलेली नाहीं आणि म्हणून गेली कित्येक शतकें आपणांला गुलामगिरींत खितपत पडावें लागलें. ही श्रद्धा पुनश्च निर्माण करण्यासाठीं परमेश्वराचे अवतार स्वरूप असलेल्या संतांचीं चरित्रें प्रसिद्ध होणें आवश्यक आहे. महापुरुष दृष्टीला पडले म्हणजे श्रद्धा चटकन बसते आणि या दृष्टीने पहातां हा उपक्रम स्तुत्य आहे.

चरित्राचें शेवटीं प्रत्यक्ष श्री. नित्यानंदांचे चरित्राशीं संबंध नसला तरी त्या क्षेत्राशीं संबंधित अशा भक्तांमधील शिस्तीसंबंधी लेखकाने जे कळकळीने लिहिलें आहे तें निःसंशय ग्रहणीय ठरेल. कोणत्याहि थरांतील वाचकाला व भक्ताला सहजगत्या समजेल व रुचेल अशा रसाळ व ओघवत्या भाषेंत, आधुनिक कालांत झालेल्या ह्या महापुरुषाची माहिती मराठी भाषीयांना करून दिल्याबद्दल श्री. अर्नाळकर यांना धन्यवाद.

कौन्सिल हॉल, मुंबई १.
दि. १३ एप्रिल १९६१

— स. ल. सिलम
अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ३८८०२ वि:
१२५९
१८-८-६५

# आशिर्वाद

श्रीयुत बाबूराव अर्नाळकर यांना ४७५ रहस्यकथा लिहून समाधान प्राप्त झालें नाहीं, उलट त्यांचें मन अधिकच अशान्त झालें. उद्विग्न व उदास वाटूं लागलें. आयुष्यांतील स्वारस्य नष्ट झालें. अशा स्थितींतून संत चरित्राच्या लेखनाकडे, मन ओढ घेऊं लागलें, हीच प्रेरणा श्रीसद्‌गुरु नित्यानंदांकडून आली. अंतरबाह्य कायाकल्पच झाला. त्यांतील हें पहिलें सुमन श्रीसद्‌गुरु नित्यानंदचरणीं अर्पण होत आहे.



साधुचरित्र फार गहन आहे, शब्दानें त्याचें वर्णन करता येण्यासारखें नाहीं, सिद्धपुरुष व्यवहारांत चमत्कारिक वागत असलेले दिसतात, ते महान लहरी असतात, त्यांचें इहलोकचें चरित्र लोकविलक्षण व अलौकिक असलें तरी ते केवळ लोककल्याणाकरितां असतें.

प्रस्तुत लेखनांतील भाषा सरळ, सुबोध व अंतःकरणावर छाप पाडणारी आहे. ह्यांत जरी तत्त्वज्ञानाचें विवरण नसलें तरी हें चरित्रात्मक असल्यामुळें त्यांत परमार्थासंबंधीं विविध विषय सहज ओघानें सूचित केले आहेत, त्यामुळें ग्रंथ सर्वांग सुंदर झाला आहे.

लेखनांतील मनोहरपणा, सौन्दर्य व सरसता सद्‌गुरु श्रीनित्यानंदांच्या समीप पोहोंचण्याची अधिकारपरत्वें जिज्ञासा उत्पन्न करील. ह्या मधुमधु, आनंदमय व प्रेममय चरित्राचें पठण श्रद्धा व भक्तिपूर्वक केलें असतां

मनाच्या मलीन वासना दूर होऊन परमार्थाचा पुनीत मार्ग सुशोभित व सुखकर होईल.

चरितावलीच्या ध्यानावलोकानें चित्ताचे संदेह निरसन पावतील व सद्गुरु श्रीनित्यानंदचरणीं प्रेम उत्पन्न होईल. मग अंतःकरणाला शांति प्राप्त होणे सहजच आहे. सद्गुरुचरणीं प्रेम जडणें ह्यांतच सद्गुरु कृपाप्रसाद अंतरभूत आहे.

श्रीसद्गुरु श्रीनित्यानंदाच्या आशीर्वादानें श्रीयुत बाबूराव अर्नाळकर यांस व वाचकवृंदास सुख व शांति प्राप्त होवो हीच सदिच्छा.

— श्रीस्वामी मुक्तानंद

॥ श्रीगुरुदेव ॥



भगवान् श्रीनित्यानंद

॥ श्रीगुरुदेव ॥

# भगवान् श्रीनित्यानंद

## : १ : हेतुकथन



*श्रीगणेशपुरी योगभूमि पवित्र ।*
*तिथें नांदतो योगीराजा समर्थ ॥*
*तया आठवितां परमानंद प्राप्ती ।*
*नमस्कार माझा श्रीनित्यानंदासी ॥१॥*

— श्रीस्वामी मुक्तानंद

माझ्यासारखा एक रहस्यकथा लेखक पावणे पांचशें रहस्य-कादंबऱ्या लिहिल्यानंतर या चरित्र लेखनास कसा प्रवृत्त झाला हें सुरुवातीलाच सांगणें बरें !

बालपणापासून गूढवादाकडे माझें मन आकर्षित होत असे, कदाचित् त्यामुळेंच मी रहस्यकथाकार बनलों असेन. पण रहस्यकथा लेखनाशिवाय आणखी कांहीं तरी लिहावें आणि तें संत चरित्रात्मक असावें असा एक अस्पष्ट विचार कांहीं वर्षांपासूनच माझ्या मनांत घोळत होता.

शिर्डी येथील श्रीसाईनाथांच्या समाधीचें प्रथम दर्शन घेतल्यानंतर साईबाबांच्या तत्त्वज्ञानासंबंधीं कांहीं लिहावें असें माझ्या मनांत आलें. पण

त्यावेळीं उदरनिर्वाहासाठीं दरमहा चार रहस्यकथा लिहिण्यांत माझा सर्व वेळ खर्च होत होता. शिवाय तत्त्वज्ञानासारखा अवघड विषय माझ्या-सारख्या सामान्य बुद्धीच्या माणसानें हाताळणें कितपत योग्य आहे असें प्रश्नचिन्ह समोर उभे राहिल्यामुळें मला माझा तो विचार अंमलात आणतां आला नव्हता.

त्यानंतर सुमारें तीन वर्षांपूर्वी सज्जनगडचे श्रीपरमहंस श्रीधरस्वामी यांच्या दर्शनाचा सुयोग जुळून आला. मी धर्मासंबंधीं कांहीं लिहावें असें त्यांनीं सुचविलें आणि त्या प्रकारचें लेखन माझ्या हातून होईल असा मला आशीर्वादहि दिला. पण तरीहि परिस्थिति आणि परमेश्वरी इच्छा अनुकूल नसल्यामुळें मी रहस्यकथांव्यतिरिक्त कांहीं वेगळें लिहूं शकलों नाहीं.

गेल्या पांच-सहा वर्षांपासून मी गणेशपुरीच्या श्रीगुरुदेवांचें दर्शन घेण्या-साठीं अधून मधून तेथें जात होतों. गेल्या नोव्हेंबर महिन्यामधें मी माझ्या कांहीं मित्रांसमवेत तेथें गेलों असतांना श्रीगुरुदेवांचे सत् शिष्य श्रीस्वामी मुक्तानंद यांची पहिली भेट घेण्याचा सुयोग जुळून आला.

स्वामी मुक्तानंदजींबद्दल मला माझ्या एका मित्रानें कांहीं महिन्यांपूर्वी बरीच माहिती दिली होती आणि त्यामुळें त्यांच्या दर्शनाची माझ्या मनाला ओढ लागली होती. पण या खेपेला मी आणि माझे मित्र बऱ्याच गडबडींत होतों. एका तासाच्या आंत श्रीगुरुदेवांचें दर्शन घेऊन आम्हीं मुंबईस परत-णार होतों. त्याप्रमाणें आधीं सर्व व्यवस्थाहि करण्यांत आली होती. त्यामुळें या खेपेला स्वामी मुक्तानंदजींचें दर्शन घडणार नाहीं अशी गणेशपुरीला पोहोंचेपर्यंत माझ्या मनाला हुरहूर लागली होती.

पण योगायोग असा कीं, आम्हीं गणेशपुरीला पोहोंचतांच प्रथम श्रीमुक्तानंदजींचा मुक्काम असलेल्या ग्रामदेवीच्याच मंदिरांत गेलों. कारण श्रीगुरुदेवांच्या दर्शनाची व्यवस्था करण्याबद्दल मुंबईच्या आमच्या एका मित्रानें मुक्तानंदजीनांच विनंतीपत्र लिहिलें होतें आणि तें मला शेवटपर्यंत ठाऊक नव्हतें.

श्रीमुक्तानंदजींचें अकल्पित दर्शन घडून कित्येक दिवसांची माझी इच्छा पूर्ण झाल्यामुळें मला अत्यानंद होणें स्वाभाविकच होतें. पहिल्या

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८९०२ वि: ५-१-२०
लेनुकथन ....१२.५१ नों: दि: ...... १८-९-५

भेटींतच मी स्वामिजींचा दास बनलों आणि आश्चर्य असें कीं, मला आशीर्वाद देतांना श्रीधर स्वामींप्रमाणें त्यांनींहि मी कांहींतरी वेगळें लिहावें असें सुचविलें. त्याबरोबर गणेशपुरीच्या भगवंतासंबंधींच लिहावे असा मी मनांत संकल्प केला.

गणेशपुरीच्या पहिल्या भेटींतच श्रीगुरुदेवांसंबंधीं संगतवार माहिती देणारें एकहि मराठी पुस्तक नाहीं, हें माझ्या लक्षांत आलें होतें, त्यामुळें मी संकल्पिलेल्या चरित्राची भक्तांच्या आणि जिज्ञासूंच्या दृष्टीनें आवश्यकता आहे हें मला पटत होतें.

पण मुंबईस परतल्यानंतर पंधरा—वीस दिवस मी अतिशय अस्वस्थ बनलों होतों दोन शंका माझ्या मनाला भेडसावीत होत्या; एकतर चरित्र लेखनाचें अवघड कार्य माझ्यासारख्या सामान्य लेखकाला कितपत यशस्वी करतां येईल आणि दुसरें, या लेखनास आवश्यक असलेली श्रीगुरुदेवांची परवानगी मिळेल कीं नाहीं ?

तेव्हां मी पुन्हां स्वामी मुक्तानंदजींची भेट घेतली आणि त्यांना माझी विवंचना सांगितली. ते हंसले. ते म्हणाले, "श्रीगुरुदेवांची जर तशी इच्छा नसती तर तुझ्या मनांत चरित्र लिहिण्याचा विचारच आला नसता. या चरित्राची अत्यंत आवश्यकता आहे. आणि बाबांची परवानगी आहे असें समजून तूं लेखनास प्रारंभ कर."

तें ऐकून मी अतिशय आनंदित आणि उत्साहित बनलों. श्रीमुक्तानंदजी ही गणेशपुरींतील एक प्रभावी शक्ति आहे हें कदाचित् सर्वांनाच माहीत नसेल. वयाच्या आठव्या वर्षी ते शिर्डी जवळच्या येवलें येथें बालयोगी म्हणून प्रकट झाले. त्यानंतर त्यांनीं गोदावरीच्या कांठावरील जंगलांत बारा वर्षें उग्र तप करून आत्मिक शक्ति मिळविली आणि गेलीं बारा वर्षें ते गणेशपुरी येथें वास करीत आहेत. त्यांचें चरित्रहि बोधप्रद आहे, पण तो एका निराळ्या ग्रंथाचा विषय होईल.

गणेशपुरीच्या श्रीगुरुदेवांबद्दल सध्यां निरनिराळ्या भाषेंत ज्या कांहीं पुस्तिका उपलब्ध आहेत त्या श्रीमुक्तानंदजींनींच निरनिराळ्या लेखकांकरवीं लिहवून घेतल्या आहेत, त्यांचा आशीर्वाद आणि मदतीचें आश्वासन मिळाल्यानंतर मी श्रीगुरुदेवांच्या या परिचय लेखनास प्रारंभ केला.

ज्यांची परमेश्वरावर आणि धर्मावर निष्ठा आहे आणि भगवान श्रीनित्यानंदांवर ज्यांची श्रद्धा आहे अशांना सुरवातीपासूनची शक्य ती माहिती सुसंगतवार वाचावयास मिळावी हा या चरित्र लेखनाचा एक उद्देश आहे. पण मी आणखीहि कांहीं हेतू मनाशीं बाळगले आहेत.

आज सामान्य विचारी माणूसहि आजुबाजूच्या जगाकडे पाहूं लागल्यानंतर त्याला भीति वाटण्यासारखी परिस्थिति दिसते. १९१४ सालच्या पहिल्या महायुद्धापासून माणूस यंत्राच्या अधिकाधिक आहारीं जाऊं लागला आहे. आणि आज तर भयानक संहाराचीं अस्त्रें तयार करण्याची मानवांत चढाओढ सुरू आहे. देवावरील आणि धर्मावरील श्रद्धेचा हळुहळु लोप होत आहे, आपल्या मार्गांत ईश्वराची अडगळ नको असें म्हणणारे चार्वाकपंथीहि निर्माण झाले आहेत आणि सर्वत्र अशांति पसरली आहे.

हें असेंच चालू राहिलें तर जगाचें भवितव्य काय, असा प्रश्न निर्माण होतो आणि या परिस्थितींतून कांहीं मार्ग आहे काय, इकडेहि विचारी माणसाचें लक्ष जातें. त्यावेळीं गणेशपुरीच्या श्रीगुरुदेवांचा मूक–संदेश ऐकूं येतो कीं, मार्ग निश्चित आहे आणि तो भक्तीचा मार्ग आहे. या जगाची बैठकच उच्च नीतितत्त्वावर आधारलेली आहे आणि माणसाचें आत्मिक बल वाढल्यानंतर सर्व भौतिक अशांति नष्ट होऊन जगाला शांति लाभेल असा त्यांचा तो संदेश आहे.

हा त्यांचा संदेश माझी अत्यंत मर्यादित बुद्धि खर्च करून शक्य तितक्या दूरवर पोहोंचवावा हाहि या चरित्र लेखनाचा एक उद्देश आहे. अगदीं कालपरवांच आपले पंतप्रधान पंडित नेहरू महात्मा गांधींच्या निर्वाण दिनासंबंधीं बोलतांना म्हणाले होते कीं, "भारताला भौतिक सुखें तर मिळतीलच पण प्रत्येक भारतीयानें आपलें आत्मिक बल वाढविलें पाहिजे. तरच त्याला खऱ्या सुखशांतीचा लाभ होऊ शकेल."

हा चिरंतन शांतीचा मार्ग अंधारांत चांचपडणाऱ्या जगाला दाखविण्यासाठींच श्रीगुरुदेवांचा अवतार आहे हें आपणांला या चरित्र वाचनानें समजावून घ्यावयाचें आहे.

या जगांत ईश्वर आहे कीं नाहीं, हा माझ्या दृष्टीनें वादाचा प्रश्नच नाहीं.

मानवाच्या सर्व हालचालींवर नियंत्रण घालणारी एक गूढ शक्ति आहे आणि ती शक्ति म्हणजेच ईश्वर असें मी मानतों. तोच ईश्वर मानवाला नव्या सात्विक जीवनाचा लाभ देऊं शकतो, तशा जीवनानेंच माणूस स्वतः सुखी होऊन साऱ्या जगालाहि सुखी बनवूं शकेल अशी माझी श्रद्धा आहे.

मृत्यूनंतर काय होईल याचाहि मी विचार करीत नाहीं, जिवंतपणीं आपलें आयुष्य सुखासमाधानानें कसें जाईल ही जी सर्व सामान्य माणसांची विवंचना असते त्या दृष्टीनेंच मी विचार करतों. ती विवंचना दूर करण्याचा एकच मार्ग म्हणजे, ईश्वराची आराधना करणें हा आहे. ईश्वराची आराधना कशी करावी हें त्याच्या अगदीं जवळ पोहोंचलेली अधिकारी व्यक्तिच दाखवूं शकेल आणि भगवान् श्रीनित्यानंद आम्हां अज्ञान अंधःकारांत चांचपडणाऱ्यांना सन्मार्ग दाखविणारे ईश्वरी अवतार आहेत अशा भावनेनें मी त्यांच्याकडे पहातों.

हा अंधश्रद्धा पसरविण्याचा खचित प्रयत्न नव्हे, खऱ्या श्रद्धेचा मार्ग दाखविण्याचा हा प्रयत्न आहे. माणसानें मुमुक्षू बनावें आणि स्वतःच सत्य शोधून काढण्याचा प्रयत्न करावा असेंच माझें म्हणणें आहे.

या छोट्या ग्रंथांत जें कांहीं लिहिलें आहे तें सर्वच निर्विवाद सत्य आहे. श्रीगुरुदेवांना असत्य मुळींच आवडत नाहीं, तेव्हां तें त्यांच्या चरित्रांत कोठून आढळणार ! म्हणूनच जे भाविक आहेत ते हें चरित्र अतिशय श्रद्धेनें आणि आनंदानें वाचतीलच पण जे अभाविक असतील, ज्यांना परमेश्वराचें अस्तित्वहि मान्य नसेल त्यांचीहि मति गुंग व्हावी असें हें गणेशपुरीच्या महापुरुषाचें चरित्र आहे.

नास्तिकांनीं या चरित्रांत वर्णिलेल्या चमत्कारांची वाटल्यास चिकित्सा करावी किंवा ते चमत्कार गाळूनहि टाकावेत. तरी सुद्धां मानवतेचें विशाल दर्शन घडविणारा जो भाग शिल्लक रहातो तो पाहून तेहि थक्क होतील.

मी श्रीगुरुदेवांना भगवान् श्रीनित्यानंद म्हणतों, परमेश्वराचा प्रत्यक्ष अवतार मानतों. पण वाचकांनींहि तसें मानलेंच पाहिजे अशी माझी जबरदस्ती नाहीं. त्यांनीं हें शंभर टक्के सत्य असलेलें सत्चरित्र वाचावें आणि श्रीगुरुदेवांकडे कोणत्या दृष्टीनें पहावयाचें तें स्वतःच ठरवावें.

सत्य हें कल्पनेपेक्षांहि विलक्षण असतें. याचा प्रत्यय सर्व वाचकांना—मग ते आस्तिक असोत किंवा नास्तिक असोत,—या चरित्राच्या प्रत्येक पृष्ठाबरोबर येणार आहे.

आपला हा भारत देश युगानुयुगापासून संत महात्म्यांची पुण्यभूमि म्हणून प्रसिद्ध आहे. आपली भारतीय संस्कृति इतरांपेक्षां सर्वश्रेष्ठ आहे असें देशांतील सर्व विद्वान् म्हणत असतात. ती संस्कृति याच महात्म्यांनीं पुरातन कालापासून घडविली आहे.

आपण सर्व सामान्य माणसें जन्मापासून मृत्यूपर्यंत ऐहिक सुखासाठीं धडपडत असतों आणि सदा असंतुष्ट असतों. अशांना जेव्हां कोणत्याहि सुखदुःखाची, इतकेंच नव्हे तर स्वतःच्या देहाचीहि चिंता न करणारा, सदा ब्रह्मानंदांत–मग्न असणारा आणि केवळ परोपकारासाठीं आपली शक्ति आणि शरीर चंदनाप्रमाणें अहोरात्र झिजविणारा महात्मा दिसतो तेव्हां ते विचार करूं लागतात आणि खऱ्या सुखाची व्याख्या शोधूं लागतात. एकदां विचार-चक्र सुरूं झाल्यानंतर त्यांचें स्वाभाविकपणेंच देवाधर्माकडे लक्ष वळतें आणि खरें सुख कांहीं वेगळेंच आहे, आपण आतांपर्यंत जी धडपड करीत होतों तें आपलें अज्ञान होतें याची त्यांना जाणीव होते.

अज्ञानांत गुरफटलेल्या जनतेला सन्मार्ग दाखविणें, परमेश्वरावर आणि धर्मावर त्यांची नितांत श्रद्धा जडावी असा प्रयत्न करणें हेंच आतांपर्यंतच्या भारतांतील सर्व साधुसंतांचें अवतार कार्य होतें आणि गणेशपुरीचा भगवंत याच कामांत निमग्न असलेला आढळून येतो.

हें चरित्र लिहितांना मला स्वतःला अपूर्व असा आनंद झाला आहे. शेकडों रहस्यकथा लिहूनहि असा आनंद मी अनुभवला नव्हता. त्या आनंदाचा लाभ माझ्या सर्व वाचकांनाहि व्हावा हाहि या चरित्रलेखनाचा एक हेतु आहे.

श्रीगुरुदेवांनीं अनंत चमत्कार करून दाखविले आहेत. त्या सर्वांचा संग्रह करण्याचें मी टाळलें आहे. चरित्र गतिमान रहावें म्हणून आवश्यक तेवढ्याच घटना शक्यतों क्रमवारीनें मी निवेदन केल्या आहेत.

दुसरीहि एक गोष्ट या चरित्रांत आढळणार नाहीं. वाचकांना कोणत्याहि

प्रकारचें ज्ञानामृत पाजण्याचा, वेदांत शिकविण्याचा किंवा चरित्राचें रहस्य समजावून देण्याचा प्रयत्न केलेला नाहीं. कारण उघडच आहे, मी ज्ञानी नाहीं किंवा तितका अभ्यासूहि नाहीं. तेव्हां तसें करण्याची पात्रता किंवा अधिकार मला नाहीं, मी जी माहिती मिळविली ती प्रामाणिकपणें आणि साध्या मराठी भाषेंत लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.

मला एवढीच आशा वाटते कीं, हें गोड आणि रसाळ चरित्र वाचल्यानंतर आपण देशधर्माबद्दल आणि स्वतःबद्दल कांहीं विचार करूं लागाल, तेवढें झालें तरी माझ्या लेखनाचें सार्थक झालें असें मी समजेन.

● ● ●

# पूर्ववृत्त



आपला भारत देश ही संत महात्म्यांची पुण्यभूमि आहे असा उल्लेख गेल्या प्रकरणांत करण्यांत आला आहे. पुरातन कालापासून आमच्या ऋषीमुनींनीं, संत महात्म्यांनीं, सर्व जगाला सन्मार्गाचें शिक्षण देण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणूनच साऱ्या जगांतील विचारवंतांची नजर अध्यात्म्याच्या शिक्षणासाठीं पूर्वी भारताकडे वळत होती आणि आजहि तीच परिस्थिति आहे.

अनेक परकीय देशांमध्यें भारतीय संस्कृति, इतिहास आणि विशेषतः योगविषयक ज्ञान याचा अभ्यास करणारे विद्वान सांपडतील. आज रशियन भाषेमध्यें रामायण–महाभारताचें भाषांतर करण्यांत आलें आहे असें आपण ऐकतों, पण जर्मन पंडितांनीं तर गेल्या दोनशें वर्षांपासून संस्कृत, पाली, मागधी वगैरे भाषांचें अध्ययन करून भारतीय तत्त्वज्ञान आत्मसात करण्याचा प्रयत्न केला आहे.

माझ्या एका विद्वान् मित्राचें म्हणणें आहे कीं, दोन जागतिक महायुद्धानंतर अगदीं मुळांतून उखडून काढलेला जर्मनी पुन्हां अल्पावकाशांत इतर राष्ट्रांच्या तोडीनें बलवान बनतो याचें कारण भारतीय तत्त्वज्ञानाच्या संस्कारानें त्याचें आत्मिक बळ वाढलेलें आहे. म्हणूनच जर्मन लोक मृत्यूची पर्वा करीत नाहींत.

आजहि आपण पहातों, जर्मनीचे दोन भाग झालेले आहेत. एक भाग रशियन वर्चस्वाखालीं आहे, दुसऱ्यावर इंग्लंड–अमेरिकेचें वर्चस्व आहे. असें असतांनाहि जर्मन लोक कलाकौशल्याच्या आणि इतरहि सर्व क्षेत्रांत पूर्वीइतकेच आघाडीवर आहेत. माझ्या मित्राचें म्हणणें जर खरें असेल

तर आपल्या तत्त्वज्ञानांत मानवी जीवनांत शक्ति निर्माण करण्याची किती ताकद आहे याची आपणांला खुणगांठ बांधतां येईल.

सर्व जगांतील देशांत भारताचें जें आगळें वैशिष्ट्य आहे तें म्हणजे त्याचा अध्यात्मवाद. ही भारताची परंपरा प्राचीन कालापासून चालत आली आहे, आमचे पूर्वींचे भारताचे सम्राट् याच सनातन धर्माचें पालन करीत होते. आजहि आमचे राष्ट्रपति राजेंद्रप्रसाद तीर्थ-यात्रेसाठीं हिमालयांत जातात. आमचे उप-राष्ट्रपति डॉ. राधाकृष्णन् यांना तर तत्त्वज्ञानी म्हणून सारें जग ओळखतें आणि आमचे पंतप्रधान पंडित नेहरूहि भारतवासियांनीं आपलें आत्मिक बल वाढविलें पाहिजे असा उपदेश करतात.

ही जी आमची पुरातन कालापासून चालत आलेली प्रवृत्ति आहे तिची प्रेरणा आम्हांला आमच्या ऋषीमुनी, संत-महात्मे आणि योगी-यांच्यापासून मिळाली आहे. आणि ती शिकवण देणारे योगी आजहि भारतामध्यें पहावयास मिळतात.

हे सर्व महापुरुष असे आहेत कीं, ज्यांच्यांत ब्रह्मांडाला हालविण्याची शक्ति आहे. त्यांनीं तपश्चरणानें अलौकिक सिद्धि प्राप्त केली आहे, या सर्व सिद्ध पुरुषांमध्यें सज्जनगडचे परमहंस श्रीधरस्वामी, अहमदनगरचे संत मेहेरबाबा, मिथिलेचे मौनीबाबा, चरित्रबनचे खाकीबाबा आणि अयोध्येचे परमपूज्य वेदांतजी महाराज हे श्रेष्ठ आहेत.

मौनीबाबा हे सध्यां एकशें तेवीस वर्षांचे असून गेलीं शंभर वर्षें ते मौन धारण करून अंतर्मुख बनले आहेत. त्यांनीं मंत्रयोगाचें अत्युच्च शिखर गांठलें आहे.

खाकीबाबा हे महान लय-योगी आहेत. पण त्यांच्यांत असे सामर्थ्य आहे कीं, अगदीं कट्टर चार्वाकवादी त्यांच्यासमोर उभा राहिला तरी तो ईश्वराचें नामस्मरण करूं लागतो.

वेदांतजी महाराज हे तर साक्षात् भक्तियोग आहेत. त्यांच्या ज्ञानाला मर्यादाच नाहीं. मौनीबाबा आणि खाकीबाबा यांनीं अष्टसिद्धी साध्य केल्या आहेत असें त्यांच्या चरित्रांवरून दिसतें.

आपल्या भाग्यानें हे सर्व योगी आज विद्यमान आहेत आणि या योग्यांचेहि योगीराज भगवान श्रीनित्यानंद यांच्या चरित्रांत डोकावण्याचा आपण आतां प्रयत्न करीत आहोंत.

प्रभु नित्यानंदांचा जन्म कुठें झाला, त्यांचे आईवडील कोण, ते कोणत्या जातींत जन्मले याची माहिती उपलब्ध नाहीं आणि लेखकानें ती माहिती मिळविण्याचा विशेष प्रयत्नहि केला नाहीं. महापुरुषाचा परिचय करून देतांना असल्या माहितीची कांहीं आवश्यकता नसते. ऋषीचें कूळ आणि नदीचें मूळ शोधूं नये, अशी एक जुनी म्हण आहे आणि या सत्पुरुषांची गणना ऋषींतच होते.

पण एवढें मात्र म्हणतां येईल कीं, अतिशय पुण्यवान आणि भाग्यवान जोडप्याच्याच पोटीं श्रीगुरुदेवांचा जन्म झाला असावा आणि ते जन्मतःच सिद्धपुरुष असावेत.

मिळालेल्या माहितीच्या आधारें असें अंदाजानें म्हणता येतें कीं, श्रीगुरुदेवांचा जन्म सन १८९४–९६ या कालांत कधींतरी झाला असावा, अगदीं लहान वयांत ते कोइमतूर या ठिकाणीं दिसले, त्यावरून त्यांचें जन्मस्थान त्या प्रांतांतच कुठेतरी असावें असेंहि अनुमानानें म्हणतां येईल.

कोइमतूर शहरामध्यें श्री. ईश्वर अय्यर नांवाचे एक सुप्रसिद्ध आणि पहिल्या श्रेणीचे वकील होते. त्यांचा धंदा जोरांत होता, ते संसारी होते, पण त्याबरोबरच परम ईश्वरभक्त होते. ते सूर्योपासक होते असेंहि श्रीगुरुदेवांच्याच तोंडून कांहीं भक्तांना ऐकावयास मिळालें आहे.

एके दिवशीं हे ईश्वर अय्यर शहरांतील एका किराणामालाच्या दुकानांत गेले असतांना तेथें एक लहान मुलगा सुवाच्य आणि वळणदार अक्षरांत हिशेब लिहीत असलेला त्यांना आढळला. ते योगशास्त्रपारंगत असल्यामुळें अंतर्ज्ञानी होते. त्यांनीं त्या मुलाला पहातांच त्याची योग्यता ओळखली.

ते त्याला म्हणाले, 'साऱ्या जगाला ज्ञान शिकविणारा तूं, या दुकानांत कां बसला आहेस ? तूं माझ्याबरोबर चल.'

ईश्वर अय्यरनीं त्या मुलाला आपल्या घरीं नेले, तो मुलगा म्हणजेच, श्रीगुरुदेव हें सांगावयास नकोच. त्या दोघांचें एकमेकांवर फार प्रेम जडलें

आणि ते एकमेकाला गुरु मानूं लागले. आजहि श्रीगुरुदेव आपला गुरु म्हणून श्री. ईश्वर अय्यर यांचें नांव घेत असतात.

त्या ठिकाणीं असतांना ईश्वर अय्यर बाहेर गेल्यानंतर श्रीगुरुदेव जवळच्या तळ्यांत बुडी मारून अनुष्ठान करीत. आपण ईश्वर अय्यरनां फार भीत होतों, ते हांका मारूं लागले कीं, आपण चोरासारखे लपून घरांत शिरत होतों असें श्रीगुरुदेव विनोदानें कांहीं भक्तांजवळ बोलले आहेत.

श्री. ईश्वर अय्यर यांच्या घरीं अर्थातच शहरांतील इतर वकील मंडळी येत असत आणि महत्त्वाच्या खटल्यांत श्रीगुरुदेवांचा सल्ला विचारीत असत. आणि आमचे बाबा त्यावेळीं जो सल्ला देत तो अगदीं अचूक ठरत असे.

श्रीगुरुदेव तेथें कांहीं वर्षें होते. नंतर ईश्वर अय्यर यांनीं अचानक आपली जीवनयात्रा संपविली, त्यांना मूलबाळ नव्हतें, त्यांनीं आपली सर्व संपत्ति श्रीगुरुदेवांनाच अर्पण केली होती.

पण श्रीगुरुदेव थोडेच त्या संपत्तीचा स्वीकार करणार होते ! ईश्वर अय्यर यांचें निर्वाण होतांच ते हिमालयांत निघून गेले. हिमालयांतील एका झाडावर एकेच ठिकाणीं सतत सहा वर्षें रात्रंदिवस बसून त्यांनीं उग्र वानरी तप केलें असें कांहींचें म्हणणें आहे. तें बहुधा याच काळांत घडलें असणार.

हिमालयांतून ते बंगाल, ब्रह्मदेश या मार्गानें मलायांत गेले. मलायांतील भयानक अरण्यांतून हातीं काठी घेऊन पायीं प्रवास करीत असतांना वाटेंत अनेकदां वाघ त्यांच्या समोर येत असत आणि काठी खालीं ठेवतांच ते निघून जात असत असा अनुभव त्यांनीं आपल्या एका भक्ताला सांगितला आहे.

सिंगापूर येथें असतांना त्या ठिकाणीं नांगरलेली एक युद्धनौका तेथल्या सैनिकांची नजर चुकवून आपण पाहिली होती अशी एक गंमत त्यांनीं त्याच भक्ताला सांगितली आहे.

सिंगापूर येथून श्रीगुरुदेव सिलोनला गेले होते अशीहि माहिती मिळते. हा सर्व प्रवास त्यांच्या बाल्यकाळांतच घडला होता. कारण १९१२ सालीं

ते दक्षिण कानडा जिल्ह्यांतील उडपी या ठिकाणीं प्रकट झाले आणि त्यावेळीं त्यांना पहाणारे, श्रीगुरुदेव अठरा वर्षांचे असावेत असा अंदाज करतात.

अर्थात जन्मजात सिद्धपुरुषांच्या चेहेऱ्यावरून त्यांच्या वयाचा अंदाज करणें हें धारिष्ट्याचें काम आहे. म्हणूनच मी त्यांच्या वयासंबंधीं जें कांहीं लिहिलें आहे तो केवळ एक अंदाज आहे असें वाचकांनीं मानलें पाहिजे.

उडपी येथें श्रीगुरुदेव तेथल्या भक्तांना ज्या अवस्थेंत प्रथम दिसले ती चमत्कारिक होती. ब्रह्मानंदांत बेहोष होऊन ते एका घाणीच्या ठिकाणीं पडले होते आणि पहाणाऱ्यांना कुणी वेडापीर असावा असे वाटलें होतें.

त्या ठिकाणीं श्री. जोथाडी आणि डॉक्टर कॉम्रावेल नांवाचे गृहस्थ रहात होते. डॉक्टरांनीं हा वेडापीर नसून कुणी महापुरुष आहे हें ओळखलें. त्यांनी श्रीगुरुदेवांना स्नान घालून त्यांचें सर्वांग स्वच्छ केलें, त्यांना अन्न-पाणी भरविलें आणि तेव्हांपासून ते त्यांचे मोठे भक्त बनले.

अशा प्रकारें श्रीगुरुदेवांनीं मंगळूर प्रांतांत पदार्पण केल्याची माहिती मिळते. १९१२ पासून १९२८ पर्यंत श्रीगुरुदेवांचा त्या प्रांतांत संचार होत होता. त्या काळांत त्यांनीं कांहीं अभूतपूर्व चमत्कार करून दाखविले, त्याच काळांत स्वामी नित्यानंद हें नांव साऱ्या भारताला माहीत झालें, पण तो चमत्कृतिपूर्ण इतिहास आपण पुढल्या प्रकरणांत वाचावा.

• • •

## : ३ : कांचनगड



प्रत्येक संताच्या चरित्रामध्यें चमत्कार आढळतात. त्या चमत्कारामुळें सर्व सामान्य जनतेला त्यांची माहिती मिळते आणि जो तो आपापल्या बुद्धिमर्यादेप्रमाणें संतसहवासाचा फायदा मिळवितो.

मंगळूर प्रांतांत संचार करीत असतांना श्रीगुरुदेवांनीं अनंत चमत्कार करून दाखविले. सामान्य माणसाला त्यांच्या आत्मबलाची कल्पना यावी या हेतूनें कांहीं निवडक चमत्कार मी या पुढील प्रकरणांतून निवेदन करणार आहे.

सुरवातीला कांहीं वर्षें गुरुदेवांनीं कांहींच चमत्कार केले नव्हते असें त्या भागांतील माहीतगार सांगतात. त्या काळांत श्रीगुरुदेव कधींहि स्थिर नसत ते सारखे झपाट्यानें चालत असत, कुणी त्यांना अडविलें तरच ते उभे रहात. देहाची त्यांना शुद्धि नव्हती, ते कधीं अर्धनग्न तर नग्न स्थितींतहि असत, कुणी अन्नपाणी भरविलें तरच ते त्याचा स्वीकार करीत असत. त्यांना स्वतःला त्याची गरजच नसे.

त्यांना झाडावर चढणें फार प्रिय होतें. त्यांच्या हाता-पायांचीं बोटें एकमेकापासून अलग आणि ताठ असत—आजहि तीं तशींच आहेत—त्यामुळें ते हातानें उचलून कांहीं खात पीत नसत, उंच उडी घेऊनच ते कोणत्याहि झाडाच्या कितीहि उंच खांदीवर चढत असत आणि उडी घेऊनच खालीं उतरत असत.

त्या काळांत ते शरिरानें अतिशय कृश होते. त्यांना स्वतःच्या देहाची आणि इतर जगाची फिकीर नव्हती. ते नेहमीं आपल्याच धुंदींत मस्त

मराठी ग्रंथ सं.
क्रमांक ३/९.२ भगवान् श्रीनित्यानंद
७२५१

असत. त्यानंतर चमत्कारांनी सुरवात झाली आणि तें पाहून हा साक्षात् भगवंताचा अवतार आहे अशी सर्वांची खात्री पटली.

त्या भागांत श्रीगुरुदेव जरी अनेक वर्षे होते तरी ते कधींच एके ठिकाणीं फार काळ राहिले नव्हते. किंवा त्यांनीं या गांवाहून त्या गांवापर्यंतचा ओळीनें प्रवास केला नव्हता. सकाळीं ते उडपी येथें असले तर संध्याकाळीं तेथून शंभर मैलांवरील गांवांत असत. ते तो प्रवास कसा करीत हें कोडें कधींच कुणाला उलगडत नसे. त्यामुळेंच श्रीगुरुदेवांच्या तेथल्या वास्तव्याची माहिती सांगतांना तिच्यांत संगति राखणें फार अवघड आहे.

दक्षिण कानडा जिल्ह्यामध्यें कान्हनगड ऊर्फ कांचनगड नांवाचें एक इतिहासप्रसिद्ध ठिकाण आहे. त्या ठिकाणीं वल्लभन् नांवाच्या राजानें आठव्या शतकांत बांधलेला एक किल्ला आहे, त्याला सांप्रत जुना किल्ला असें नांव आहे. पुढें सन १७३१ सालांत रामवर्मा नांवाच्या राजानें होसदुर्ग ऊर्फ नवा किल्ला बांधला त्यामुळें कांचनगड हें होसदुर्ग या नांवानेंहि ओळखलें जाऊं लागले.

पूर्वी तेथून जवळच कुंथली आणि नीलेश्वर नांवाचीं दोन राज्यें होतीं, हिंदुस्थानांत व्यापारानिमित्त येणाऱ्या अरबांनीं त्या भागांतील अनेक हिंदूना बाटविलें होतें आणि ती मोपला जमात अरबांच्या नेतृत्वाखालीं नौकानयनांत फार प्रवीण झाली होती. ते मोपला भारतांतील माल कान्हनगडच्या बंदरांत जहाजांत भरून तो पश्चिमेला आफ्रिका खंडांत आणि पूर्वेला चीनपर्यंत नेऊन विकत असत.

कालांतरानें कुंथली आणि नीलेश्वर राज्यें एकत्र करून त्यांचा दक्षिण कानडा जिल्हा निर्माण करण्यांत आला आणि कांचनगड हें तालुक्याचें ठिकाण बनलें, हा इतिहास वर्णन करण्याचें हें स्थान नव्हे, पण श्रीगुरुदेवांनीं याच भागांत आपल्या अवतार कार्याची मुहूर्तमेढ रोवली म्हणून त्यासंबंधीं थोडी माहिती देणें आवश्यक वाटलें.

कांचनगडच्या पायथ्याशीं तपोवन ऊर्फ गुरुवन नांवाचें घोर अरण्य आहे. पूर्वी त्या ठिकाणीं दिवसाहि सूर्यप्रकाश प्रवेश करूं शकत नव्हता. गेल्या

पन्नास वर्षांत बरेच रान तोडण्यांत आले असले तरी पूर्वीच्या अरण्याची कल्पना करतां येईल असा बराचसा भाग अद्यापहि तेथें दृष्टीस पडतो.

श्रीगुरुदेवांनीं या गुरुबनांत वास्तव्य केले होते. ती तपोभूमि आहे. त्या ठिकाणीं श्रीगुरुदेवांनीं उग्र तप केलें व त्याच ठिकाणीं त्यांना अष्टसिद्धी प्राप्त झाल्या असें सांगण्यांत येतें. त्या वनांत श्रीगुरुदेवांची "अष्टसिद्धीशिला" पहावयास मिळते.

पण श्रीगुरुदेव उडपी येथें सन १९१२ सालीं पहावयास मिळाले. ते त्यापूर्वीं गुरुबनांत होते कीं नंतर होते हे सांगावयास माझ्याजवळ सध्या तरी आधार नाहीं. श्रीगुरुकृपेमुळें आजहि श्री. कर्तकुंजासारखी त्यांची कांहीं जुनी भक्तमंडळी त्या भागांत आहेत. त्यामुळें बरीच माहिती मिळण्याचीहि शक्यता आहे. श्रीगुरुदेवांच्या आशीर्वादानें मी पुढें-मागें निराळी आणि विस्तृत चरित्र रचना करीनहि.

श्रीगुरुदेवांनीं तपोवनांत वास्तव्य केल्यानंतर तेथून जवळच असलेल्या होसदुर्ग किल्ल्याच्या पायथ्याशीं एका प्रचंड दगडामध्यें त्रेचाळीस गुहा तयार केल्या. प्रत्येक गुहेमध्यें एका माणसाला ध्यान धारणा व्यवस्थित करतां येईल इतकी जागा आहे. हा प्रचंड दगड म्हणजे निसर्गाचा विस्मयजनक चमत्कार आहे. तो सजीव आहे. त्यांतील कोणत्याहि गुहेंत बसल्यानंतर पाषाणाचा श्वासोच्छ्वास ऐकूं येतो.

या गुहांना लागूनच श्रीगुरुदेवांनीं आश्रम बांधला आहे. आणि तेथें प्रचंड किल्लेवजा कोट तयार केला आहे. या गुहा व आश्रम यांच्यावर एक मोठी विस्तीर्ण गच्ची तयार झाली आहे व तेथेंच अत्तेरी-इत्तेरी-बत्तेरी बाबांचें स्थान निर्माण केलें आहे.

त्याठिकाणीं अंगांत असुरी शक्ति असलेली एक विलक्षण व्यक्ति होती. तिच्याशीं श्रीगुरुदेवांना घनघोर युद्धच करावें लागलें व त्या व्यक्तीला श्रीगुरुदेवांच्या हस्तें त्याच ठिकाणीं मुक्ति मिळाली. तें युद्ध प्रत्यक्ष पहाणारे बाबांचे दोन भक्त सध्याहि कांचनगड येथें आहेत. नतर श्रीगुरुदेवांनीं त्या विलक्षण पुरुषाचें जें स्थान निर्माण केलें तेंच अत्तेरी-इत्तेरी-बत्तेरी बाबा म्हणून प्रसिद्ध आहे. त्या मंदिरांत पूजा-अर्चा वगैरे सर्व विधि चालत असतात.

याच ठिकाणीं श्रीगुरुदेवांनीं धर्मशाळा बांधली. एक प्रशस्त राजरस्ता तयार केला. त्या बांधकामासाठीं हजारों रुपये खर्च झाले असतील पण त्यांनीं कुणाकडूनहि एक कपर्दिकहि घेतली नव्हती. हे पैसे त्यांनीं कुठून आणि कसे आणले हें कुणालाहि समजलें नाहीं.

कांचनगडच्या पायथ्याशीं असलेल्या तपोवनांत असंख्य नाग आणि सर्प होते. त्यामुळें तेथें जाण्यास कुणी धजावत नसे. श्रीगुरुदेवांनीं तेथें वास्तव्य करतांच ते सर्व विषारी प्राणी तेथून निघून गेले. त्यांना तेथल्या एका गुहेंत बंद करण्यांत आलें असेंहि सांगण्यांत येतें. कांचनगड येथें आपल्याला ती गुहा आजहि पहावयास मिळते.

हे सर्व विषारी प्राणी श्रीगुरुदेवांच्या आज्ञेमुळें तें स्थान सोडून गेले. पण एक अति जुनाट नाग मागें राहिला होता. श्रीगुरुदेवांनीं त्या नागाला एके ठिकाणीं अनुष्ठानाला बसविलें आणि तो नागहि अन्नपाणी वर्ज करून त्या जागेवर तीन दिवस बसून होता. त्या अवधींत हजारों स्त्री–पुरुषांनीं तेथें येऊन तो चमत्कार पाहिला. चौथ्या दिवशीं तो नाग अदृश्य झाला आणि त्यानंतर तो पुन्हां कुणालाहि दिसला नाहीं.

गुरुवनांत पाण्याची टंचाई होती. श्रीगुरुदेवांनीं तेथें पवित्र गंगेलाच आणली. तेथल्या एक गुहेंतून हा पाण्याचा प्रवाह बाहेर पडला आहे. त्या गंगेला “ पापनाशिनी ” हें नांव आहे. तेथें स्नान केल्यास सर्व पापें नष्ट होतील असा श्रीगुरुदेवांचा आशीर्वाद आहे.

या चमत्कारामुळें श्रीगुरुदेवांच्या दर्शनासाठीं भाविकांचीं गर्दी जमूं लागली आणि त्यामुळें त्यांच्याकडे इतरांचें आणि पोलिसांचेंहि लक्ष वेधलें. एक साधु त्या भयाण अरण्यांत येऊन रहातो, तेथें अनेक गुहा, धर्मशाळा बांधतो, तट उभारतो याचें सर्वांनाच आश्चर्य वाटलें आणि या साधूनें बांधकामासाठीं लागणारा पैसा कोठून आणला याबद्दल पोलीस तर्कवितर्क करूं लागले.

शेवटीं या संन्याशाची बनावट नोटा तयार करणारी कुठेंतरी गुप्त टांकसाळ असावी असें पोलिसांनीं अनुमान केलें आणि श्रीगुरुदेवांना अटक केली. जर त्यांनीं ती गुप्त टांकसाळ दाखविली नाहीं तर त्यांना तुरुंगांत जावें लागेल अशी धमकी देण्यांत आली.

श्रीगुरुदेवांनीं पोलिसांना आपली टांकसाळ दाखविण्याची तयारी दर्शविली आणि ते त्यांना घेऊन जवळच्या अरण्यांतील एका भयंकर दरींत गेले. त्या दरींतून वहाणाऱ्या पाण्याच्या प्रवाहांत मोठाल्या सुसरी होत्या.

तें दृश्य पाहून पोलिसांची गाळण उडाली. पण गुप्त टांकसाळ पहाण्याच्या मोहानें ते कसाबसा टिकाव धरून राहिले. "आतां मी तुम्हांला माझी टांकसाळ दाखवितों," असें श्रीगुरुदेव म्हणाले आणि त्यांनीं त्या सुसरींच्या डोहांत उडी घेतली.

आणि काय चमत्कार ! श्रीगुरुदेव बुडी मारून वर येत होते आणि वर येतांच प्रत्येक खेपेला कोऱ्या नोटांचीं बंडलें पोलिसांच्या अंगावर फेकीत होते ! तो विचित्र प्रकार पाहून पोलीस घाबरले. आपण एका सत्पुरुषाचा निष्कारण छळ करीत आहोंत हें त्यांच्या लक्षांत आलें. त्यांनी लोटांगणें घालून श्रीगुरुदेवांची क्षमा मागितली आणि ते तेथून पळत सुटले.

त्याच अरण्यांत आठ विषारी वृक्ष होते. त्या वृक्षांच्या केवळ स्पर्शानेंहि विषबाधा होत असे. गुरुदेवांनीं कांहीं माणसें बोलावून ते वृक्ष तोडून टाकले. केवळ त्यांच्या आज्ञेमुळेंच तीं माणसें तें काम करण्यास तयार झालीं होतीं. वृक्ष तोडल्यानंतर त्या माणसांचे हातपाय व तोंडें सुजलीं, व ते जगणार नाहींत असें पहाणाऱ्यांना वाटलें. पण श्रीगुरुदेवांनीं आजुबाजूचा पालापाचोळा जमा केला आणि तो सुजलेल्या भागांवर चोळतांच तीं सर्व माणसें खडखडीत बरीं झालीं.

या चमत्कारामुळें श्रीगुरुदेवांची खूपच प्रसिद्धि झाली. पण त्यांतूनच एक 'लंगोटी प्रकरण' निर्माण झालें. कान्हनगडच्या एका अधिकाऱ्यानें श्रीगुरुदेव नग्नावस्थेंत रहातात म्हणून त्यांच्यावर फिर्याद केली आणि त्यांना अटक करून कोर्टांत हजर केलें.

त्यावेळीं श्रीगुरुदेवांनीं स्वतःच बचावाचें भाषण केलें. ते कोर्टाला उद्देशून म्हणाले, 'मी अरण्यांत रहातों आणि माझ्याकडे कुणालाहि मी बोलावीत नाहीं, मला नग्नावस्थेंत तुम्ही शहरांत आणलें हा तुमचा दोष आहे, माझा नव्हे. आतां तुमची इच्छा असली तर मी लंगोटी नेसेन, पण ती तुम्ही नेसविली पाहिजे.'

कोर्टानें त्यांचें तें म्हणणें मान्य करून त्यांना तेथून बाहेर घालविण्यापूर्वी लंगोटी नेसवावी असा हुकूम दिला आणि पोलीस त्यांना लंगोटी नेसवूं लागले. लंगोटी नेसवावी तर कमरेला बांधलेली नाडी तुटावी किंवा लंगोटीच फाटावी असा प्रकार घडूं लागला. कित्येक तास निघून गेले, कोर्ट बंद होण्याची वेळ झाली तरी लंगोटी कांहीं नेसविली जाईना. शेवटीं श्रीगुरुदेवांची माया ओळखणारा त्यांचा एक भक्त पुढें झाला. त्यानें त्यांना नमस्कार करून लंगोटी नेसविली आणि श्रीगुरुदेव हंसतच कोर्टाबाहेर पडले.

याच भागांतील एका दुष्ट माणसानें श्रीगुरुदेवांना एके दिवशीं पकडलें आणि लोखंडाची सळई तापवून त्यांच्या ढुंगणावर तीन डाग दिले. श्रीगुरुदेव हंसतच होते, पण त्यांना त्रास देणारा तो माणूस तात्काळ तडफडून मरण पावला. आपल्या एका भक्ताला ही हकीकत सांगतांना श्रीगुरुदेवांनीं त्याला ते डागहि दाखविले होते.

श्रीगुरुदेवांचा सर्वत्र संचार होत होता हें आपणांला सांगितलेंच आहे. पडबिद्री येथें असतांना तेथें एक शेट्टी नांवाचा शिंपी होता. तो त्यांना लंगोटी पुरवूं लागला. गुरुदेवाचें आपल्या लंगोटीकडे कधींच लक्ष नसे. त्यामुळें या शिंप्याला बहुधा रोज एक नवी लंगोटी त्यांना द्यावी लागत असे आणि तोहि ती मोठ्या श्रद्धेनें देत असे.

तो शिंपी श्रीगुरुदेवांना लंगोटी पुरवूं लागल्यापासून त्याचें भाग्य उदयाला आलें आणि अल्पावधींत तो खूप श्रीमंत बनला. पुढें बाबा एकाएकी नाहींसे झाले त्यामुळें शेट्टी अस्वस्थ झाला. तो त्यांचा शोध करीत असतांना त्याला ते एका संध्याकाळीं गांवाबाहेर असलेल्या नदीवरील एरमाल नांवाच्या पुलाजवळ सांपडले आणि शेट्टीला अतिशय आनंद झाला.

शेट्टीनें श्रीगुरुदेवांनीं गांवांत चलावें म्हणून खूप आग्रह केला पण त्यांनीं त्या गोष्टीला नकार दिला. अंधार पडला तरी श्रीगुरुदेव कांहीं तेथून हलेनात तेव्हां शेट्टीनेंहि ती रात्र त्यांच्याच संगतींत घालविण्याचें ठरविलें.

थोड्या वेळानें बाबा आजूबाजूला बरेच दगड पडले होते तेथें जाऊन उघड्या अंगानें जमिनीवर झोपले. शेट्टीहि त्यांचें अनुकरण करून कांहीं अंतरावर झोपला. त्याच्याहि बरोबर अंथरुण-पांघरुण नव्हतेंच आणि अणकुचीदार दगड शरिराला टोंचत असल्यामुळें त्याला झोप येईना.

मध्यरात्रीनंतर श्रीगुरुदेव अचानक उठले आणि तेथून अडीच–तीन मैलावर असलेल्या मुगल्या पहाडाकडे जाऊं लागले. शेट्टी जागाच होता, तोहि ते इतक्या अपरात्रीं कुठें जातात हें पहाण्यासाठीं त्यांच्यामागून जाऊं लागला.

श्रीगुरुदेव फार झपाट्यानें चालत होते, जणूंकाय त्याना कुणाला तरी भेटायला जायचें होतें. आणि त्यांना ती भेटीची वेळ साधायची होती. त्यांच्या मागून कांट्याकुट्यांतून आणि दगडांतून धांवताना शेट्टी हैराण झाला. शिवाय ते मुगल्या पहाडाकडे जात आहेत असें दिसून येताच त्याच्या छातीत धडकीच भरली होती. त्या ठिकाणीं श्वापदांची तर भीति होतीच पण त्याबरोबरच तेथें चोर दरोडेखोरांचीहि वसति असल्यामुळें त्याठिकाणीं दिवसाउजेडीहि जाण्यास कुणी धजत नसे.

आपल्या मागून कुणी येत असावे हें कदाचित श्रीगुरुदेवांच्या लक्षांत आले नसावे किंवा त्यांनी त्या गोष्टीची पर्वा केली नसावी. मुगल्या पहाडावरील जंगलांत शिरल्यानतर श्रीगुरुदेव एका झाडासमोर उभे राहिले आणि त्याच वृक्षावरून रामभक्त हनुमानजी खाली उतरले.

बऱ्याच दिवसांनी भेटणाऱ्या दोघां मित्रांप्रमाणें हनुमानजी आणि श्रीगुरुदेव त्याच झाडाखालीं बसून गप्पागोष्टी करूं लागले. शेट्टीहि कांहीं अंतरावर उभा राहून तो अद्भुत प्रकार पहात होता. कांहीं वेळानें त्यांचें बोलणें संपलें, हनुमानजी झाडावर चढून अदृश्य झाले आणि श्रीगुरुदेव मागे परतले.

त्यावेळीं त्यांनी शेट्टीला पाहिलें आणि ते म्हणाले, "खरे म्हटलें तर तू माझ्यामागून यायला नको होते, मी तुला एक गोष्ट बजावितो ती नीट लक्षांत ठेव, तू जें पाहिलेंस त्यासंबंधीं इतर कुणाजवळहि वाच्यता करूं नकोस, तू तसें केले नाहींस तर परम सुखी होशील. पण केलेस तर तुझा सर्वनाश होईल.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं शेट्टी गांवात परतला, आपण प्रत्यक्ष हनुमंतांचें दर्शन घेतले ही गोष्ट कधीं कुणाला सांगेन असें त्याला झाले होते, पण गुरुदेवांच्या आज्ञेमुळें तो तसें करण्यास घाबरत होता. शेवटीं त्याच्यानें रहावेना आणि त्याने ती गोष्ट आपल्या बायकोला सांगितली. त्याबरोबर ती अंतर्ज्ञानी गुरुदेवांना समजली.

त्यांनी लागलींच शेट्टीची भेट घेऊन त्याची निर्भत्सना केली आणि गुरुआज्ञेचा भंग करणाऱ्या माणसाचें आपण पुन्हां तोंडहि पहाणार नाहीं असें सांगून ते निघून गेले. शेट्टीनें खूप विनवणी केली पण त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं.

त्यानंतर शेट्टीचें सर्व वैभव विलयाला गेले हें सांगावयास नकोच, अगदीं असाच प्रकार हाले-अंगडी येथील एका सावकाराच्या बाबतींतहि घडला असें सांगण्यात येतें.

श्रीगुरुदेवांनी त्या भागांत जे कांहीं केले त्याचें स्मारक आज आपणांला कांचनगड येथें पहावयास मिळते. त्यांचा तेथील आश्रम सांभाळण्याचें काम त्यांनी जनानंदस्वामीवर सोपविले आहे.

श्रीजनानंदस्वामी हे महापुरुषांच्या मालिकेंतील थोर अधिकारी आहेत. ते श्रीगुरुदत्तात्रयाचा अवतार आहेत. त्यांनी श्रीक्षेत्र गाणगापूर येथें उग्र तप करून योगसामर्थ्य संपादन केले आहे. गाणगापूर येथें जाणाऱ्या कांहीं भक्तांना स्वप्नांत श्रीदत्तात्रयांचा दृष्टांत झाला आहे कीं, जर आपले प्रत्यक्ष दर्शन घ्यावयाचे असले तर त्यांनी कांचनगड येथे जावे.

श्रीजनानंदस्वामी यांनीं तपसाधना पूर्ण केल्यानंतर अमुक ठिकाणीं तुला ईश्वराचे प्रत्यक्ष दर्शन घडेल असा त्यांना साक्षात्कार झाला होता व त्याठिकाणी गेल्यानंतर त्यांना श्रीगुरुदेवांचें दर्शन घडले होते. जनानंद स्वामींचीहि श्रीगुरुदेवांनी अनेक प्रकारे सत्वपरीक्षा केली आहे व नंतर कांचनगड येथील आपला आश्रम त्यांच्या स्वाधीन केला आहे.

श्रीगुरुदेवांच्या पादस्पर्शानें पावन बनलेल्या कान्हनगड-ऊर्फ कांचनगडचा असा हा संक्षिप्त इतिहास आहे.

• • •

## : ४ : मंगळूर, मुलकी आणि कुंबला



मंगळूर प्रांतांत श्रीगुरुदेव संचार करीत असतांना त्यांनीं अनेक चमत्कार करून दाखविले. त्यांतील एकहि चमत्कार केवळ स्वतःच्या सामर्थ्याचा प्रभाव दाखविण्यासाठीं नव्हता. अनाथ अपंगांना अन्नदान, वस्त्रदान देण्यासाठीं, व्याधिग्रस्तांना रोगमुक्त करण्यासाठीं, भक्तांच्या मनोकामना पूर्ण करून त्यांना भक्तिमार्गाला लावण्यासाठींच हे सर्व चमत्कार होते.

श्रीगुरुदेव धर्मप्रसारासाठीं प्रवचनें देत नव्हते. उलट ते क्वचितच, लहर लागली तरच चार शब्द बोलत होते पण केवळ त्यांच्या दर्शनानेंच अनेक अभाविक भाविक बनत होते आणि त्यांच्या मूक व्याख्यानानेंच असंख्य लोक धर्माकडे व त्यामुळेंच परमेश्वराकडे निष्ठेनें पाहूं लागत होते.

आतांपर्यंत ज्या ज्या ठिकाणीं त्यांचें पवित्र पाऊल पडले तेथें त्यांनीं जात-पात, स्पृश्यास्पृश्य असा कोणताहि भेद न बाळगता व सोवळ्याओवळ्याचे भलतेच स्तोम न माजवितां त्यांच्या जवळ धांव घेणाऱ्याचें जीवन सुखी केलें आहे.

देवादिकांना आणि संत महात्मानाहि कांहीं छंद असतात असे आपण त्यांची चरित्रें वाचतांना पहातो. आमच्या बाबांनाहि असाच एक विलक्षण छंद आहे. ते ज्या ठिकाणीं जातील तेथील बालकांना एकत्र करून त्यांना खाऊ वाटणें हा तो छंद होय. आतां गणेशपुरी येथें कायम वास्तव्य केल्यानंतर तर त्यांनीं तेथें एक बालभोजनगृह स्थापन केले असून तेथें रोज

कमींतकमीं हजार मुलांना मोफत भोजन दिलें जातें. त्याशिवाय त्यांच्या दर्शनासाठीं जाणाऱ्या प्रत्येक लहान मुलाला खाऊ देणें हा त्यांचा नित्य परिपाठ आहे.

परमेश्वराला फुलें आणि मुलें फार आवडतात. आमच्या गणेशपुरीच्या भगवंताचें दर्शन घेणारे भाविक त्यांना फुलें अर्पण करतात. त्यामुळें त्यांचें चित्त प्रसन्न होत असणारच पण मुलें म्हणजे बाबांचा जीव कीं प्राण आहे. मंगळूर प्रांतांत फिरत असतांनाहि ते जातील तेथें त्यांच्याभोवती मुलें गोळा होत असत व ते त्यांना नानाप्रकारचा खाऊ वाटीत असत.

श्रीगुरुदेव धर्मस्थळी गेले तेव्हां तेथल्या कर्मठ ब्रह्मवृंदांनी त्यांना प्रथम कडवा विरोध केला. या कर्मठ ब्राह्मणांच्या हातून आतांपर्यंत एकहि संत-महात्मा सुटलेला नाहीं. संत ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, गोराकुंभार, चोखा महार इतकेंच नव्हे तर रामदास आणि तुकाराम यांचाहि या ब्राह्मणांनी छळ केला आहे. तेव्हां श्रीगुरुदेवच त्याला अपवाद कसे ठरणार ?

हा शिवाशिव न पाळणारा, देवळे बांधून देवासमोर कधींहि ध्यानस्थ न बसणारा, सर्वांना सारखेंच लेखून जवळ करणारा अवलिया, पुरातन भागवत धर्माचा विध्वंसक आहे अशा अज्ञानि कल्पनेनें त्यांनीं त्यांचा नानाप्रकारें छळ केला. पण या शांतिसागर परमहंसानें हंसतच तीं सर्व अरिष्टें पचविलीं व तो आपल्या नेहमींच्या कार्यांत दंग राहिला.

श्रीगुरुदेवांच्या अनेक लीला पाहून हा साक्षात् भगवंताचा अवतार आहे हें पुढें त्या कर्मठांच्या लक्षांत आले आणि ते सर्व श्रीगुरुदेवांना शरण गेले इतकेंच नव्हे, तर त्यांच्यांतील कांहीं त्यांचे एकनिष्ठ सेवक बनले.

मंगळूर येथें श्रीगुरुदेव प्रथम आले तेव्हां ते रस्त्यावरून फिरत असतांना पोलिसांनीं त्यांना पकडलें. चौकशी करता ते कांही कामधंदा न करता रात्रंदिवस भटकत असतात असें आढळून आले व या वेड्यपिराला मोकळा सोडणें जनहिताच्या दृष्टीनें धोक्याचें आहे अशा कल्पनेनें पोलिसांनी त्या ‘ वेड्या ’ला तुरुंगांत बंद केलें.

पण कांहीं तासांच्या आंतच श्रीगुरुदेव शहराच्या दुसऱ्या भागांत फिरत आहेत असें पोलिसांना दिसलें. वेडा तुरुंग फोडून बाहेर पळाला असावा अशा कल्पनेनें ते तुरुंगाकडे धांवले पण श्रीगुरुदेव शांतचित्तानें कोठडीत बसले आहेत असें त्यांना दिसलें. एकाच वेळी एकच व्यक्ति, तुरुंगांत आणि तुरुंगाबाहेर असावी याचा अर्थच ते परमेश्वरी अवतार आहेत अशी पोलिसांची खात्री पटली व त्यांनी त्यांना तत्काळ बंधमुक्त केले व ते पुन्हां कधीहि त्यांच्या वाटेला गेले नाहींत.

पोलिसांप्रमाणें त्या भागांतील रेल्वे अधिकाऱ्यांचीहि श्रीगुरुदेवांनीं तारांबळ उडविली होती. एकदां श्रीगुरुदेव आगगाडीनें प्रवास करीत होते आणि त्यांना तिकीट काढण्याची आवश्यकता वाटली नव्हती. गाडी नीलेश्वर स्टेशनांत उभी राहिली आणि चेकरनें त्यांच्याजवळ तिकीट नाहीं असें पाहून त्यांना खालीं उतरविलें पण ती गाडी तेथून हलेना.

सर्व रेल्वे अधिकाऱ्यांची तारांबळ उडाली. गाडी अचानक कां बंद पडावी तें कुणालाच समजेना. तेव्हां मोठ्या इंजिनियरांना आणि तंत्रविशारदांना बोलावण्यांत आलें. त्यांनीं आपलें बुद्धिसामर्थ्य पणाला लावून खूप प्रयत्न केले पण ती रुसून बसलेली गाडी स्टेशनांतून बाहेर पडण्यास तयार होईना.

सर्व रेल्वे अधिकारी हवालदील झाले. पुढें काय करावयाचें ते कुणालाच समजेना. तेव्हां एकाची नजर प्लॅटफार्मवर ध्यानस्थ बसलेल्या गुरुदेवांकडे गेली व त्यांना गाडींतून उतरविण्यांत आलें त्यामुळें तर असें घडत नसेल ना, असें त्याला वाटलें.

त्या गृहस्थानें रेल्वे अधिकाऱ्यांना आपला तर्क सांगितला. आणि तोहि एक प्रयत्न करून पहावा अशा विचारानें त्यांनी श्रीगुरुदेवांना गाडीत बसण्याचा आग्रह केला. श्रीगुरुदेव हंसतच गाडीत बसले आणि त्यांचा पादस्पर्श होताच ती आतांपर्यंत अडून बसलेली गाडी पुन्हां वेगानें धांवत सुटली आणि तेथें हजर असलेल्या सर्वांनी श्रीगुरुदेवांच्या नांवाचा अत्यानंदानें जयघोष केला.

कासरगोड स्टेशनावर श्रीगुरुदेव गाडीतून उतरल्यानंतर दाराजवळ त्यांना तिकिटासाठीं अडविण्यांत आलें. ते आपल्याच तंद्रीत होते. आप-

णाला तिकिटासाठीं अडविण्यांत आले आहे हें जेव्हां त्यांच्या लक्षांत आले तेव्हां त्यांनीं आपल्या लंगोटीतून शेंकडो तिकिटे काढून ती त्या अडविणाऱ्याच्या अंगावर फेंकण्यास सुरवात केली. तेव्हां तेथल्या अधिकाऱ्यांनीं त्यांची क्षमा मागितली व श्रीगुरुदेवहि त्यांना हंसतमुखानें आशीर्वाद देऊन तेथून निघून गेले.

या रेल्वेच्या बाबतींत त्यांनीं इतके चमत्कार केले कीं त्याचा एक वेगळा ग्रंथच तयार व्हावा. त्यांना दूर जायचें असलें आणि ते उभे असतील त्या स्टेशनावर गाडी थांबणारी नसली तर सिग्नलच पडत नसे व ते त्या गाडीत चढल्यानंतर गाडीचा प्रवास सुरू होत असे.

नीलेश्वर स्टेशनाच्या एका अधिकाऱ्यानें हे सर्व चमत्कार लिहून ते त्रिचनापल्ली येथील मुख्य कचेरीत पाठविले आहेत व ती नोंद अद्यापहि रेल्वे अधिकाऱ्यांजवळ असण्याचा संभव आहे.

समुद्राच्या पाण्यावरून किंवा नदीच्या प्रवाहावरून जणूंकाय जमिनीवरूनच चालत आहोंत अशाप्रकारें श्रीगुरुदेव सहज चालत असत. नदीच्या पलीकडे जाण्यास नाव नसली तर त्यांचें अडत नसे. हा चमत्कार त्या प्रांतांतील शेंकडों जणांना पहावयास मिळाला आहे. त्याबद्दल त्यांची इतकी प्रसिद्धि होती कीं प्राथमिक शिक्षणाच्या शाळांमधून सामान्यज्ञान शिकवितांना शिक्षक विचारीत, "पाण्यावरून चालणारा कोण ?" आणि सर्व मुलें एकस्वरांत उत्तर देत, "स्वामी नित्यानंद"

कांचनगडप्रमाणें मंगळूर शहरांतहि श्रीगुरुदेवांना प्रथम बराच त्रास झाला. त्यांना वेडा समजून अज्ञ माणसें त्यांच्या अंगावर धूळ–कचरा, घाण फेकीत पण ते कधींच कुणावर रागवत नसत. ते त्या ठिकाणींहि गोरगरिबांना अन्नदान करण्याचें व मुलांना खाऊ वांटण्याचें आपलें व्रत चालवीत होते.

तेथे असतांना त्यांनीं एखाद्या खोलींत स्वतःला बंद करावें आणि दार उघडावें तर ते अदृश्य झाले असावेत व शोध केल्यानंतर ते शहराबाहेरच्या कुठच्या तरी झाडावर बसलेले आढळावेत असें अनेकदां घडत असे. हा चमत्कार पहाणारी मंडळी प्रस्तुत लेखकाला भेटली आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८२०२ दि: ५-१-२००७



ते उचिला नांवाच्या खेड्यांत गेले असतांना एक स्त्री दुःखित अंतःकरणानें त्यांच्याकडे आली व तिनें आपल्या दुर्दैवाची कहाणी त्यांच्या कानांवर घातली. तिच्या अंगावरील दूध निसर्गकरणीनें विषमय बनत असे व तिचीं मुलें जगत नसत. श्रीगुरुदेवांनीं तिचीं दोन्ही स्तनें पिळून त्यांतलें विष बाहेर काढलें व त्यानंतर त्या स्त्रीची मुलेंबाळें जगून ती सुखी बनली आणि श्रीगुरुदेवांना प्रत्यक्ष परमेश्वर मानूं लागली.

मंगळूर येथें त्यांच्या कृपाप्रसादानें अनेक स्त्रियांना त्यांच्या इच्छेनुसार पुत्र वा कन्याप्राप्ति झाली. श्रीगुरुदेव अशा स्त्रियांना त्या भागांत विपुल असलेल्या तंबाखूची कच्चीं पानें खावयास देत असत. त्या स्त्रिया तीं पानें खावयास घाबरूं लागल्या तर ते त्यांना धीर देत असत व तो प्रसाद भक्षण केल्यानंतर त्यांच्या मनोकामना पूर्ण होत असत. ज्यांच्यावर त्यांचा हा अनुग्रह झाला त्यांतील कांहींना लेखकानें पाहिलें आहे.

मंगळूर शहरांत त्यांचा छळ करणारीं दुष्ट माणसें होतीं त्याप्रमाणें त्यांच्यावर प्रेम करणारीहि मंडळी होती. श्रीगुरुदेव हातानें कांहींच खात–पीत नसत हें मागें सांगितलेंच आहे. मंगळूर शहरांतील कांहीं श्रद्धावान स्त्रिया त्यांना जबरदस्तीनें पकडून प्रेमानें अन्नपाणी भरवीत असत. त्यांतील एक आतां अतिशय वृद्ध झालेली स्त्री अगदी अलिकडेच दर्शनासाठी गणेशपुरीला आली होती. श्रीगुरुदेवांना पहातांच तिच्या नेत्रांतून प्रेमाश्रूंचा पूर लोटला होता.

श्रीगुरुदेव मुलकी गांवांत गेले तेव्हां त्यांनीं तेथें एक अपूर्व चमत्कार करून दाखविला. त्यांनीं तेथें अन्नदान करण्यास सुरवात केली. जवळ पैसे किंवा इतर साधनसामुग्री नसतांना त्यांनीं सर्व गांवाला उंची पक्वान्नांचें इच्छाभोजन घातलें आणि हें अन्नदानाचें काम कित्येक दिवस अखंड चालू ठेवलें.

त्यावेळीं त्यांनीं केवळ माणसांनाच खाऊं घातलें नाहीं तर त्या गांवांतील चतुष्पाद प्राण्यांना, झाडावरील पक्ष्यांना आणि जळांतील माशांनाहि भरपूर खाऊं घातलें. तो अभूतपूर्व चमत्कार पाहून श्रीगुरुदेव हे साक्षात कैलासपति महादेवाचे अवतार आहेत व अन्नपूर्णा हात जोडून त्यांच्या सेवेला हजर आहे असें गांवकऱ्यांना वाटलें तर त्यांत नवल तें काय ?

पण हें त्यांचें महात्म्य सहन न होणारा एक दुष्ट माणूस त्या गांवांत होताच. हा दुष्ट अलवा जारण–मारण विद्येंत प्रवीण होता. तो महानीच, कपटी आणि कमालीचा उद्धट होता. निरुपद्रवी सज्जनांना नानाप्रकारें उपद्रव देणें हाच त्याचा आवडता छंद होता.

हा अलवा भोळ्या भावड्यांना फसवून मंतरेलेला तंबाखू खावयास देत असे, त्यामुळें कित्येक माणसें तडकाफडकी मरत असत तर कांहीं भ्रमिष्ट, लुळे-पांगळे बनत असत. मुल्की गांवांतील गरीब लोक या नरराक्षसाला अतिशय भीत असत.

या दुष्ट अलव्याला परगांवचा कुणी लंगोटीधारी साधु यावा आणि त्यानें अपूर्व चमत्कार करून गांवकऱ्यांना आपल्या भजनीं लावावें हें सहन होणें शक्यच नव्हतें. त्यामुळें त्याचें आसन डळमळित झालें होतें. त्यानें श्रीगुरुदेवांना आव्हान देण्याचें ठरविलें.

त्यानें श्रीगुरुदेवांना पाचारण केलें व तंबाखू मंत्रून तो त्यांना खावयास दिला. तें विष आहे हें त्रिकालज्ञानी भगवंताला समजत होतें पण भगवान शंकरानें हलाहल पचविलें होतें त्याप्रमाणें त्यांनीहि हांसतच तो तंबाखू गिळून टाकला.

तो प्रकार पहाणारे गांवकरी घाबरले. त्यांना अलव्याच्या तंबाखूची माहिती होती. आतां गांवांत आलेला परोपकारी साधु जिवंत रहाणार नाहीं निदान तो भ्रमिष्ट किंवा लुळापांगळा बनणार असें त्या बिचाऱ्यांना वाटलें पण श्रीगुरुदेवांची लीला अगाध होती! त्यांनी तंबाखू भक्षण केला पण त्या अलव्याच्या पोटांत दुखूं लागलें. शेवटी पोटशुळानें हैराण होऊन त्यांतच त्याचा अंत झाला.

श्रीगुरुदेव कुंबला या गांवी गेले असतांना त्यांनीं तेथेंहि सामान्य माणूस बुचकळ्यांत पडावा असा एक चमत्कार दाखविला. ते तेथें गेले तेव्हां समुद्र-किनारी अनेक बालकें खेळत होतीं. श्रीगुरुदेवांचें बालकांवर अपार प्रेम, हें आपणाला माहीत आहेच. पण त्यांच्या मनांत काय विचार आला कुणास ठाऊक, त्यांनी त्यांतील एका लहान बालकास उचललें आणि दूर समुद्रांत भिरकावले.

कुणीतरी लंगोटीधारी साधु गांवांत आला व त्यानें एका अजाण बालकाला सागरांत फेकले ही बातमी समजतांच संतापलेले गांवकरी त्यांच्या अंगावर धावून आले आणि त्यांनीं शिव्या शापांची लाखोळी वहाण्यास सुरवात केली. पण श्रीगुरुदेव हांसत स्वस्थ उभे होते.

आणि त्याचवेळीं तें लहान बालक सागरातून धांवतच बाहेर पडले व आपल्या आई-बापाकडे न जाता त्यानें श्रीगुरुदेवांनाच घट्ट मिठी मारली. ते विलक्षण दृश्य पहातांच आतांपर्यंत शिव्या देणाऱ्यांच्या नेत्रांतून आनंदाचीं आंसवें वाहूं लागली. त्यांनी श्रीगुरुदेवांचा जयजयकार करून त्यांच्यापुढे लोटांगणें घातलीं व त्यांची क्षमायाचना केली.

या अद्‌भूत प्रकारामुळें श्रीगुरुदेवाचें नांव त्या गांवांत सर्वतोमुखी झालें. पण त्या गांवांतल्या एका मलबारी पंडिताचा जळफळाट झाला. त्या पंडिताने गांवकऱ्यांवर आपला जबरदस्त पगडा बसविला होता. आपल्या प्रतिष्ठेला आतां ओहोटी लागणार अशी त्याला भीति वाटली आणि त्यानें श्रीगुरुदेवांना शिक्षा करण्याचें ठरविलें.

त्या मलबारी पंडितानें आपल्या हस्तकांकरवी श्रीगुरुदेवांना पकडलें. त्यांच्या दोन्ही हातांवर चिंध्या बांधल्या व त्यावर रॉकेल ओतून त्या पेटविल्या.

सर्व लोक भयभीत होऊन तो अघोरी प्रकार पहात होते. पण मलबारी पंडिताच्या धाकामुळें कुणाचीहि तोंडांतून ब्र काढण्याची हिंमत नव्हती. साधुपुरुषाचा अकारण छळ व्हावा हें त्यांच्यांतील सात्विक प्रवृत्तीच्या लोकांना आवडत नव्हते. पण कौरवांच्या सभेंत दुष्ट दुःशासन महासाध्वी द्रौपदीचें वस्त्र हरण करीत असतांना भीष्म-द्रोणहि जसे अगतिक बनले होते तशीच त्यांची स्थिति झाली होती.

श्रीगुरुदेवांच्या हातांना बांधलेल्या चिंध्या चांगल्या भडकल्या होत्या आणि ते खुशाल हांसत उभे होते. पण त्या चिंध्या पेटताच त्या मलबारी पंडिताच्या शरिराचा दाह होऊं लागला होता. जणुं काय त्याचेंच शरीर पेटविण्यांत आलें होतें. शरिराला बसणारे अग्नीचे चटके बसून तो कासाविस बनला होता. शेवटीं तो त्याच ठिकाणीं मृत होऊन जमिनीवर पडला. श्रीगुरुदेवांच्या हातांना यत्किंचितहि अपाय झाला नव्हता.

सज्जनांना त्रास देणाऱ्या असुरांचें निर्दाळण करण्यासाठीं परमेश्वरानें वेळो-वेळीं अवतार घेतले आहेत हें आपण आपल्या धर्मग्रंथांतून वाचतो. मुलकी गांवांतील अलवा आणि कुंबला गांवांतील मलबारी पंडित हे असुरी प्रवृत्तीचे होते, त्यांना या काळांतील असूर म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं.

या दोन मानव देहधारी राक्षसांना शासन करण्यासाठींच श्रीगुरुदेवांनी त्या गांवांत ते चमत्कार केले असें म्हणणें चुकीचें ठरेल काय ? नाहींतर बालकांवर अमर्यादित प्रेम करणाऱ्या श्रीगुरुदेवांनीं एका अजाण बालकाला उचलून सागरांत फेकलें या गोष्टीची संगति कशी लावतां येईल ?

अन्नदानामुळें अलव्याचें त्यांच्याकडे लक्ष गेलें आणि त्या बालकाला समुद्रांत फेकल्यामुळेंच मलबारी पंडितांची वक्रदृष्टि त्यांच्याकडे वळली व दोघांनीहि स्वहस्तांनी आपला मृत्यु ओढवून घेतला. कोणताहि चमत्कार कांहीं सद्हेतूखेरीज करण्यांत आला नव्हता हेंच आपणाला या प्रकरणावरून दिसून येईल.

• • •

## : ५ : बंटवाळ, उडपी आणि पावंजा



श्रीगुरुदेव सुरतकल, हुसांगडी वगैरे अनेक गांवीं भ्रमण करीत नेत्रावती नदीच्या किनाऱ्यावरील बंटवाळ नांवाच्या गांवीं गेले.

श्रीगुरुदेव ज्या गांवीं जात तेथें बहुधा एखाद्या झाडाखालीं किंवा झाडावर बसत असत आणि त्याच झाडाचीं पानें दर्शनाला येणाऱ्यांना प्रसाद म्हणून वांटत असत. पानें मिळण्याची शक्यता नसली तर जवळपासचें गवत, कच्चा तंबाखू किंवा इतर तसल्याच प्रकारच्या वस्तूंचा ते प्रसाद म्हणून उपयोग करीत असत.

बंटवाळ येथें आल्यानंतर मंगळूर व इतर ठिकाणाप्रमाणेंच तेथल्या अज्ञ रहिवाशांनीं त्यांना अतिशय त्रास देण्यास सुरवात केली. लोक त्यांना निरुद्योगी, ऐतखाऊ वगैरे विशेषणें लावीत. त्यांची भरपूर निंदा करीत, त्यांच्या उघड्या अंगावर चिखल, शेण व इतर घाण उडवीत आणि अन्य प्रकारेंहि त्यांचा छळ करीत.

बंटवाळच्या रहिवाशांनी इतका कहर केला कीं शांतिसागर श्रीगुरुदेवहि कंटाळले. एके दिवशीं ते अचानक गुप्त झाले आणि बऱ्याच अंतरावरील रानांत एकांतवासांत राहूं लागले.

पण श्रीगुरुदेव आपणांपासून दूर निघून गेले हे नेत्रावतीला आवडलें नसावें आणि महापुरुषाचा अपमान करणाऱ्या मूर्ख गांवकऱ्यांना शासन करण्याचें तिनें ठरविलें असावें. श्रीगुरुदेव तेथून निघून जातांच नेहमी शांत आणि प्रसन्न असणाऱ्या नेत्रावतीने रौद्र स्वरूप धारण केलें.

पूर्वीं कधींहि न घडलेलें अगतिक घडलें, नेत्रावतीला अकस्मात भयंकर पूर आला आणि त्या महापुरामुळें बंटवाळ गांवांतील अनेक घरांचा,

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे स्थळप्रत.
अनुक्रम ३६९०२ ..... क्रमांक ३२५१ ..... नों. दि. १८-२-६५



माणसांचा आणि पशूंचाहि नाश होऊं लागला. कधीं कल्पनेंतहि नसलेलें महा अरिष्ट अचानक कोसळतांच गांवकरी भयभीत झाले आणि प्राणभयानें सैरावैरा पळूं लागले.

माणूस सुखांत–आनंदांत असला कीं, त्याला परमेश्वराची आठवण होत नाहीं आणि तो संत माहात्म्यांकडेहि तुच्छतेनें पहातो. खवळलेली नेत्रावती जेव्हां सर्व गांवाला आपल्या उदरांत गडप करण्यासाठीं क्रोधानें धांवत सुटली तेव्हां गांवकऱ्यांना देव आणि धर्म आठवला आणि त्यांना श्रीगुरुदेवांचीहि आठवण झाली.

त्यांच्यांतील जे ज्ञाते होते त्यांनीं श्रीगुरुदेव तेथून निघून जातांच नेत्रावती खवळली या घटनांचा परस्पर संबंध जुळविला. ते शोध करूं लागले पण श्रीगुरुदेव त्यांना सांपडेनात. तेव्हां लोकांची अधिकच गाळण उडाली आणि शेवटची उपाययोजना म्हणून ते श्रींचा मनःपूर्वक धांवा करूं लागले.

त्यांना आतांपर्यंत मिळालेलें शासन पुरेसें आहे, त्यांचा अधिक अंत पाहूं नये असें श्रीगुरुदेवांना वाटलें. ते अचानक प्रकट होऊन नेत्रावतीसमोर उभे राहिले. तें दृश्य अपूर्व असेंच होतें. त्यांच्या दर्शनाबरोबर खवळलेली नेत्रावती शांत बनली आणि हळूहळू मागे हटूं लागली. पूर ओसरला, गांवकऱ्यांवरील संकट दूर झालें, नेत्रावती पुन्हां आपल्या अवखळ खळखळीनें त्यांचें गुणगान करूं लागली.

श्रीगुरुदेव उडपी येथें असतांना तेथेंहि त्यांना तेथल्या अज्ञ रहिवाशांकडून खूपच त्रास झाला होता; पण आमचे सदा ध्यानमग्न योगीराज त्यांच्यावर कधींहि चिडत नसत. शांत चित्तानें तो सर्व अपमान सहन करीत.

एके दिवशीं त्या गांवांत रथोत्सव होता. गांवांतून देवाच्या रथाची मिरवणूक चालली होती. इतरांप्रमाणें श्रीगुरुदेवहि त्या मिरवणुकींत सामील झाले आणि त्यांनीं रस्त्यावरील धूळ उचलून ती अधूनमधून त्या रथावर फेंकण्यास सुरवात केली आणि काय चमत्कार ! त्या धुलीकणांचें रूपांतर सोन्याच्या मोहरांत आणि रुपयांत झालें होतें. केवळ धूळ फेकून श्रीगुरुदेव रथावर सुवर्ण आणि रौप्य मुद्रांचा अभिषेक करीत होते !

तो अद्भुत चमत्कार पाहून त्यांच्या अंगावर शेण-माती फेंकणारे घाबरले, त्यांच्यांतील कांहींना आपल्या दुष्कृत्याबद्दल पश्चात्ताप झाला, अनेकांना जबरदस्त दहशत बसली. ते पापकृत्यें करण्यास किंवा साधुसंतांची व देवाधर्माची निंदा करण्यास घाबरूं लागले आणि त्यामुळें आपोआपच सन्मार्गाकडे वळले.

श्रीगुरुदेवांनीं त्या चमत्कारानें तेथल्या रहिवाशांना शिकविलें होतें कीं, " बाबांनो, एखाद्याच्या अंगावर धूळ फेंकणें अगदीं सोपें असतें, पण ती फेंकणाऱ्याच्याहि नाकातोंडांत शिरते, तुम्ही सन्मार्गाचें अवलंबन करून स्वतःमध्यें असें सामर्थ्य निर्माण करा कीं, ज्यायोगें सामान्य धुळीचेंहि रूपांतर सोन्या–चांदींत होईल ! "

श्रीगुरुदेव पावंजा गांवांत असतांना तेथल्या एका झाडावर रहात असत. आतांपर्यंत त्यांची कीर्ति फार दूरवर पसरल्यामुळें हजारों लोक निरनिराळे हेतू मनांत धरून फार दुरून त्यांच्या दर्शनासाठीं येत होते. श्रीगुरुदेव आपल्या परिपाठाप्रमाणें त्यांना त्याच झाडांचीं पानें प्रसाद म्हणून देत होते आणि जे श्रद्धेनें तो प्रसाद भक्षण करीत होते त्यांच्या मनोकामना पूर्ण होत होत्या.

ज्यांचा श्रीगुरुदेवांवर म्हणजेच ईश्वरावर संपूर्ण विश्वास होता त्यांच्याच पदरीं हें फळ पडत होतें. ज्यांच्या मनांत कांहीं विकल्प होते, ज्यांची श्रद्धा डळमळीत होती ते दर्शन घेऊन आणि प्रसाद भक्षण करूनहि अयशस्वी होत होते. फळाची इच्छा बाळगणाऱ्याची सद्गुरूंवर संपूर्ण श्रद्धा असायला हवी, हाच याचा सारांश आहे.

पावंजा गांवांत दर्शनासाठीं येणाऱ्या हजारों लोकांची रीघ लागली होती, त्यांतील कांहीं त्यांच्यापुढें द्रव्यहि ठेवीत असत. श्रीगुरुदेव त्या द्रव्याला स्पर्शहि करीत नसत. कुबेर त्यांच्यासमोर हात जोडून उभा असतांना त्यांना इतरांच्या धनाची जरूरीच नव्हती.

पण या दर्शनोत्सुक भाविकांमुळें श्रीगुरुदेवांना अतिशय त्रास होऊं लागला आणि ते शेवटीं कंटाळले. एके दिवशीं ते हळूच झाडावरून उडी

घेऊन खालीं उतरले आणि जवळच असलेल्या एका वृद्ध स्त्रीच्या झोपडींत शिरून तिच्या खाटेखालीं लपून बसले.

लोक त्यांचा शोध करूं लागले. एकानें श्रीगुरुदेव झोपडींत आहेत असें सांगतांच जमावाचा मोर्चा झोपडीकडे वळला. लोक झोपडींत शिरले तेव्हां श्रीगुरुदेवांनीं मागल्या दारानें पळ काढून जवळच असलेल्या मंदिराचा आश्रय घेतला आणि दाराला आंतून कडी घातली.

पण लोक आतां अगदीं वेडे बनले होते. श्रीगुरुदेवांचें दर्शन घेण्यासाठीं ते आतां इतके अधीर बनले होते कीं, त्यांनीं उत्साहाच्या भरांत तें दार तोडलें आणि ते मंदिरांत घुसले, पण त्यांना श्रीगुरुदेव तेथें दिसेनात.

चारी बाजूला दगडी भिंती आणि तें एकच दार असल्यामुळें श्रीगुरुदेव गेले कुठें, हा सर्वांच्या पुढें प्रश्न पडला. शेवटीं एकाची नजर वर गेली. तेव्हां मंदिराच्या घुमटीच्या पोकळींत श्रीगुरुदेव अधांतरीच प्रदक्षिणा घालीत आहेत असें त्याला दिसलें !

तो अद्‌भुत चमत्कार पाहून भाविकांचीं मनें गहिंवरलीं—तीं आनंदानें दाटलीं. त्यांच्या डोळ्यांतून प्रेमाश्रू वाहूं लागले आणि ते गुरुदेवांचा जयजयकार करूं लागले. ज्यांनीं भगवान श्रीनित्यानंदांची ती अवर्णनीय लीला प्रत्यक्ष नेत्रांनीं पाहिली असेल त्यांच्यासारखे धन्य तेच !

आतांपर्यंत वर्णिलेले चमत्कार पुराणकालांत घडलेले नाहींत, फार काय तर ते तीनशें वर्षांपूर्वींच्या रामदास–तुकारामाच्या काळांत घडलेले नाहींत, ते या शतकांतील आणि गेल्या पन्नास वर्षांतीलच आहेत आणि हे चमत्कार पाहिलेलीं असंख्य माणसें अद्याप हयात आहेत ही गोष्ट वाचकांनीं लक्षांत घेतली पाहिजे.

परमेश्वर नाहीं, असें जे कुणी म्हणणारे असतील त्यांना हे चमत्कार म्हणजे एक आव्हानच आहे ! योग–सामर्थ्यानें हे चमत्कार घडवितां येतात असें जरी म्हटलें तरी तें सामर्थ्य देणारी शक्ति ईश्वराचीच आहे हें मान्य करावें लागतें आणि हें सामर्थ्य ज्यांच्यांत आहे तो भगवंताचा साक्षात् अवतार आहे असेंहि मानावेंच लागेल.

पावंजा येथील या चमत्काराची माहिती त्यावेळीं त्या प्रांतांतील सर्व वर्तमानपत्रांनीं प्रसिद्ध केली होती. त्यामुळें श्रीगुरुदेवांच्या अवतारकार्याला खूपच प्रसिद्धि मिळाली आणि दूरदूरचे, परप्रांतांतीलहि भाविक त्यांच्या दर्शनासाठीं येऊं लागले.

इ. स. १९१२ पासून १९२३ सालच्या मार्च महिन्यापर्यंत श्रीगुरुदेव त्या प्रांतांत जणूं काय विद्युत्‌गतीनें संचार करीत होते, त्या काळांत त्यांनीं हजारोंना नाना प्रकारच्या संकटांतून मुक्त केलें होतें आणि सद्‌धर्माबद्दलचा विश्वास निर्माण करून त्यांना परमेश्वरावर श्रद्धा ठेवण्यास भाग पाडलें होतें. हिंदु धर्माच्या इतिहासांत ही घटना सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखी आहे.

फक्त लंगोटी नेसून स्वतःच्या अन्नपाण्याची कधींहि चिंता न करतां एक तपाहून अधिक काळ ते आपला देह झिजवीत होते, ते प्रवचनें करीत नव्हते किंवा व्याख्यानें देत नव्हते, पण केवळ त्यांच्या संचारानेंच त्यांनीं मंगळूर प्रांतांत जो अपूर्व उत्साह निर्माण केला होता त्याला साधुसंतांच्या इतिहासांतहि तोड सांपडणार नाहीं.

त्यानंतर श्रीगुरुदेव १९२३ सालच्या एप्रिल महिन्यांत प्रथमच मुंबई शहरांत आले; पण त्या संबंधींची हकीकत आपण पुढील प्रकरणांत पाहूं.

●●●

# परिभ्रमण



सन १९२३ सालच्या एप्रिल महिन्यांत श्रीगुरुदेव मुंबईस आले आणि ते त्यांचे एक जुने भक्त श्री. शंकरराव जोथाडी यांच्याकडे उतरले. वाचकांना स्मरतच असेल कीं उडपी येथें प्रथम गुरुदेव प्रकट झाले ते या जोथाडींच्याच घराजवळ.

त्यामुळें जोथाडी कुटुंबियांचा आणि त्यांचा जो संबंध जडला होता तो कायम होता. त्यावेळीं शंकरराव जोथाडी हे गांवदेवी येथील हार्वे रोडवर चन्द्रभुवन नांवाच्या इमारतींत रहात होते. श्रीगुरुदेव मंगळूर येथून आले ते तेथें उतरले. त्यानंतर सुमारें सहा महिने ते तेथेंच होते.

त्यावेळीं श्रीगुरुदेव चौपाटीवरील वाळवंटांत बसत असत आणि इतरत्रहि फिरत असत. त्यावेळीं ते हिंवतापानें आजारी होते, पण त्यांना तपासणाऱ्या डॉक्टरांची ते तारांबळ उडवीत असत. डॉक्टरांनीं त्यांना थर्मामिटर लावले कीं, पारा ११०° डिग्रीच्याहि वर चढत असे आणि डॉक्टर नाडी तपासूं लागले कीं ती बंदच पडत असे.

श्रीगुरुदेव त्यावेळीं त्यांच्या परिचयाच्या शेणाय कुटुंबियांकडेहि जात असत. श्रीगुरुदेवांच्या जुन्या भक्तांपैकीं सीताराम शेणाय हे प्रसिद्ध होते. सीताराम शेणायांच्या आजोबापासून गुरुदेव त्यांना ओळखत होते, या कुटुंबांतील मंडळी आपला आणि श्रीगुरुदेवांचा पांच पिढ्यांचा संबंध आहे असें आज अभिमानानें सांगतात.

श्रीगुरुदेव हिंवतापानें आजारी होते असें मी वर लिहिलें आहे. त्यामुळें कदाचित् कांहीं चिकित्सक वाचक प्रश्न विचारतील कीं, जर तुम्ही गुरुदेवांना

साक्षात भगवंताचे अवतार मानतां तर त्यांच्या या देहाला व्याधि-उपाधि कशा स्पर्श करतात.

श्रीगुरुदेवांसारखी व्यक्ति अवतार धारण करते तेव्हां तिचें स्वतःच्या शरिराकडे मुळींच लक्ष नसतें. आपण आतांपर्यंतच्या चरित्रावरून पाहिलें आहे कीं, श्रीगुरुदेवांनीं स्वतःच्या खाण्यापिण्याकडे किंवा शरिराकडे मुळींच लक्ष दिलेलें नाहीं; पण त्यांचें शरीर या जडसृष्टींतच वावरत असल्यामुळें त्यावर इतरांप्रमाणें निसर्गाचे नाना परिणाम होणारच.

त्यावेळीं सीताराम शेणाय हे डोंगरी येथें रहात होते. श्रीगुरुदेव त्यांच्याकडे गेले तेव्हां त्यांचें अंग तापानें भाजून निघत होतें. तेव्हां सीताराम शेणाय यांनीं त्यांची प्रार्थना केली कीं, 'बाबा, तुम्हांला इतका सडकून ताप आला आहे तेव्हां आम्हीं काय केलें पाहिजे तें सांगा.'

श्रीगुरुदेव हंसून म्हणाले, 'तुला जर माझ्या शरिराची इतकी चिंता वाटत असेल तर एक उपाय सांगतों, तळमजल्यावर दुधवाल्या भय्यानें थंड पाण्यानें एक हांडा भरून ठेवला आहे तो आणून माझ्या डोक्यावर रिकामा कर.'

तो अजब उपाय ऐकून सीताराम शेणाय बावरले; पण श्रीगुरुदेवांचा शब्द मोडण्याची त्यांची हिंमत नव्हती, त्यांनीं थंड पाण्यानें बाबांना स्नान घातलें आणि त्याबरोबर बाबांचा ताप पळाला.

श्रीगुरुदेव मुंबईंत सहा महिने होते, हें मी वर सांगितलेंच आहे. त्यानंतर ते कुणालाहि न सांगतां अचानक नाहींसे झाले. जोथाडी कुटुंबियांनीं त्यांचा खूप शोध केला पण ते कुणालाच सांपडले नाहींत. पण आपण मंगळूर येथें भेटूं असें त्यांनीं सीताराम शेणायला सांगितलें होतें आणि त्याप्रमाणें ते १९२४ सालांत त्यांना तेथें भेटले होते. यावरून श्रीगुरुदेव मुंबईंतून पुन्हां मंगळूर प्रांतीं परतले होते असें सिद्ध होतें. नंतर बहुधा सन १९२८ वर्षाच्या मार्च महिन्यामध्यें श्रीगुरुदेवांनीं मंगळूर प्रांत सोडला आणि त्यानंतर ते पुन्हां तेथें वास्तव्यासाठीं गेले नाहींत. मात्र ते १९३६ आणि १९३९ या सालामध्यें कांचनगडला अल्प भेट देऊन परत आले अशी माहिती मिळते.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथालय.
अनुक्रम ३८९०२
१२५१ नों. दि. ........



श्रीगुरुदेव तीर्थयात्रेला निघाले तेव्हां त्यांच्याबरोबर श्री. सुब्रय्या शेट्टी नांवाचे त्यांचे एक भक्त होते असें दिसतें. कारण या सुब्रय्यांच्याच तोंडून श्रीगुरुदेवांच्या तीर्थयात्रेसंबंधींची माहिती ऐकावयास मिळाली आहे.

श्रीगुरुदेव प्रथम गोकर्ण–महाबळेश्वरीं गेले असें दिसतें. तेथें ते एका प्रचंड वृद्ध नागाला पंक्तीला घेऊन भोजन करीत असत, असेंहि सांगण्यांत येतें. गोकर्ण-महाबळेश्वराहून ते फळणी सिद्धेश्वर येथें गेले व तेथून त्यांनीं रामेश्वर येथें प्रयाण केलें. तेथून ते शिवकांची, विष्णुकांची व गिरीबालाजीला भेट देऊन शैल-मल्लिकार्जुन क्षेत्रीं गेले व त्या ठिकाणीं कांहीं काळ एकांतांत ध्यानस्थ राहिले.

नंतर ते जगन्नाथपुरी, गया करीत काशी–वाराणशी येथें गेले व त्या ठिकाणीं कांहीं दिवस राहिले. तेथून अयोध्या, प्रयाग, हरिद्वार, हृषीकेश येथें जाऊन नंतर बद्रिनारायण, केदार, गंगोत्री, जमुनोत्री वगैरे हिमालयांतील तीर्थक्षेत्रांना भेट देऊन ते मानस सरोवरीं गेले.

हिमालय-यात्रा पूर्ण केल्यानंतर श्रीगुरुदेव कुरुक्षेत्राला भेट देऊन मथुरेला आले. तेथून गोकुळ–वृंदावन व अजमीर येथील पुष्करतीर्थाला भेट देऊन द्वारकेला गेले. तेथून गिरनार पर्वतावर जाऊन कांहीं दिवस ध्यानस्थ राहिले; तेथून ते सोरटीसोमनाथाच्या दर्शनाला गेले आणि प्रभास तीर्थावर स्नान करून त्यांनीं डाकोरजीचें दर्शन घेतलें. नंतर ते उज्जैन येथील महा-कालेश्वराला भेटून नर्मदा तीरावरील ओंकारेश्वरीं गेले आणि नर्मदा स्नान करून खालीं दक्षिणेकडे उतरले.

ते नाशिक-त्र्यम्बकेश्वर करून ब्रह्मगिरीवर कांहीं दिवस ध्यानस्थ राहिले. नंतर माहूरगड येथें जाऊन त्यांनीं श्रीदत्तात्रयांचें दर्शन घेतलें आणि पंढरपूर, जेजुरी, भीमाशंकर करीत ते आळंदी येथें ज्ञानेश्वरांच्या दर्शनाला गेले. असें म्हणतात कीं, त्या ठिकाणीं श्रीज्ञानेश्वरांचें आणि त्यांचें तेथल्या समाधि मंदिरांत प्रत्यक्ष बोलणें झालें.

ही तीर्थयात्रा श्रीगुरुदेवांनीं अत्यंत झपाट्यानें संपविली असावी असें दिसतें. १९२८ सालच्या मार्च महिन्यामध्यें ते तीर्थयात्रेसाठीं बाहेर पडले असें म्हणावयास बराच आधार सांपडतो आणि त्यानंतर १९२९ सालच्या फाल्गुन महिन्यामध्यें त्यांना कांहीं भक्तांनीं वज्रेश्वरी येथें पाहिलें होतें.

त्यावेळीं श्रीगुरुदेव वज्रेश्वरीं देवीच्या मंदिरासमोर तेथल्या जहागीरदाराच्या ज्या कांहीं छत्र्या–समाधि आहेत तेथेंच एका उंचवट्यावर तीन दिवस झोपून राहिले होते. त्यावेळीं मुंबईचे श्री. अनंतराव जोथाडी हे वज्रेश्वरी मातेच्या दर्शनासाठीं तेथें गेले होते. कुणीतरी साधु येऊन तीन दिवस तेथल्या उकीरड्यावर झोपला आहे असें त्यांना वज्रेश्वरीच्या पाटलानें सांगितलें.

श्री. अनंतराव कुतूहलानें तेथें गेले आणि त्यांनीं श्रीगुरुदेवांना ओळखलें. श्रीगुरुदेव त्यांच्या घरांतून १९२३ सालीं नाहींसे झाल्यानंतर अचानक त्यांना इतक्या वर्षांनीं तेथें पाहून श्री. अनंतरावांना अत्यानंद झाला. केवळ योगायोगानेंच त्यांना श्रीगुरुदेवांचें दर्शन घडलें.

श्रीगुरुदेव वज्रेश्वरीच्या या पहिल्या भेटींत तेथें तीनच दिवस राहिले होते. ते पायीं तेथें आले होते व नंतर पायींच चालत कुर्ला येथे निघून गेले.

कुर्ला येथें श्रीगुरुदेव कांहीं वर्षे रहात होते. त्यांनी तें स्थान पसंत कां करावें हें त्यांचें त्यांनाच माहीत, पण त्यांचें तेथें जें आगमन झालें तें वैचित्र्यपूर्ण होतें.

ते तेथें पोहोंचले तेव्हां पावसाळा सुरू झाला होता. त्या काळांत खाडीजवळच्या दूरवर पसरलेल्या भागांत सर्वत्र पाणी आणि ढोपरभर चिखल सांचलेला होता. श्रीगुरुदेव तेथल्या एका एकांत स्थळीं चिखलांत उभे राहिले.

वरून मुसळधार पाऊस कोसळत होता आणि श्रीगुरुदेव एकाच ठिकाणीं दोन दिवस आणि रात्री ध्यानस्थ उभे होते. त्या भागांत एक ख्रिश्चन मुलगा मासे पकडण्यासाठीं जात असे. त्यानें तें विलक्षण दृश्य पाहिलें आणि जवळच चिखलांतच एक चिमुकली झोपडी बांधण्यांत आली होती तेथें त्यांना हात धरून नेलें.

ती झोपडी अशाप्रकारें तयार करण्यांत आली होती कीं, बसावयाची जागा जमिनीपासून दोन–अडीच फूट उंचावर होती. बसावयाच्या जागेवर गवत अंथरलेलें होतें. त्या मुलानें श्रीगुरुदेवांना त्या माच्यावर बसविलें आणि तेव्हांपासून ते तेथेंच राहूं लागले.

त्यावेळी शीव येथें श्री. यशवंतराव खाडे नांवाचे एक भाविक गृहस्थ रहात होते. ते चिमा ऊर्फ जनानंदस्वामी यांचे भक्त होते. जनानंदस्वामी यांच्याबद्दल कांचनगड या प्रकरणांत माहिती आली आहे. या जनानंद स्वामींनींच, "तुझ्या भागांत एक थोर महात्मा आला आहे तेव्हां त्याला तूं आपल्या घरीं घेऊन जा," असें खाडेनां कळविलें होतें.

श्री. यशवंतराव खाडे त्या महात्म्याचा शोध करीत कुर्ल्याच्या खारटणांत गेले, तेव्हां त्यांना कुणीतरी संन्यासी पाण्याच्या मोठ्या पाईपावर बसून हाताच्या ओंजळींत धरलेलें पाणी हलवीत आहेत असें दिसलें आणि जनानंद स्वामींनीं सांगितलेला महात्मा तो हाच असें त्यांना वाटलें आणि ते धीर करून पुढें गेले.

त्यावेळीं श्रीगुरुदेवांनीं रौद्र स्वरूप धारण केलें होतें. ते यशवंतरावांच्या अंगावर धांवले, त्यांनीं त्यांना खूप शिव्या दिल्या, त्यांना तेथून हांकलण्याचा प्रयत्न केला व नंतर थोडे शांत होऊन म्हणाले, 'ही चिमा कंपनी आहे.'

त्यावेळीं जनानंद स्वामी हे चिमास्वामी म्हणून ओळखले जात होते. श्रीगुरुदेवांनींच त्यांना पुढें जनानंद असें नांव ठेवून कांचनगड येथें पाठविलें. श्रीगुरुदेव यशवंतरावांबरोबर त्यांच्या घरीं गेले तो दिवाळीचा दिवस होता आणि तो सण एका महापुरुषाच्या सान्निध्यांत साजरा करण्याचें भाग्य त्यांना लाभलें. त्यानंतर श्रीगुरुदेवांचें त्यांच्यावर प्रेम जडलें आणि तें आजतागायत कायम आहे. ते यशवंतरावांना बाबूराव या नांवानें हांक मारूं लागले. तेव्हांपासून बाबुराव या नांवानेंच ते ओळखले जातात.

त्यानंतर बरीच मंडळी दर्शनासाठीं जाऊं लागली आणि गर्दी सारखी वाढतच गेली. श्रीगुरुदेव अधूनमधून आपल्या भक्तांना भेटण्यासाठीं बाहेर पडत असत. १९३२ सालांत ते सीताराम शेणाय यांच्या घरीं भोजनास गेले होते. त्यावेळीं शेणाय हे गिरगांवांत बनाम हॉल लेनमधील पुरुषोत्तम बिल्डिंगमध्यें रहात होते. त्यावेळीं सर्वांबरोबर गुरुदेवांसाठीं पंक्तींत पान मांडण्यांत आलें आणि तेव्हांपासूनच त्यांनीं स्वहस्तानें भोजन करण्यास प्रारंभ केला असें सांगण्यांत येतें.

१९३२ सालच्या अखेरपर्यंत श्रीगुरुदेव कुर्ला येथें राहिले, नंतर अचानक त्यांची लहर फिरून ते विक्रोळी येथें मुंबई–आग्रा रोडवर एका झाडाखालीं रहावयास गेले. तेथेंहि ते आपल्या सभोंवतीं बालगोपाळांचा मेळा जमवून त्यांना खाऊ वाटत असत. तेथें कांहीं महिने राहिल्यानंतर त्यांनीं आपला तेथला मुक्काम हलविला आणि ते बोरीवली येथें जाऊन तेथल्या कान्हेरी गुंफेंत एक-दोन महिने राहिले.

त्यानंतर ते १९३३ सालामध्यें पायींच वज्रेश्वरी येथें गेले आणि आतांपर्यंत त्यांचें वास्तव्य त्याच ठिकाणीं आहे.

• • •

# : ७ : श्री क्षेत्र वज्रेश्वरी



मंगळूर प्रांतांत दीर्घ काळपर्यंत लोककल्याणार्थ संचार केल्यानंतर श्रीगुरुदेवांनीं आपल्या वास्तव्यासाठीं वज्रेश्वरीची निवड केली. तें स्थान कोणत्या प्रकारचें आहे तें आपण या प्रकरणांत पाहूं.

श्रीक्षेत्र वज्रेश्वरी हें ठिकाण मुंबईपासून सुमारें पन्नास मैलांवर असून तेथें जाण्याचे दोन मार्ग आहेत. पश्चिम रेल्वेच्या वसई स्टेशनावर उतरून एस्. टी. च्या बसनें तेथें जातां येतें, दुसरा मार्ग ठाणे-भिवंडीहून आहे. ठाणे स्टेशनावर उतरून तेथून बसनें किंवा टॅक्सीनें वज्रेश्वरी येथें जातां येतें.

हें क्षेत्रस्थान प्राचीन काळापासून प्रसिद्ध असून त्यासंबंधींची विस्मयजनक हकीकत नवनाथ चरित्रांत आढळते. अयोध्या येथें राज्य करणाऱ्या सूर्यवंशी प्रभु रामचंद्राचे कुलगुरु वशिष्ठ मुनी यांनीं इतर ऋषीजनांच्या विनंतीवरून याच ठिकाणीं त्रिचंडी-यज्ञ केला होता असा त्या ग्रंथांत उल्लेख आहे.

ती हकीकत अतिशय गंमतीची असल्यामुळें भाविकांसाठीं या ठिकाणीं ती थोडक्यांत सांगण्याचें ठरविलें आहे.

सूर्यनारायणाच्या घामाचे थेंब पृथ्वीवर पडले. त्यांतील जे टणक होते त्यांचे दोन पहाड बनले आणि द्रवबिंदूंची त्याच पहाडाजवळ एक नदी बनली असें सांगण्यांत येतें. ते दोन पहाड मंदाग्नि आणि तेजमदन या नांवानें ओळखले जातात. आणि नदीला तेजजा असें नांव पडलें होतें.

आजहि ते पहाड मंदाग्नि आणि तेजमदन या नांवानें आपणांला पहा-

वयास मिळतात. नदीच्या तेजजा नांवाचा अपभ्रंश होऊन ती आतां तानसा या नांवानें ओळखली जाते.

स्वर्गांत रहाणाऱ्या सावित्री, उमा व रमा या देवतांना सरस्वतीसह पृथ्वीवर आणण्याच्या हेतूनेंच वशिष्ठ मुनींनीं त्रिचंडी–यज्ञ करण्याचें ठरविलें होतें. आणि त्यांनीं मंदाग्नि पर्वताजवळ तेजजा नदीच्या कांठावर असलेलें अलकज नांवाचें स्थान यज्ञकार्यासाठीं नक्की केलें.

या महायज्ञासाठीं सर्व सामुग्री एकत्र करण्यांत आल्यानंतर वशिष्ठ मुनींनीं सर्व ऋषी-देवांना आपापल्या पत्नींसह तेथें बोलाविलें, या ऋषीपत्नींमध्यें श्रीदत्तगुरूंची माता महासाध्वी अनसूया पण होती.

यज्ञासाठीं आलेल्या ऋषीमुनींनीं वशिष्ठांना सहाय्य करण्यासाठीं अलकजेंतच मुक्काम केला. तें स्थान सध्यां अकरोली या नांवानें प्रसिद्ध आहे. अनसूयेसह सर्व ऋषीपत्नी तेजजा नदीच्या उत्तर तीरावर राहिल्या, त्याची निशाणी म्हणून आजहि त्या ठिकाणीं अनसूयेचें मंदिर पहावयास मिळतें.

ज्या ठिकाणीं सध्या श्रीगुरुदेवांचा निवास आहे, त्या गणेशपुरींतच यज्ञासाठीं आलेले सर्व देव राहिले होते. तो यज्ञ पहाण्यासाठीं आलेले ब्रह्मा–विष्णु-महेश हे अमर पर्वतावर रहात होते. आणि त्याच पहाडावर नवनाथांनीं श्रीदत्तात्रयासह निवास केला होता.

त्यानंतर मुसलमानी अंमलांत अमर पर्वत भ्रष्ट करण्यांत आला आणि त्याला हाजीमलंग असें नांव देण्यांत आलें. तेथल्या श्रीगुरुदत्ताच्या स्थानालाच मलंग बनविण्यांत आलें, पण त्या ठिकाणीं ब्रह्मा–विष्णु–महेशांचा गुप्त निवास आहे आणि साक्षात दत्त–निरंजन भक्तांचे मनोरथ पूर्ण करण्यासाठीं बसले आहेत असें श्रद्धावंत भाविक मानतात.

वशिष्ठ मुनींनीं यज्ञहवनासाठीं अनेक कुंडें आणि देवालयें स्थापिलीं. त्यांनीं प्रथम देवांच्या मदतीनें अकरोली येथें त्रिभुवनेश्वराची स्थापना केली. नंतर वज्रेश्वरीस त्रिपुरेश्वराचें आणि देव रहात होते त्या गणेशपुरींत श्री गणपति व सर्वेश्वर यांचीं मंदिरें बांधलीं.

नंतर त्यांनी तेजजा नदीच्या उत्तर तीरावर जेथें ऋषिपत्नी व देवपत्नी रहात होत्या त्या लिंबोलीला ऋषेश्वराचें मंदिर निर्माण केलें व जवळच

महासाध्वी अनसूयेसाठीं एक कुंड निर्माण केलें, तें अनसूया कुंड म्हणून आजहि प्रसिद्ध आहे.

गणेशपुरींतील वक्रतुंडाचें पूजन करून यज्ञभूमीसभोंवतीं महामुनी वशिष्ठांनीं आणखीहि देवतांची स्थापना केली. त्यांनीं तुंगार पर्वतावर तुंगारेश्वर, वैतरणेच्या कांठावर नागनाथ व संगमेश्वराचीं देवालयें बांधलीं.

तुंगारेश्वर, हा तर वशिष्ठ मुनींनीं भूलोकावरील कैलासच बनविला. त्यांनीं स्वर्गातून तीन गंगा आणून त्या ठिकाणीं सुंदर त्रिवेणीसंगम बनविला आणि भाविकांना वरदान दिलें कीं, जो कुणी या तपस्व्याच्या माहेर घरीं भजनपूजन करील त्याला साक्षात् महादेव प्रसन्न होईल.

पण देवेंद्र वशिष्ठ मुनीवर रागावला होता. हा आपलें महत्त्व कमी करण्याचा वशिष्ठांचा डाव आहे असें त्याला वाटलें. त्यांनीं सर्व देवांना मान दिला पण आपण देवाधिदेव असतांना आपलें पूजन केलें नाहीं तेव्हां त्यांच्या यज्ञाचा विध्वंस केला पाहिजे अशी इंद्रानें प्रतिज्ञा केली.

म्हणून प्रथम इंद्रानें यज्ञभूमींतील सर्व पाणीच शोषण केलें. पण वशिष्ठांनीं दर्भाचे बाण सोडून पाताळांतून बाणगंगा आणली आणि स्वर्गातून स्वर्गगंगा बोलाविली आणि आपले काम सुरू केलें.

तेव्हां देवेंद्रानें आधि-व्याधि पाठविल्या. त्यामुळें ऋषिमुनी हैराण झाले व यज्ञकार्यांत हाहाःकार उडाला. पण वशिष्ठांनीं तुंगार पर्वतावर नाना प्रकारच्या वनस्पति निर्माण करून सर्व व्याधि हटविल्या व उष्णकुंडें निर्माण केलीं.

त्यांनीं अलकजेंत उमा, रमा, सावित्री कुंडें, जवळच सूर्य आणि चंद्रकुंडें, तेजजा नदीच्या पात्रांत इंद्र, वरुण, वायु आणि कुबेर कुंडें निर्माण केलीं. गणेशपुरींतील सर्वेश्वरासमोर रुद्र, विष्णु आणि ब्रह्मकुंडें, तेथल्या तेजजा नदींतील वेटावर अग्नि आणि तेजकुंडें आणि नदीच्या पात्रांत देव, गंधर्व, यक्ष, किन्नर कुंडें निर्माण केलीं.

त्यांनीं ऋपेश्वरी अत्रि आणि अनसूया कुंडें त्याचप्रमाणें महेश्वराजवळ तेजमदन पर्वताच्या पाठीमागच्या बाजूला ऋषीमुनींच्या नांवानें कुंडें निर्माण केलीं, हीं एकदरींत तीनशें साठ कुंडें होतीं. कालांतरानें त्यांतील बरीच

११६३५१

नाहींशी झालीं पण मुख्य कुंडें अद्याप शिल्लक आहेत. व तीं पूर्वीच्याच नांवानें ओळखलीं जातात.

वशिष्ठमुनींनी हीं कुंडे निर्माण केल्यानंतर ऋषीमुनी, देव आपापल्या पत्नींसह त्या कुंडांत स्नान करून रोगमुक्त झाले आणि त्यांनीं यज्ञहवनास उत्साहानें सुरवात केली.

वशिष्ठमुनी आपणांस दाद देत नाहींत हें पाहून इंद्र अतिशय संतापला आणि त्यानें रागाच्या भरांत वशिष्ठांचा वध करण्यासाठी आपलें वज्रास्त्र फेंकले. तेव्हां वशिष्ठांनीं पार्वतीचा धांवा केला व तिनें तें वज्र खालीं पडण्यापूर्वींच गिळून टाकलें व त्यामुळें तिला वज्रेश्वरी हें नांव प्राप्त झालें.

तेव्हांपासून ही वज्रेश्वरी उजव्या हाताला परशुराम माता रेणुका आणि डाव्या हाताला कालिका यांना घेऊन भक्तांचे मनोरथ पूर्ण करण्यासाठीं तेथें उभी राहिली आहे.

वज्र नाहींसें होतांच इंद्राची सर्व शक्ति नाहींशी झाली. तेव्हां तो वशिष्ठांना शरण गेला व त्यांनीं देवीची विनवणी करून त्याला त्याचें वज्र परत देवविलें व इंद्र स्वर्गलोकीं परत गेल्यानंतर आपला त्रिचंडी यज्ञ पार पाडला. त्यांच्या विनंतीला मान देऊन वज्रेश्वरीनें त्याच ठिकाणीं रहाण्याचें कबूल केलें.

ब्रह्मा–विष्णु–महेश यांनीं आपल्या पत्नी मंदाग्नि पर्वताजवळ रहाणार असें पाहिल्यानंतर तेहि अमर पर्वतावरच राहिले. त्यांच्याबरोबर नवनाथांचे गुरु श्रीदत्तात्रयहि राहिले. त्या अमर पर्वताचे पुढें हाजी मलंगमध्यें रूपांतर झालें तें वर सांगितलेंच आहे.

नवनाथांपैकीं गोरखनाथ आणि मच्छींद्रनाथ यांनींहि वज्रेश्वरी येथेंच देवीच्या देवळासमोर तप करून अष्टसिद्धी प्राप्त करून घेतल्या होत्या.

परशुरामानें एकवीस वेळा निःक्षत्रिय पृथ्वी केल्यानंतर व सर्व भूमि ब्राह्मणांना दान दिल्यानंतर तोहि वज्रेश्वरी येथेंच आला होता. याचें कारण त्याच्या आईचें तें स्थान होतें व त्याचा जन्महि याच ठिकाणीं झाला होता.

परशुरामानें देवघर नांवाच्या आपल्या मातेच्या स्थानीं आपलें धनुष्य खालीं ठेवलें व एकवीस दिवसांत स्वतःसाठीं नवीन भूमि सागरांतून वर आली पाहिजे अशा निर्धारानें त्या ठिकाणीं आपल्या धनुष्याची पूजा केली होती. त्यासाठीं त्यानें वज्रेश्वरी मातेला तिच्या सख्यांसह देवघरीं बोलाविलें होतें व त्यांच्या स्नानासाठीं प्रत्यक्ष भागिरथीला तेथें आणून भार्गवकुंड स्थापन केलें होतें.

परशुरामानें एकवीस दिवसांनंतर बाण सोडला तेव्हां सागरांतून नवीन भूमि वर आली व तो तेथें रहावयास गेला. तीच भूमि परशुराम क्षेत्र ऊर्फ कोंकण या नांवानें प्रसिद्ध आहे.

आजहि वज्रेश्वरीपासून सहा मैलांवर आपणाला धनुष्यपूजनाच्या ठिकाणीं असलेलें परशुरामाचें देवालय पहावयास मिळतें. हें देवालय अतिप्राचीन असून भारतीय स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना म्हणून गणले जातें. तेथें रेणुकामातेचें स्थान व परशुरामाचा पाळणा पहावयास मिळतो व देवीसाठीं निर्माण केलेलें सुंदर भार्गवकुंडहि आपण पाहूं शकता.

परशुरामाला सहाय्य केल्यानंतर देवी आपल्या सख्यांसह पूर्वीच्या स्थानीं परतली व त्या भागांत परशुराम आला होता याची निशाणी म्हणून त्यांनीं आपल्याजवळ परशुरामाची मूर्ति स्थापन केली ती आजहि भाविकांना वज्रेश्वरीच्या मंदिरांत पहावयास मिळते.

तीनशें वर्षांपूर्वी गोधडेबुवा नांवाच्या एका भक्तानें देवीची आराधना करून तिला प्रसन्न केलें व यापुढें तूं व तुझे वंशज माझी पूजा करतील असें देवीनें त्याला वरदान दिलें. त्यापूर्वीं देवीची पद्धतशीर पूजाअर्चा होत नसे पण गोधडेबुवांनीं व्यवस्थित पूजा करण्यास सुरवात केली व तेव्हांपासून आतांपर्यंत देवीच्या पूजेचा मान गोधडेबुवांच्याच वंशजाकडे चालत आला आहे.

पेशवाईत पहिल्या बाजीरावाच्या काळांत पोर्तुगिझांनीं वसई प्रांतांतील हिंदूंचा अनन्वित छळ केला, देव-देवळें बाटविलीं, नाना प्रकारचे भ्रष्टाचार करून हिन्दूंना बाटविण्यास सुरवात केली तेव्हां पहिल्या बाजीरावानें आपले धाकटे बंधु चिमाजी आप्पा यांना सैन्य देऊन पोर्तुगिझांचा बंदोबस्त करण्यास पाठविलें.

त्यावेळी पोर्तुगीज वसईच्या भुईकोट किल्ल्यामध्यें मोठ्या बंदोबस्तानें एकत्र झाले होते. चिमाजी आप्पांनीं दोन वेळा किल्ल्यावर चढाई केली असतांना त्यांना माघार घ्यावी लागली. आपणाला अपयश घेऊन पुण्याला परतावें लागणार असें त्यांना वाटूं लागलें.

त्यांनीं वज्रेश्वरीची ख्याति ऐकली तेव्हां ते तिला शरण जाऊन त्यांनीं नवस केला कीं जर वसईचा किल्ला जिंकून मला फिरंग्यांचें उच्चाटण करण्यांत यश मिळालें तर मी तुझें मंदिर बांधीन.

देवी नवसाला पावली आणि मराठ्यांचा तिसरा प्रयत्न यशस्वी होऊन चिमाजी आप्पांनीं वसईचा किल्ला जिंकून फिरंग्यांना त्या प्रांतांतून पळ काढण्यास भाग पाडलें. तसें घडलें नसतें तर वसई-ठाणे जिल्ह्यांतच नव्हे तर सबंध कोंकणांत हिंदुधर्म नांवालाहि शिल्लक राहिला नसता आणि तेथलीं दैवतें नष्ट किंवा भ्रष्ट झालीं असतीं.

वसईचा किल्ला जिंकल्यानंतर चिमाजी आप्पांनीं प्रथम किल्ल्यांत व नंतर वसई गांवांत महादेवाचीं मंदिरें बांधलीं. नंतर पुण्याकडे परत जात असतांना वसईच्या स्टेशनापलीकडे वज्रेश्वरीच्या वाटेवर गोखिवरें गांवांत महादेवाचें एक प्रचंड किल्लेवजा मंदिर बांधलें व नंतर वज्रेश्वरी येथें मुक्काम केला.

त्या मुक्कामांत त्यांनीं नवस केल्याप्रमाणें वज्रेश्वरीचें एक सुंदर व भव्य देवालय बांधलें व त्या मंदिराच्या पायथ्याजवळ वसईच्या विजयाचें चिन्ह म्हणून एक उंच मनोरा बांधला. आज आपणांला वज्रेश्वरी येथे तेंच मंदिर व तोच विजयस्तंभ पहावयास मिळतो.

अशा प्रकारें वज्रेश्वरीला फार प्राचीन काळापासून पौराणिक व ऐतिहासिक महत्त्व आहे. श्रीगुरुदेवांनीं कायमचें वास्तव्य करण्यासाठीं हेंच ठिकाण कां निवडावें हें आतां आपल्या लक्षांत आलेंच असेल.

● ● ●

: ८ :

# वज्रेश्वरीचा कायापालट



श्रीगुरुदेव वज्रेश्वरी येथें आल्यानंतर पूर्वीं एकदां ते उतरले होते त्याच देवळासमोरच्या समाधीजवळ त्यांनीं मुक्काम केला. ते बसत होते त्या जागेला लोक उकीरडा समजत होते पण ती जागा किती पवित्र होती हें त्यांना नंतर समजणार होतें.

मच्छीन्द्रनाथ आणि गोरखनाथ हे जेव्हां वज्रेश्वरी येथें तपःसाधनेसाठीं आले होते तेव्हां ते त्याच जागीं उतरले होते म्हणूनच अंतर्ज्ञानी गुरुदेवांनीं त्या जागेची निवड केली होती. नंतर त्यांनींच त्या ठिकाणीं उभय नाथांच्या पादुकांची स्थापना केली. व तेथें एक लहानशी पर्णकुटी बांधली. आतां तेथल्या पूजेची व्यवस्था त्यांचे एक भक्त वृद्ध शंकरस्वामी पहात असतात.

या ठिकाणीं कांहीं दिवस राहिल्यानंतर श्रीगुरुदेव अलकज ऊर्फ अकरोली येथें गेले. त्या काळांत तो भाग अरण्यमय होता. श्रीगुदेव तेथें गेल्यानंतर पहाटेस चार वाजतां उष्णकुंडांत स्नान करीत असत. नंतर एखाद्या झाडावर किंवा झाडाखालीं बसून सदा ब्रह्मानंदांत तल्लीन असत. त्यावेळीं ते अंगावर एक हिरव्या रंगाची रेशमी शाल घेत असत.

या काळांत ते अकरोली ते वज्रेश्वरी फिरत असत. त्या सुमाराला श्री. हरीभाऊ तांबे नांवाच्या गृहस्थांनीं वज्रेश्वरी येथें एक मिठाईचें दुकान सुरू केलें होतें. श्रीगुरुदेव तांबेंच्या दुकानांत बसत असत. त्यांना पाहिलें कीं गांवांतील लहान मुलें त्यांच्या भोंवतीं जमायचीं व ते त्या मुलांना तांबेंच्या दुकानांतली मिठाई विकत घेऊन वाटीत असत.

पुढें हा क्रम नेहमीच चालू राहिला. गुरुदेवांना पहातांच मुलें जमत

अनुक्रम 3.6.9.0.3 दि ...
7241

आणि ते तांबेंकडून मिठाई विकत घेऊन ती वाटीत. रोज आठ–दहा रुपये खर्च होत आणि ते श्रीगुरुदेव आपल्या शालींत हात घालून काढीत व तांबेंना देत असत.

श्रीगुरुदेवांनीं कुर्ला कायमचे सोडलें असें दिसतांच त्यांची मुंबईची भक्त-मंडळी त्यांना भेटावयास वज्रेश्वरी येथें येऊं लागली. त्यांत त्यांचे भक्त सीताराम शेणाय हेहि असत. एकदां सीताराम दुपारच्या वेळीं वज्रेश्वरी येथें आले तेव्हां श्रीगुरुदेव तांबेंच्या दुकानीं बसले होते. सीतारामला पहातांच ते म्हणाले, “ चलो, कुर्ला जायंगे. ”

श्रीगुरुदेवांनीं तोंडांतून शब्द निघताच उठून चालावयास सुरवात केली, त्याबरोबर सीताराम शेणायहि त्यांच्याबरोबर निघाले. त्यावेळीं दुपारचे बारा वाजले होते आणि श्रीगुरुदेवांनीं पायीच कुर्ल्याला जाण्याचें ठरविलें होतें. श्रीगुरुदेव झपाट्यानें चालत असत त्यामुळें सीतारामांची धांदल उडाली. पण ती त्यांची एकप्रकारची सत्त्वपरीक्षाच होती.

श्रीगुरुदेव झपाट्यानें चालत होते आणि सीताराम शेणाय अंगांतील कोट काढून त्यांच्या मागून धांवत होते. ते कुर्ल्याला त्या रात्रीं नऊं वाजण्याच्या सुमारास पोहोंचले व कांहीं काळ विश्रांति घेऊन ते पुन्हां पायींच वज्रेश्वरीला परतले. त्यानंतर सीताराम शेणाय यांनीं वज्रेश्वरी येथेंच हॉटेल सुरू केलें व अशाप्रकारें ते आपल्या गुरुमाऊलीजवळ रहावयास आले.

नंतर श्रीगुरुदेवांनीं बांधकामास सुरवात केली. हा त्यांचा दुसरा आवडता छंद होता. या कामासाठीं त्यांनीं हरीभाऊ तांबे यानांच हाताशीं धरलें. जें बांधकाम करावयाचें असेल त्याचा नकाशा श्रीगुरुदेव बोटानेंच वाळूवर काढीत. कोणत्या ठिकाणीं काय बांधावयाचे त्याबद्दल सूचना देत व त्या कामासाठीं किती रक्कम लागेल ते अचूक सांगून तेव्हढी रक्कम आपल्या हिरव्या शालींतून काढून ती तांबेंच्या हवालीं करीत. त्यांचे अंदाज शंभर टक्के बरोबर ठरत.

त्यांनीं अकरोली येथील त्रिभुवनेश्वराच्या मंदिराचा जिर्णोद्धार करून त्या ठिकाणीं धर्मशाळा बांधली. तेथें येणाऱ्या भक्तांची पाण्याची गैरसोय दूर करण्यासाठीं तेथें त्यांनीं एक विहीर बांधली. ते स्वतः त्या धर्मशाळेंत राहूं

लागले. त्यांनीं तेथें येणाऱ्या भाविकांना स्वयंपाकासाठीं भांडीं मिळावीं अशीहि व्यवस्था केली.

त्यांनीं त्रिभुवनेश्वराच्या मंदिराजवळची उमा, रमा, सावित्री हीं कुंडें प्रथम व्यवस्थित बांधविलीं. वशिष्ठ मुनींनी निर्माण केलेली हीं आद्यकुंडें होत, हें आपण वाचलेच आहे. त्यानंतर त्यांनीं जवळच असलेलीं सूर्य–चंद्र कुंडें व नदीच्या पात्रांतील इंद्र, वरुण, वायु आणि कुवेर कुंडें व्यवस्थित बांधविली.

हीं सर्व उष्णकुंडें त्यावेळीं अगदीं मोडकळीस आलीं होतीं व त्यांच्या-बद्दल कुणाला विशेष माहितीहि नव्हती. आज श्रीगुरुदेवांच्याच कृपाप्रसादानें तेथें लाखो भाविक धार्मिक भावनेनें स्नान करतात तर, जे अभाविक आहेत त्यांना त्या कुंडांतील पाण्यांतला औषधी गुण अनुभवास येतो.

नानाप्रकारचे त्वचारोग बरे करण्याची शक्ति या कुंडांतील पाण्यांत आहे. परवांच मी! तेथें गेलों असतांना एका ख्यातनाम रशियन डॉक्टराच्या सांगण्यावरून एक गुजराथी इसम तेथल्या सूर्यकुंडांत स्नान करीत होते तें मला समजले. त्यांना कांहीं मेंदूचा विकार जडला होता. आणि जे रेडियमचे पाणी तयार करण्यास लाखों रुपये खर्च होतात ते त्या कुंडांत भरपूर आहेत, असे त्या प्रसिद्ध डॉक्टरानें त्यांना सांगितलें होतें.

आतां महाराष्ट्र राज्य सरकारनें तुंगार आणि वज्रेश्वरी हीं विश्रांतिस्थानें बनविण्याची योजना आंखली आहे. सरकारनें या निरनिराळ्या कुंडांतील पाण्याची तज्ज्ञांकडून परीक्षा करविणें योग्य होईल. सध्यांच्या बाबांच्या आश्रमाजवळच अग्निकुंडाकडे जातांना एक चिमुकले सर्प अथवा तक्षक कुंड लागतें. त्या पाण्यांत पोटांतील व्याधि दूर करण्याचें सामर्थ्य आहे असें म्हणतात. तेव्हां सरकारनें याकडे लक्ष देणें अत्यावश्यक आहे.

आतां लवकरच सरकारी प्रयत्नामुळें वज्रेश्वरीला आतांच्याहून अधिक रमणीय स्वरूप प्राप्त होईल यांत शंका नाहीं, पण या स्थानाकडे बाहेर-गांवच्या लोकांचें आणि सरकारचें लक्ष वेधण्यास श्रीगुरुदेवांचेच प्रयत्न कारणीभूत आहेत हें कबूल करावयासच हवें.

अवघ्या तीस वर्षांपूर्वी वज्रेश्वरीच्या देवळापासून समोरच्या मंदाग्नि पहाडा-पर्यंत हा सर्व प्रदेश अरण्यमय होता. श्रीगुरुदेवांच्या कृपेनेंच या जागेचा

आतां संपूर्ण कायापालट झाला आहे. त्या काळांत दिवस मावळण्यापूर्वी श्वापदांच्या भीतीनें गांवकऱ्यांना दारें-खिडक्या बंद करून बसावें लागत होतें. आतां अरण्य नाहींसें झालें आहे. श्वापदें दूर पळालीं आहेत, तेथें असलेले अगणित सर्पहि दिसेनासे झाले आहेत, तेथील जनता भयमुक्त होऊन आनंदानें राहूं लागली आहे व गांवाचा विस्तार हळूहळू वाढत आहे.

सन १९३३-३४ हीं दोन वर्षें श्रीगुरुदेव अकरोळी येथेंच रहात होते. त्या अल्प अवधींतच तेथलें वातावरण बदललें होतें. त्या ठिकाणीं इतर भक्तांनीं आरोग्यधामें बांधिलीं व त्या जागेला एका सुंदर उपनगराचें स्वरूप प्राप्त होऊं लागलें. आपलें तेथलें काम पूर्ण झालें असें श्रीगुरुदेवांना वाटलें असावें. १९३५ सालीं त्यांनीं अकरोळी सोडली आणि ते वज्रेश्वरी येथें रहावयास आले.

वज्रेश्वरी येथें आल्यानंतर श्रीगुरुदेवांनीं तेथें येणाऱ्या भक्तजनांची सोय करण्याऱ्या हेतूनें दोन धर्मशाळा आणि विहिरी बांधल्या आणि तेव्हांपासून अकरोळीप्रमाणेंच वज्रेश्वरीचें रूप पालटण्यास सुरवात झाली. श्रीगुरुदेव दोन वर्षांहून अधिक काळ त्या भागांत राहिल्यामुळें तेथें आतां भक्तांची रीघ लागली होती. त्यामुळें आपोआपच तेथल्या उद्योगधंद्यांना जोर चढला होता.

वज्रेश्वरीचें इतकें पुरातन आणि जागृत स्थान तेथें असतांना श्रीगुरुदेव तेथें जाण्यापूर्वीं कधींकाळीं वर्षाकांठीं जत्रेच्या दिवसांत लोक तेथें जात असत. पण आतां रोज भाविकांची त्या ठिकाणीं गर्दी होत असते. त्यामुळें फुलें-पानें, नारळ, प्रसाद विकणाऱ्यांचे धंदे जोरांत चालतात. तेथलीं हॉटेलें व इतर दुकानदार यांचीहि कमाई होते आणि अशाप्रकारें पैसा खेळूं लागल्यामुळें त्या गांवांतील बरेचसें दारिद्र्य नाहींसें झालें आहे.

श्रीगुरुदेवांचा दोन गोष्टींवर सुरवातीपासूनच कटाक्ष आहे. त्यांचें दर्शन घेणाऱ्या प्रत्येकानें तेथल्या उष्णकुंडांत स्नान केलें पाहिजे आणि देवीचें दर्शन घेतलें पाहिजे अशी त्यांची इच्छा असते. आपल्या भक्ताचें देवाधर्माकडे लक्ष जावें आणि त्यानें रोगमुक्त व्हावें असाच त्यांचा तें सांगण्यांत हेतु असावा.

श्रीगुरुदेवांनीं अकरोळी आणि वज्रेश्वरी येथील वास्तव्यांत जे कांहीं चमत्कार केले त्यांचें वर्णन मी करीत नाहीं, पण त्यांनीं त्या अवधींत अनेकांचे संसार सुखी केले, कित्येकांच्या व्याधि पळविल्या, मुक्यांना बोलके बनविलें आणि लंगड्यांना चालावयास लावलें आणि याबरोबरच त्यांच्याजवळ पोहोंचणाऱ्यांना सन्मार्गप्रवृत्त बनविलें.

वज्रेश्वरी येथें ते सुमारें दीड वर्ष राहिले. त्या अवधींत ते त्यांच्याजवळ जाणाऱ्यांना सुखी बनवीत होते, बालकांना मेवामिठाई खाऊं घालीत होते आणि आपल्या मूक व्याख्यानानें जनतेला सेवेचा आणि प्रेमाचा नवा विश्व-धर्म शिकवीत होते.

श्रीगुरुदेवांना असत्य मुळींच आवडत नाहीं. ते अन्तर्ज्ञानी असल्यामुळें त्यांना खोटें बोलणारा फसवूं शकत नाहीं. ते तसल्या माणसाला आणि सट्टेबाज जुगाऱ्याला दुरूनच ओळखत असत आणि त्यांना हांकलून देत असत. पण पापाचरण करणाऱ्यांना पश्चात्ताप झाल्यानंतर त्यांनीं त्याला प्रेमानें जवळ केल्याचींहि अनेक उदाहरणें आहेत.

एके दिवशीं श्रीगुरुदेवांची अचानक लहर फिरली आणि ते वज्रेश्वरी सोडून गणेशपुरी येथें रहावयास आले. प्रथम ते वशिष्ठ मुनींनीं जेथें त्रिचंडी-यज्ञ केला होता त्या अकरोळी येथें राहिले. नंतर ते यज्ञामुळें प्रसन्न होऊन भूतलावर कायम राहिलेल्या वज्रेश्वरी मातेजवळ कांहीं दिवस राहिले, त्यानंतर त्यांनीं सर्व देवांनीं जेथे निवास केला होता त्या गणेशपुरींत जावें हें सयुक्तिकच होतें.

गणेशपुरींत श्रीगुरुदेवांनीं कसा प्रवेश केला ती हृदयंगम हकीकत आपण पुढील प्रकरणांत वाचूं.

• • •

## : ९ : गणेशपुरींत श्रीगुरुदेव



सन १९३६ च्या मार्च महिन्यामध्यें श्रीगुरुदेवांनीं अचानक वज्रेश्वरीं सोडून गणेशपुरीची वाट धरली आणि सर्वेश्वरीच्या मंदिराजवळ असलेल्या तळ्याच्या कांठावरील एका झाडाखालीं मुक्काम ठोकला.

तें तळें आजहि बाबा सध्यां रहातात त्या 'कैलास आश्रमासमोर पाहावयास मिळतें. गेल्या पंचवीस वर्षांमध्यें तेथल्या भूमींत आश्चर्यकारक बदल झाल्यामुळें त्या तळ्याचेंहि स्वरूप आतां अगदीं बदललें आहे. पण श्रीगुरुदेव तेथें आले त्याकाळीं तळ्याच्या आसपास अरण्य होतें आणि वाघासारखीं हिंस्रश्वापदें पाणी पिण्यासाठीं त्या तळ्यावर येत असत.

गणेशपुरीला सध्यां जाणाऱ्या हजारों लोकांना पंचवीस वर्षांपूर्वीं त्याठिकाणीं जंगल होतें आणि सूर्य पश्चिमेकडे झुकूं लागल्यानंतर श्वापदांच्या भीतीनें तेथें जाण्यास कुणी धजावत नव्हतें हें वाचून खचित आश्चर्य वाटेल.

श्रीगुरुदेव त्या जंगलांत तळ्याच्या कांठावरील झाडाखालीं उतरले आणि त्यांनीं तो दिवस आणि ती रात्र त्या झाडाखालींच काढली. दुसऱ्या दिवशीं गणेशपुरीचा पिढीजात पाटील बांगो गोमा हा त्यांना भेटावयास गेला. पाटलाला श्रीगुरुदेवांची माहिती होती. तो अकरोळी आणि वज्रेश्वरी येथें त्यांच्या दर्शनाला जाणाऱ्यांपैकीं एक होता.

श्रीगुरुदेव आपल्या गांवांत आले याचें महत्त्व सुरवातीला फक्त बांगो गोमाच्याच लक्षांत आलें होतें. इतर गांवकरी त्या संबंधीं उदासीनच होते. नाहींतरी "पिकतें तेथें तें विकत नसतें," या जुन्या म्हणीचा अनुभव सर्वच ठिकाणीं सर्वच बाबतींत येतो.

दुसऱ्या दिवशीं श्रीगुरुदेवांनीं तळ्यावरील आपला मुक्काम हलविला आणि ते सर्वेश्वराच्या देवालयामागें वडाच्या झाडाखालीं असलेल्या एका झोपडींत रहावयास गेले.

बऱ्याच वर्षांपूर्वी एका साधूनें ती झोपडी बांधली होती आणि तो तेथें रहात होता. एके दिवशीं अचानक तो तेथून निघून गेला पण जातांना सांगून गेला होता कीं, या माझ्या झोपडींत पुढें एक थोर महात्मा येऊन रहाणार आहे.

साधूचें तें वचन पूर्ण करण्यासाठीच कीं काय, श्रीगुरुदेव गणेशपूरींत आल्यानंतर दुसऱ्या दिवसापासूनच त्या झोपडींत राहूं लागले आणि पहाटेस चार वाजतां तेथल्या उष्ण कुंडावर स्नान करून नंतर सर्वकाळ ध्यानमग्न रहाण्याचा त्यांचा नित्यक्रम सुरू झाला.

थोड्याच दिवसांत बांगो पाटलाच्या मदतीनें गांवांतील इतर कांहीं धीट मंडळी गोळा करून त्यांनीं रोज रात्रीं आपल्या झोपडींत भजनाचा कार्यक्रम सुरू केला. या भजन मंडळींला अवश्यक असलेले टाळ-मृदुंग वगैरे साहित्य त्यांनींच पुरविले.

पंधरा दिवसांनंतर त्यांनी सर्वेश्वराच्या देवळाच्या बाजूलाच एक खोली बांधविली आणि तो भजनाचा कार्यक्रम त्या नव्या ठिकाणीं होऊं लागला. वाघाची आणि सर्पाची भीति असल्यामुळें एकट्या माणसाला रात्रीच्या वेळीं तेथें येणें शक्यच नव्हतें. म्हणून ही भजनमंडळी गांवांत एकत्र जमून नंतर तेथें येत असत आणि सर्वजण मिळूनच परत जात असत.

बांगो गोमा आणि त्याचे सहकारी यांना रोज रात्री एक चमत्कार पहावयास मिळे. रात्रीचें त्यांचें भजन आटोपलें कीं, वरून दोन विड्यांचीं बंडलें आणि एक आगपेटी त्यांच्यासमोर पडत असे. त्या मंडळीनें आरामांत बसून आपलें धूम्रपान संपविलें नाहीं तोंच श्रीगुरुदेव त्यांच्यासाठीं स्वतःच तयार केलेल्या कॉफीचें भांडें पुढें ठेवीत.

या कॉफीचीहि गंमत आहे. तें कॉफीचें भांडें अगदींच लहान असे. पण भगवान श्रीकृष्णानें सती द्रौपदीला दिलेल्या थालीप्रमाणें तें भांडें होतें. श्रीगुरुदेव आग्रह करकरून भजन मंडळीला भरपूर कॉफी पाजीत असत आणि

तरीहि त्या भांड्यांतील कॉफी संपत नसे. अशा प्रकारें धूम्रपान आणि कॉफी-पान केल्यानंतर बांगो गोमा आणि त्याचे सहकारी आनंदानें गांवाकडे परत जात असत. श्रीगुरुदेवांकडे जातां-येतांना त्यांना कधींहि श्वापदांनीं किंवा सर्पांनीं त्रास दिला नव्हता.

अशा प्रकारें कांहीं महिने गेल्यानंतर एके दिवशीं श्रीगुरुदेव अचानक उठले आणि महासाध्वी अनसूयेनें आपल्या पादस्पर्शानें पवित्र बनविलेल्या लिंबोली गांवाकडे जाऊं लागले. आपले बाबा आपणांला सोडून कुठें तरी जात आहेत असा संशय बांगो गोमाच्या मनांत आला आणि तो आपल्या कांहीं सहकाऱ्यांसह त्यांच्यामागून जाऊं लागला.

श्रीगुरुदेव किती झपाट्यानें चालतात याचा उल्लेख पूर्वीं आलाच आहे. श्रीगुरुदेव सहज चालत होते. पण त्यांच्यामागें असलेल्या बांगो गोमाला आणि त्याच्या मित्रांना बाबांना गांठण्यासाठीं जोरानें धांवावें लागत होतें. शेवटीं धांवणारे थकले आणि त्यांनीं करुण स्वरांत हांका मारण्यास सुरवात केली.

तेव्हां श्रीगुरुदेव थांबले आणि म्हणाले, "तुम्हीं माझ्यामागें येऊं नका. मला कांहीं कामासाठीं गोकर्ण–महाबळेश्वरीं जायचें आहे; पण चिंता करूं नका, मी सहा महिन्यांनीं परत येईन."

बांगो गोमा कष्टी होऊन परतला आणि बाबांच्या स्थानाची व्यवस्था पहात राहिला. पण बरोबर सहा महिन्यांनीं श्रीगुरुदेव परत आले. ते या सहा महिन्यांच्या अवधींत गोकर्ण–महाबळेश्वराहून कांचनगड येथें गेले होते असें दिसतें. श्रीगुरुदेव परत आले आणि तेव्हांपासून गणेशपुरीचें वैभव आणि महात्म्य वाढूं लागलें.

त्यानंतर १९३९ सालांत पुन्हां एकदां श्रीगुरुदेव गोकर्ण-महाबळेश्वरीं जातों असें सांगून सहा महिने निघून गेले होते. या खेपेला कांचनगड येथें निश्चित गेले असावेत असें दिसतें; कारण त्याच सालांत त्यांनीं पूर्वीं सुरूं केलेलें तेथलें बांधकाम पूर्ण झालें होतें.

या खेपेला श्रीगुरुदेव मोटारीनें गेले होते. पण दोन वर्षांच्या त्यांच्या गणेशपुरींतील वास्तव्यामुळें भक्त इतके वेडे बनले होते कीं, आपला देव

आपल्या समोरून एक दिवसहि नजरेआड होऊं नये असें त्यांना वाटत होतें. या भक्तांनीं त्यांची मोटार अडविण्याचा प्रयत्न केला, त्यामुळें भयंकर चेंगराचेंगरी झाली, अनेक लोक एकमेकांच्या पायाखालीं तुडवले गेले आणि कांहीं मोटारीखालींहि चिरडले गेले. पण श्रीगुरुदेवांच्या कृपेमुळें त्यांच्यांतील एकालाहि दुखापत झाली नव्हती.

यावेळींहि श्रीगुरुदेव भक्तांना सांगितल्याप्रमाणें बरोबर सहा महिन्यांनीं परत आले आणि त्यानंतर आतांपर्यंत ते गणेशपुरी सोडून कुठेंहि गेले नाहींत.

श्रीगुरुदेवांच्या या दुसऱ्या गैरहजेरींत त्यांच्या भक्तांना त्रास होण्यासारखें एक प्रकरण उद्‌भवलें होतें. सर्वेश्वराच्या देवळाच्या पाठीमागें डॉ. कोठावाला नांवाच्या पारशी गृहस्थानें एक बंगला बांधला होता आणि त्यानें सरकारकडून आजुबाजूची जमीन विकत घेतली होती. बाबांच्या स्थानाकडे जाण्याचा मार्ग या गृहस्थाच्या मालकीच्या जमिनींतून होता.

डॉ. कोठावालानें भक्तांना आपल्या हद्दीतून जाण्यास मनाई केली आणि तो टांगेवाल्याकडून स्वतःचा एक रुपया कर वसूल करूं लागला. श्रीगुरुदेव परत आल्यानंतर त्यांना ही हकीकत समजली आणि त्यांनीं वज्रेश्वरीकडे जाणाऱ्या मोठ्या रस्त्यापासून सर्वेश्वराच्या मंदिरापर्यंत एक राजरस्ता बांधण्याचें काम हातीं घेतलें.

त्या काळांत तो भाग राखीव जंगल म्हणून सरकार मानीत होतें. त्यामुळें सरकारी हद्दीतून परवानगीशिवाय रस्ता बांधणें आणि रस्ता बांधण्यासाठीं राखीव जंगलांतील झाडें तोडणें या दोन्ही गोष्टी बेकायदेशीर होत्या.

पण श्री गुरुदेवांनीं कायद्यापेक्षां लोकांच्या सोयीकडे लक्ष देण्याचें ठरविलें होतें आणि मोठ्या उत्साहानें तो रस्ता बांधण्यास सुरवात केली होती. त्यासाठीं त्यांनीं अनेक मजूर गोळा केले होते आणि त्या मजुरांबरोबर तेहि मेहनत करीत होते.

तें काम चालू असतांना सरकारी अधिकारी त्यांना जाब विचारण्यासाठीं येत असत. अंतर्ज्ञानी श्रीगुरुदेवांना अधिकारी येणार हें आधींच समजत

असे ते स्वतः गुप्त होत असत आणि काम करणाऱ्यांनाहि आपापल्या घरीं जाण्यास सांगत असत.

सरकारी अधिकारी तेथें आले कीं त्यांना हवा असलेला वेडा संन्यासी तेथें नसे, पण त्यांना इतरहि कुणी चौकशी करण्यास सांपडत नसे. त्या जंगलांत बराच वेळ वाट पाहून कंटाळल्यानंतर ते बडे अधिकारी परत जात. त्यांची पाट वळतांच श्रीगुरुदेव प्रकट होऊन मजुरांना हांका मारीत आणि पूर्वीपेक्षां अधिक उत्साहानें कामाला सुरवात करीत.

या रस्त्यासाठीं शेंकडों झाडें तोडण्यांत आलीं आणि श्रीगुरुदेवांच्या सांगण्यावरून तीं त्या रस्त्यांतच पुरण्यांत आलीं. अशाप्रकारें मोठ्या चिकाटीनें आणि कष्टानें भक्तांसाठीं एकदांचा तो राजरस्ता तयार झाला. श्रीगुरुदेवांचें सर्व काम रोख असे, तेथें कधीं उधारीचा प्रश्नच नव्हता. संध्याकाळीं ते सर्व मजुरांना एकत्र गोळा करीत, त्यांच्या मजुरीचा हिशेब करीत, नंतर बांगो गोमासारख्या मजुरांच्या एखाद्या मुकादमाला ते बसले असतील तेथून कांहीं अंतरावरील एखादा दगड उचलण्यास सांगत असत आणि त्या दगडाखालीं त्या दिवसाच्या मजुरीचे बरोबर पैसे मिळत असत.

रस्त्याचें काम पूर्ण झाल्यानंतर श्रीगुरुदेव तेथें आलेल्या सरकारी अधिकाऱ्यांना भेटले, आणि त्यांनीं त्यांच्या समोर आपली बाजू मांडली. ते म्हणाले, “ मी संन्यासी आहे, मला घरदार नाहीं. आणि एका लंगोटीशिवाय माझ्याजवळ कांहीं नाहीं. तुमची इच्छा असली तर मी तुरुंगांत जाण्यास तयार आहें. मी हा रस्ता लोकांसाठीं बांधला आहे. पण त्यावर माझी मालकी नाहीं, तो तुमच्याच मालकीचा आहे. या रस्त्यामुळें असंख्य लोक तुम्हांला दुवा देतील आणि तुमचाच फायदा होणार आहे. ”

यानंतर सरकारी अधिकारी निरुत्तर होऊन परत गेले आणि त्यांनीं या बेकायदेशीर रस्त्याबद्दल श्रीगुरुदेवांना मुळींच त्रास दिला नाही. त्या रस्त्याची जनतेला आवश्यकता होती हें सरकारला पटलें असावें, शिवाय त्यासाठीं सरकारी पैहि खर्च झाली नव्हती. श्रीगुरुदेवांनींच त्यासाठीं पैसे खर्च केले होते.

पुढें डॉ. कोठावाला यालाहि पश्चात्ताप होऊन त्यानें श्रीगुरुदेवांची क्षमा मागितली आणि तोहि त्यांचा भक्त बनला.

त्यानंतर श्रीगुरुदेवांनी आणखी बांधकामास सुरवात केली. त्यांनीं तेथली ब्रह्मा-विष्णु-रुद्र कुंडें व्यवस्थित बांधलीं, सर्वेश्वर ऊर्फ भीमेश्वराच्या देवळाला लागूनच धर्मशाळा बांधली. तीहि अपूरी पडल्यानंतर सध्यांच्या बालभोजनाच्या बाजूला असलेली मोठी धर्मशाळा बांधली. सध्यांच्या "कैलास आश्रमांत" जाईपर्यंत श्रीगुरुदेव याच धर्मशाळेंत बसून सर्वांना दर्शन देत असत. त्या काळांत कुणाहि भक्ताला त्यांच्या जवळ जाणें आणि बोलणें शक्य होतें.

त्यानंतर त्यांनीं गणेशपुरी येथें कित्येक विहिरी आणि आणखी एक धर्मशाळा बांधली. त्यांनीं तेथें ग्रामदेवीचें मंदिर बांधलें, त्या मंदिराला जोडूनच एक लहानशी धर्मशाळा ऊर्फ पर्णकुटी बांधली आणि ज्यांच्या आशीर्वादानें मी हें चरित्र लिहिलें आहे त्या श्रीस्वामी मुक्तानंदजींना तेथें रहावयास सांगितलें. आतां त्या जुन्या पर्णकुटीला जोडूनच एक सुंदर बैठी इमारत बांधण्यांत आली आहे आणि त्याच ठिकाणीं श्रीस्वामी मुक्तानंदजींचें सध्यां वास्तव्य आहे.

ग्रामदेवी मंदिरानंतर त्यांनीं सती अनसूया स्थानाजवळचें ऋषेश्वराचें मंदिर बांधलें. शिवाय गणेशपुरींतील कित्येक जुन्या मंदिरांचा जिर्णोद्धार केला. नंतर त्यांनी भद्रकालीचें छोटेसें पण सुंदर देवालय बांधलें. ही देवी त्यांच्याबरोबर हिमालयांतून तेथें आली आहे. देवीची मूर्ति दृष्ट लागण्याइतकी सुंदर आहे. ती जरी साध्या चुन्याची आणि स्थानिक कारागिराकडून तयार करविली असली तरी संगमरवरी दिसते आणि तिची घडण उत्कृष्ट जयपुरी कारागिरानें केली असावी असा भास होतो.

श्रीगुरुदेवांनीं वज्रेश्वरी येथें आणखीहि कांहीं बांधकामें केलीं. त्या सर्वांचा खर्च दोन लाखांहूनहि अधिक झाला असावा. पण हे सर्व पैसे कुणाकडे एक पैचीहि मागणी न करतां त्यांनीं स्वतःच खर्च केले होते. कांचनगडप्रमाणेंच येथेंहि त्यांनीं पैसे कधीं लंगोटींतून तर कधीं दगडाखालून बाहेर काढले होते. श्रीगुरुदेव अतिशय हिशेबी आहेत, कोणत्या कामासाठीं किती खर्च झाला हें त्यांना अचूक माहीत असतें.

वज्रेश्वरी येथील दुकानदार हरीभाऊ तांबे यांच्यामार्फत त्यांनीं बरींच कामें करविलीं हें वाचकांना माहीत आहेच. श्रीगुरुदेव वज्रेश्वरी सोडून गणेशपुरी येथें गेल्यानंतर हरीभाऊंकडे कांहीं रक्कम जमा होती. श्रीगुरुदेवांचें आणखी कांहीं काम निघेल या विचारानें त्यांनीं ती रक्कम स्वतःजवळ राहूं दिली होती.

त्यानतर दोन वर्षे निघून गेलीं, तेव्हां ती रक्कम परत करावी अशा विचारानें तांबेनीं सर्व हिशेब केला आणि उरलेली रक्कम घेऊन ते गणेशपुरी येथें श्रीगुरुदेवांच्या दर्शनाला गेले.

आपण हिशेब पूर्ण करण्यासाठीं आलों आहोंत असें तांबेनीं सांगतांच लागलीच श्रीगुरुदेव म्हणाले, " होय, तुझ्याजवळ माझे १३३६ रुपये आणि १३ आणे शिल्लक आहेत." हरीभाऊ तांबे श्रीगुरुदेवांकडे आश्चर्यानें पहातच राहिले, त्यांनी तेवढीच रक्कम बरोबर आणली होती.

श्रीगुरुदेव भीमेश्वराच्या देवळापाठीमागल्या मोठ्या धर्मशाळेंत बसत असत हें आपणांला माहीत आहेच. ते गणेशपुरी येथें १९३६ सालीं गेले होते, त्यानंतर बरोबर वीस वर्षांनीं १९५६ सालात बुद्ध जयंतीच्या मुहूर्तावर ते सध्यांच्या 'कैलास आश्रमा'मध्यें रहावयास गेले. हा आश्रम त्यांचे मुंबईचे एक भक्त श्री. चिमणलाल वाडीलाल शहा यांनीं बांधिला आहे.

श्रीगुरुदेव या आश्रमांत रहावयास गेल्यापासून अनेक भक्तांची गैरसोय झाली आहे. पूर्वीं ते उघड्या जागेवर किंवा धर्मशाळेंत बसत असत, कुणीहि त्यांना भेटूं शकत होता आणि त्यांच्याबरोबर बोलूं शकत होता.

श्रीगुरुदेव कैलास आश्रमांत रहावयास गेल्यापासून सहसा बाहेर पडतच नाहींत. ठरलेल्या वेळीं एकदां सकाळीं त्यांचें दर्शन होतें, क्वचित ते पुन्हां दुपारीं दर्शन देतात. रविवारीं आणि गुरुवारीं ते दुपारीं बारा वाजण्याच्या सुमारास भक्तांना दर्शन देण्यास सहसा चुकत नाहींत. एरव्हींच्या दिवशीं त्यांचें दर्शन घडेलच अशी शंभर टक्के खात्री नसते.

कैलास आश्रमांत त्यांच्या सेवेकऱ्यांनीं बरीच शिस्त लावली आहे असें दिसून येतें. भक्त रांगेंतून सरकत त्यांच्यासमोरून दर्शन घेऊन पुढें जात

ाठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत. ५/२७
अनुक्रमांक ३८०२ वि.

१२५९ १६-८-५५
दि.

असतो, त्याला कांहीं क्षणहि त्यांच्यासमोर उभे रहाणें कठीण असतें तेव्हां त्यांच्याबरोबर बोलण्याची गोष्ट तर दूरच राहिली.

यामुळें कित्येक भक्तांचें दर्शन घेऊनहि समाधान होत नाहीं. श्रीगुरुदेवांबरोबर आपणांला प्रत्यक्ष बोलतां येत नाहीं याचें त्यांना वाईट वाटतें आणि कांहीं ठराविक मंडळींनीं आपल्या देवाला कडक पहाऱ्यांत ठेवलें आहे, अशी शंका त्यांच्या मनांत येते.

अर्थात्च ही त्यांची समजूत बरीच भ्रामक आहे आणि कुणाहि भक्ताला असंतुष्ट रहाण्याचें कांहीं कारणच नाहीं. पण दर्शनासंबंधीं मी पुढल्या एका प्रकरणांत खुलासेवार लिहिणारच आहे.

• • •

## : १० : श्रीगुरुदेवांचा अपूर्व चमत्कार



अकरोळी, वज्रेश्वरी आणि गणेशपुरी हे पुरातन काळापासून एकाच तीर्थस्थानाचे तीन विभाग मानले जातात. आणि या भागांत श्रीगुरुदेव १९३३ पासून आतांपर्यंत म्हणजे सुमारे तीस वर्षे रहात आहेत. या काळांत त्यांनीं मंगळूर प्रांताप्रमाणें येथेंहि अनंत चमत्कार करून दाखविले आहेत. असे चमत्कार प्रत्यहि घडत असतात. श्रीगुरुदेव हाच कुणाला आकलन न होणारा एक मोठा चमत्कार आहे.

मी याहि प्रकरणांत कांहीं चमत्कार वर्णन करणार आहे. हें वाचून कुणी म्हणतील कीं हा रहस्यकथा-लेखक असल्यामुळें याला चमत्कारांचें आकर्षण वाटत असावें; पण हें चरित्र असल्यामुळें घडलेल्या सत्य गोष्टी त्यांत असाव्यात याच हेतूनें मी हे चमत्कार वर्णित आहे. श्रीगुरुदेवांनाहि कुणी चमत्कारांबद्दल बोलूं लागला तर तें आवडत नाहीं. पण तरीहि जें घडलें आहे तें सत्य या चरित्रांत असावें असें मला वाटतें.

चमत्कारांचें स्तोम माजविल्यास अंधश्रद्धा निर्माण होते व ती समाजहिताच्या दृष्टीनें घातक असते हें मला माहीत आहे. चमत्कारांवर अत्यंत तिडिकेनें तुटून पडणारे महान सत्यशोधक कै. श्री. भास्करराव जाधव यांचें माझ्यावर पितृवत प्रेम होतें आणि मनुस्मृति जाळणाऱ्या व नंतर बुद्ध धर्माचा स्वीकार करणाऱ्या डॉ. आंबेडकरांचाहि अल्प सहवास मला लाभला होता. अंधश्रद्धा किती भयंकर असते हें या दोघां महापुरुषांकडून मी शिकलों आहें.

पण श्रीगुरुदेवांनीं अंधश्रद्धा निर्माण करण्याचा कधींच प्रयत्न केला नाहीं आणि ते सत्याचे महान उपासक आहेत. सर्वांनीं एकमेकांवर प्रेम केलें पाहिजे असा त्यांचा संदेश आहे. त्यांनीं जात, धर्म, स्पृश्यास्पृश्य असा भेद

कधींच मानला नाहीं. सर्वांना समान लेखून त्यांच्यांतील उणीवा दूर करणें हा त्यांचा हेतु त्यांच्या सर्व हालचालींतून स्पष्ट होत असतो. म्हणूनच त्यांचें हें अल्प चरित्र वर्णन करतांना घडलेल्या गोष्टी संक्षेपानें कां होईना पण वर्णिल्या पाहिजेत असें मला वाटतें.

१९३३–३४ सालांत असहकाराच्या चळवळींत येरवडा तुरुंगांत शिक्षा भोगीत असतांना मला श्री. बंकीमबाबूंनीं लिहिलेलें कृष्णचरित्र वाचावयास मिळालें होतें. भगवान् श्रीकृष्णाचें श्रेष्ठ व्यक्तिमत्व सिद्ध करतांना बंकीमबाबूंनीं कृष्णचरित्रांत वर्णन केलेल्या चमत्कारांची बुद्धिवादानें फोड करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचें वाचकांना स्पष्टीकरण करण्याच्या हेतूनें मी एकच उदाहरण देतों.

बंकीमबाबूंनीं म्हटलें आहे कीं, "बालपणीं श्रीकृष्णानें करांगुळीवर गोवर्धन पर्वत उचलला हा लेखकाचा कल्पनाविलास आहे. कृष्ण लहानपणींहि अत्यंत कल्पक व बुद्धिमान होता. यमुनेला पूर येऊन जेव्हां गोकुळांत पाणी शिरूं लागलें तेव्हां तेथल्या अडाणी जनतेला गर्भगळीत झाल्यामुळें काय करावें ते समजेना. तेव्हां श्रीकृष्णांनीं उंच गोवर्धन पर्वतावर चढल्यास यमुनेचें पाणी तितकें वर चढणें शक्य नाहीं हें त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आणलें व त्या युक्तीनें गोकुळवासियांना संकटांतून वांचविलें."

अशाप्रकारें बंकीमबाबूंनीं श्रीकृष्णांच्या सर्व चमत्कारांची उकल करण्याचा बराच यशस्वी प्रयत्न केला आहे. पण श्रीगुरुदेवाच्या चमत्कारांकडे अगदीं चिकित्सक बुद्धीनें पाहूनहि बंकीमबाबूंप्रमाणें त्यांची फोड करणें निदान मला तरी माझ्या शक्तीबाहेरचें आहे असें दिसलें. म्हणूनच श्रीगुरुदेवांची क्षमा मागून मी ते चमत्कार वर्णन केले आहेत.

श्रीगुरुदेवांचे एक जुने भक्त सीताराम शेणाय हे वज्रेश्वरी येथें मरण पावले त्यावेळीं जो एक चमत्कार झाला त्यासंबंधीं आजहि वज्रेश्वरीचे गांवकरी सांगत असतात.

सीताराम शेणाय त्यापूर्वीं दोन वेळां अतिशय आजारी पडले असतांना आणि डॉक्टरांनीं त्यांची आशा सोडली असतांना श्रीगुरुकृपेमुळें ते त्या दुखण्यांतून निभावले होते. त्यामुळें ते मरण पावतांच त्यांचें शव श्रीगुरुदेवां-

समोर गणेशपुरीला न्यावयाचें असें त्यांच्या नातेवाईकांनीं ठरविलें व तें एका मोटारींत घातलें.

पण मोटारींत कोणताच बिघाड झाला नसतांना ती पुढें सरकण्यास तयार होईना. ती मागे वळविली तर धांवत सुटे. पण पुढें नेण्याचा प्रयत्न करतांच थांबत असे. तेव्हां त्यांनीं प्रेत दुसऱ्या मोटारींत ठेवलें; पण तरीहि कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं नाइलाजानें नातेवाईकांना त्यांचा बेत सोडावा लागला.

एका वृद्ध अंध स्त्रीला श्रीगुरुदेवासमोर जातांच दृष्टि आली व एक दहा वर्षांचा जन्मतःच मुका मुलगा त्यांच्या कृपाप्रसादानें बोलूं लागला हे चमत्कार प्रत्यक्ष पहाणाऱ्या अनेक व्यक्ति आहेत. मुंबईच्या एका प्रसिद्ध वकिलाच्या स्त्रीला वेड लागलें असतां तिला श्रीगुरुदेवांनी आपल्या आश्रमांत ठेऊन बरें केलें आहे. तर मुंबईतील ताराबाग इस्टेट येथें रहाणाऱ्या एका गुलाबी शेट्टी नांवाच्या स्त्रीला गंडमाळा झाल्या असतांना व तज्ज्ञ डॉक्टरांनीं तिला कॅन्सर होईल असा निर्णय दिला असतांना श्रीगुरुदेवांनीं आपल्या 'आश्रमांत' ठेऊन व रोज उष्ण कुंडांत स्नान करावयास लावून खडखडीत बरें केलें आहे.

आणखी एक गोष्ट माझ्या गांवांतलीच आहे. अर्नाळ्यापासून दोन मैलांवर असलेल्या आगाशी येथील एका जोडप्याचा दोन वर्षांचा मुलगा आईबापाची नजर चुकवून उष्ण कुंडांत पडला आणि मरण पावला तेव्हां श्रीगुरुदेवांनीं त्याला गरम कणिकेंत गुंडाळून ठेवण्यास सांगितलें व थोड्याच अवकाशांत तो मुलगा हालचाल करूं लागला.

आणखी एक गंमतीची गोष्ट आहे. कांचनगड येथील एका भक्तानें श्रीगुरुदेवांनीं आपल्या मुलाच्या विवाहाला हजर रहावें म्हणून गळ घातली आणि त्याचा भक्तिभाव पाहून त्यांनी तें आमंत्रण स्वीकारलें आणि आश्चर्य असें कीं, शेंकडों मैलांवर असलेल्या कांचनगड येथें ते विवाह समारंभाला हजर राहिले आणि त्याच दिवशीं ते गणेशपुरींत आपल्या भक्तांनाहि भेटत होते.

एकदां तर श्रीगुरुदेव मुंबई, मद्रास व दिल्ली येथील भक्तांना एकाच

दिवशीं दिसले आणि चौकशी करतां असें आढळून आलें होतें कीं ते त्या दिवशीं गणेशपुरींतच होते.

श्रीगुरुदेवांनी आपल्या एका भक्ताला हिमालयांत तीर्थयात्रेला पाठविलें व बद्रीनाथ केदारेश्वराचें दर्शन घ्यावें अशी खास सूचना केली आणि त्या भक्ताला केदारेश्वराच्या देवळांत मूर्तीऐवजी श्रीगुरुदेवच तेथें बसलेले आढळले.

श्रीगुरुदेवांच्या आश्रमामागेंच कांहीं अंतरावरून तानसा नदी वहाते. त्या नदीला अचानक पूर आला. त्यावेळीं मुंबईतहि भयंकर वादळ झालें होतें. नदीचें पाणी वर चढत आश्रमाला भिडलें तेव्हां भक्तांनीं श्रीगुरुदेवांच्या चरणावर अभिषेक करावयास सुरवात केली व त्याबरोबर तानसा पुन्हां शांत बनली.

श्रीगुरुदेवांच्या गणेशपुरींत चमत्कारांची वाचकांना माहिती असावी या हेतूनेंच त्यांच्या अनंत चमत्कारांपैकीं चार-दोन मी येथें सांगितले पण त्यांनीं जो एक महान चमत्कार घडविला त्यासंबंधीं आतां विस्तारानें लिहिणार आहें.

श्रीगुरुदेव वज्रेश्वरी येथें (यांत अकरोळी व गणेशपुरी येतेच) गेले त्यावेळीं तेथें सर्वत्र वन्य श्वापदांचा स्वैरसंचार चालू होता आणि तेथें अनंत सर्प होते याचा उल्लेख वेळोवेळीं आलाच आहे. श्रीगुरुदेवांचीं पवित्र पाउलें पडतांच प्रथम त्या ठिकाणचीं श्वापदें व सर्व नाहींसे झाले व तेथील जनता भयमुक्त झाली.

हळूहळू तेथलें रान नाहींसे होऊन तेथल्या जमिनी सुपीक बनल्या. श्वापदांची भीति नाहींशी झाल्यामुळें तेथल्या शेतकऱ्यांना जमिनीची चांगली मशागत करणें शक्य झालें. त्या पूर्वींच्या अरण्यमय प्रदेशांत हिंवतापानें ठाण मांडलें होतें पण श्रीगुरुदेवांच्या सामर्थ्यामुळें तेथला 'मलेरिया' दूर पळाला.

श्रीगुरुदेव तेथें गेले तेव्हां तेथले पुरुषच नव्हे तर स्त्रियाहि लंगोटीच नेसत असत. पण बाबा स्वतः जरी लंगोटीच नेसत होते तरी त्यांनीं या लोकांना विशेषतः स्त्रियांना वस्त्रें नेसण्यास शिकविलें. श्रीगुरुदेवांना त्यांच्या

भक्तांकडून अनेक वस्त्रांचा अहेर मिळतो तीं सर्व या गरजू स्त्री-पुरुषांनाच वाटण्यांत येतात.

श्वापदें नाहींशी झालीं, हिंवताप पळून गेला. जमिनी सुपीक बनल्या. त्यामुळें स्वाभाविकपणेंच तेथल्या जनतेचें जीवनमान सुधारलें. श्रीगुरुदेवांच्या दर्शनासाठीं नित्य हजारों माणसें तेथें जात-येत असल्यामुळें तेथल्या निर-निराळ्या दुकानदारांची प्राप्ति वाढली. दुकानें–हॉटेलें वाढूं लागलीं, पैसा खेळूं लागला, त्यामुळें तेथल्या दारिद्र्याला जबरदस्त शह बसला आणि लोकांचें आरोग्यहि सुधारलें.

तेथल्या लहान मुलांच्या एक वेळच्या भोजनाचा प्रश्न सुटला आहे. श्रीगुरुदेवांच्या बाल-भोजनगृहांत रोज हजार मुलांना मोफत अन्नदान करण्यांत येतें. बालकांवर अतिशय प्रेम करणाऱ्या श्रीगुरुदेवांनीं त्यांच्या शिक्षणाचीहि सोय केली आहे.

त्यांनीं वज्रेश्वरी व गणेशपुरी येथें स्वखर्चानें शाळा बांधल्या. गणेशपुरींतील शाळा तर भगवंताच्या आश्रमाला टेकूनच आहे. तेथें लहान-मोठ्या बालकांचा दिवसभर गोंगाट चालू असतो पण सदा ध्यानमग्न असणाऱ्या त्या महात्म्याला त्यामुळें त्रास होत नाहीं. उलट आनंदच होत असणार.

तेथली रहदारी वाढल्यामुळें तेथले रस्ते सुधारले, टांगेवाले आनंदानें जगूं लागले. श्रीगुरुदेवांनीं तेथें पोष्टासाठीं इमारत बांधली व ती शाळेच्या इमारतीबरोबर लोकलबोर्डाच्या स्वाधीन केली. आतां या पोष्टांत टेलिफोनची सोय करण्यांत आली आहे व लवकरच खुद्द गणेशपुरींतहि टेलिफोनची व्यवस्था होणार आहे.

श्रीगुरुदेवांनीं स्वखर्चानें गणेशपुरी येथें पॉवर-हाऊस बांधलें आहे. त्यामुळें तेथें शेकडों विद्युत्दीप प्रकाशीत होतात, पंखे फिरतात, रेडिओचेहि आवाज ऐकावयास मिळतात.

श्रीगुरुदेव बालकांच्या शिक्षणाची आणि पोस्टाची सोय करून थांबले नाहींत तर त्यांनीं वज्रेश्वरी व गणेशपुरी येथें दवाखान्याची व्यवस्था केली. त्याचप्रमाणें मध्यवर्ती वज्रेश्वरीला त्यांनीं तेथल्या स्त्रियांसाठीं एक अद्यावत् पद्धतीचें प्रसूतिगृहहि बांधलें आहे. गरजू स्त्रियांचे बाळंतपणांत फार हाल होत असत ते आतां या प्रसूतिगृहामुळें दूर झाले आहेत.

श्रीगुरुदेवांनीं केवळ त्या स्थानाचाच नव्हे तर तेथल्या जनतेचाहि कायापालट केला आहे. त्यांना बाबांनीं वस्त्रें नेसण्यास तर शिकविलेंच; पण त्यांना अप्रत्यक्षपणें अन्नाचे वेगवेगळे पदार्थ तयार करण्याचेंहि शिक्षण दिलें आहे. बालभोजन गृहामुळें मुलांना नाना प्रकारचे पदार्थ खावयास मिळतात व त्यामुळें तेथल्या स्त्रिया स्वयंपाकाकडे जास्त लक्ष देतात.

आज तुम्हीं गणेशपुरीला गेलांत तर पंचवीस-तीस वर्षांपूर्वीं तो प्रदेश अरण्यमय होता यावर तुमचा विश्वास बसत नाहीं. गणेशपुरींत आश्रमासमोर आज एक छोटी बाजारपेठ पहावयास मिळते. तेथें कांहीं भक्तांनीं बांधलेले आकर्षक बांधणीचे छोटे–मोठे बंगले आपलें चित्त आकर्षून घेतात. तेथें हॉटेलें आहेत, रेडियोचे संगीत ऐकावयास मिळतें आणि आपण जंगलांत नसून कुठल्या तरी सुधारलेल्या शहरांतच आहोंत असें तेथें जाणाराला वाटतें.

श्रीगुरुदेवांच्या धर्मशाळेंत आपणांला तीन दिवस रहातां येतें; पण त्याशिवाय इतरहि ठिकाणीं स्वस्त दरांत आपणाला आरामानें रहाण्याची सोय आहे. आतां तर आश्रमाच्या मागें बंगलोरच्या एका भक्तानें लाखों रुपये खर्च करून एक भव्य धर्मशाळा बांधली आहे. तेथें प्रत्येक कुटुंबाला आरामानें रहातां यावें यासाठीं दोन खोल्यांचा ब्लॉकच मिळूं शकतो व तेथें आंतच पाण्याचीहि सोय करण्यांत आली आहे.

त्याठिकाणीं तुम्हांला भीमेश्वर महादेवाच्या मंदिरांत नैसर्गिकरीत्या सतत अभिषेक कसा होत असतो हा चमत्कार पहावयास मिळेल. त्याचप्रमाणें गणेशपुरीला श्रीगुरुदेवांच्या आश्रमाच्या पाठीमागें तुम्हांला सर्पकुंड आणि अग्निकुंड पहावयास मिळेल. या अग्निकुंडांतील पाणी इतकें उष्ण असतें कीं, त्यांत तांदूळ सोडल्यास कांहीं क्षणांतच त्यांचा भात तयार होतो. नंतर पाऊलवाटेनें तुम्हीं तानसा नदीचें पात्र ओलांडलेंत कीं, तुम्हांला अनसूयेचें अतिशय सुंदर कुंड व तिचें प्राचीन मंदिर पहावयास मिळेल.

गणेशपुरी प्रमाणेंच वज्रेश्वरी येथें सर्व सोई आहेतच. त्या ठिकाणीं वज्रेश्वरी मातेचें जागृत स्थान असून तेथें भक्तांची दाटी होत असते. समोरच श्रीगुरुदेवांनीं मच्छींद्रनाथ, गोरक्षनाथ यांच्या पादुका स्थापन केल्या आहेत. तें स्थानहि पहाण्यासारखें आहे. तेथेंहि उपहारगृहें व बाजारपेठ आहे.

नंतर तुम्हीं तानसा नदीच्या कांठानें पुढें जाऊं लागलांत कीं समोरच तुम्हांला मंदाग्नि पर्वत पहावयास मिळतो. दोन्ही बाजूला मुंबईच्या उपनगराप्रमाणें तुम्हांला छोटे बंगले दिसतात. येथें कांहीं श्रीमंतांनीं व भक्तांनीं आरोग्यमंदिरें ( सॅनिटोरियम् ) बांधलीं आहेत.

त्या रस्त्याच्या टोंकाला पोहोंचलांत कीं तुम्हांला उजवीकडे एस् टी. चा भव्य स्टँड दिसतो व डाव्या बाजूला श्रीगुरुदेवांनीं वास्तव्य केलें होतें ते त्रिभुवनेश्वराचें पुरातन मंदिर पहावयास मिळतें. तेथेंच व आजुबाजूला तुम्हांला उमा, रमा, सावित्री, सूर्य, चंद्र वगैरे कुंडें पहावयास मिळतील. एका बाजूची तानसा नदी, दुसऱ्या बाजूचें सृष्टिसौन्दर्य व समोरचा मंदाग्नि पर्वत तुमच्या मनाला खचित भुरळ पाडील.

तुम्हीं तेथून सहा मैलांवर परशुरामाच्या डोंगरावर गेलांत तर तुम्हांला अखिल भारतांत क्वचितच पहावयास मिळेल अशा प्रकारचें परशुरामाचें प्राचीन मंदिर पहावयास मिळेल. जर मंदाग्नि पर्वतावर गेलांत तर तुम्हांला एखादा महान् तपस्वीहि आशीर्वाद देईल.

पण हें सर्व वैभव तुम्हांला आज पहावयास मिळतें. तीस वर्षांपूर्वी तुम्हांला यांतील कांहींहि दिसलें नसतें. तेथें जाण्याची तुम्हांला हिंमतच झाली नसती.

आपल्या राज्य सरकारची दृष्टि त्या स्थानाकडे वळली आहे. नजीकच्या भविष्यकाळांत या स्थानाच्या सौंदर्यांत खचित अधिक भर पडणार आहे. लवकरच गणेशपुरींत एक एस्. टी. चा भव्य स्टँड तयार होणार आहे.

पण ही सर्व लीला भगवान श्रीनित्यानंदांची आहे. स्वतः केवळ लंगोटी नेसून स्वतःच्या अन्नपाण्याची फिकीर न करणाऱ्या या वज्रेश्वरीच्या जादूगारानें जो हा अभूतपूर्व चमत्कार केला आहे त्याला जगाच्या इतिहासांत तोड सांपडणार नाही.

स्वतःसाठीं कांहींहि न मागणाऱ्या, सदा आपल्याच धुंदींत असणाऱ्या, पण दर्शनासाठीं जाणाऱ्यांवर मुक्त हस्तानें सुखसमाधानाची खैरात करणाऱ्या, त्यांच्या नाना मनोकामना पूर्ण करणाऱ्या या महात्म्याचें हें अलौकिक चरित्र असें आहे कीं, जें अभाविकांनाहि विचार करण्यास भाग पाडील, तर माझ्यासारख्याला गुरुदेव हे परमेश्वराचे प्रत्यक्ष अवतार आहेत, ते भगवान श्रीनित्यानंद आहेत असें वाटल्यास आश्चर्य तें काय ! ● ● ●

# श्रीगुरुदेव आणि श्रीसाईनाथ



दोन सत्पुरुषांची तुलना करणें हें महा अज्ञानाचें लक्षण आहे. शिर्डीचे श्रीसाईनाथ आणि गणेशपुरीचे श्रीगुरुदेव यांच्या चरित्रांत जें बरेंच साम्य आढळतें तें वाचकांपुढें मांडावें या हेतूनेंच मी हें प्रकरण लिहीत आहे.

श्रीसाईनाथांचे अनंत भक्त आहेत त्यांना हें प्रकरण वाचून विषाद न वाटतां उलट आनंदच होईल अशी माझी पूर्ण खात्री आहे. माझीहि श्रीसाईबाबांवर श्रद्धा आहे. तेव्हां बाबांबद्दल अनादर निर्माण करण्याचा प्रयत्न माझ्या हातून समजून उमजून तर नव्हेच पण चुकूनहि होणार नाहीं.

माझे वडील, बाबा शिर्डीत प्रत्यक्ष असतांना त्यांच्या दर्शनासाठीं जात असत. त्यांच्या तोंडून साईबाबांबद्दल कांहीं गोष्टी ऐकलेल्या मला आठवतात. पण साईबाबांकडे माझें लक्ष गेलें तें केवळ योगायोगानें.

फाळणीमध्यें परागंदा होऊन मुंबईत आलेल्या एका सिंधी चित्रकारानें दहा वर्षांपूर्वी एके दिवशीं मी माझ्या दुकानांत बसलों असतांना पिंपळाच्या पानावर रंगविलेलें एक चित्र मला दाखविलें आणि माझ्या वडिलांच्या उशाशीं नेहमीं असणाऱ्या साईबाबांच्या तसविरीची आठवण होऊन मी तें चित्र विकत घेतलें.

तें चित्र माझ्याजवळ कित्येक महिने पडूनच होतें. पुढें मी साडे–सातीच्या फेऱ्यांत सांपडलों, त्या संकटकालांत मला त्या चित्राची आठवण झाली व मी त्याची पूजा करूं लागलों. माणूस कितीहि प्रयत्नवादी असला तरी दैव ही एक चीज आहे हें त्याला कधीं ना कधीं तरी मान्य करावें

लागतें व तेव्हां त्याला ईश्वर आठवतो. जेथें बुद्धि अगतिक बनते, तिची मर्यादा संपते, तेथूनच श्रद्धेची सुरवात होते.

मला स्वतःसंबंधीं कांहीं सांगावयाचें नाहीं, मी अशाप्रकारें साईभक्त बनल्यानंतर त्यांच्या अपार शक्तीचा मला अनुभव आला आहे इतके म्हटलें कीं पुरे.

वज्रेश्वरीच्या श्रीभगवंताकडे अशाच एका चित्रामुळें माझें लक्ष वेधलें. सहा वर्षांपूर्वी माझ्या दुकानाच्या बाजूलाच एक फेरीवाला चित्रें मांडून बसला होता. त्याच्याजवळ मी श्रीगुरुदेवांचें चित्र पाहिलें आणि तें दोन आण्याला विकत घेतलें. त्यावेळीं वज्रेश्वरी येथें श्रीनित्यानंद नांवाचे एक स्वामी आहेत या पलीकडे मला कांहींच माहिती नव्हती.

नंतर श्रीगुरुदेवांबद्दल बोलणारीं माणसें मला भेटलीं व त्यांच्या दर्शनाचा ध्यास लागला. त्यांच्या कृपेनें तो योगहि लवकरच जुळून आला. गणेशपुरी येथें जाऊन मी त्यांचें दर्शन घेतलें आणि त्यावेळीं प्रथम माझ्या मनांत जो कोणता विचार आला असेल तो हाच कीं, श्रीशिरडीचे साईनाथ आणि गणेशपुरीचे श्रीगुरुदेव हे एकच आहेत. तसा विचार माझ्या मनांत कां आला तें सांगतां येत नाहीं. पण तेव्हांपासून मी तसें अनेकांना सांगत आलों आहे आणि आजहि माझी तीच भावना कायम आहे.

त्यामुळेंच या दोघां सत्पुरुषांच्या चरित्रांतील साम्यस्थळें पहातांना मला आनंद होतो आणि त्या आनंदाचा लाभ माझ्या वाचकांनाहि व्हावा याच हेतूनें मी हें लिहीत आहें.

या दोघांतील पहिलें आणि चटकन नजरेंत भरण्यासारखें जें साम्य आहे तें म्हणजे त्यांचें जन्मरहस्य. मराठवाड्यांतील औरंगाबाद जिल्ह्यांत धूप नांवाचें एक खेडें आहे. तेथल्या चांदभाई नांवाच्या एका सधन गृहस्थाची आवडती घोडी हरवली होती आणि तिचा शोध करीत रानांत फिरत असतांना त्याला श्रीसाईनाथ दिसले होते.

नंतर याच चांदभाईच्या बायकोच्या भाच्याची सोयरीक शिर्डी येथील एका मुलीबरोबर ठरली आणि त्या लग्नाच्या वऱ्हाडांतून चांदभाईबरोबर श्रीसाईबाबा प्रथम शिर्डी येथें आले.

ती सर्व मंडळी गांवाबाहेरच्या खंडोबाच्या देवळासमोर उतरली होती. तेव्हां त्या देवळाचे मालक म्हाळसापति हे तेथें उतरलेल्या तरुण साधूचें अलौकिक तेज पाहून म्हणाले, " आवो साईबाबा, " आणि तेव्हांपासून त्यांना तेंच नांव प्राप्त झालें.

श्रीगुरुदेवांनाहि त्यांच्या अगदीं बालवयांत कोइमतूर शहरांत श्री. ईश्वर अय्यर यांनीं प्रथम पाहिलें आणि ओळखलें, या सदा आनंदांत असणाऱ्या योगीराजाला कुणींतरी नित्यानंद या नांवानें संबोधिलें असावें म्हणूनच आपण त्यांना त्या नांवानें ओळखतों.

साईबाबांबद्दल असेंहि सांगतात कीं, ते त्यांच्या बालवयांत सध्यां ' गुरु पादुका ' या नांवानें प्रसिद्ध असलेल्या स्थानीं तेथल्या कडुनिंबाच्या झाडाखालीं तप करतांना दिसले होते. नंतर ते अदृश्य झाले आणि बारा वर्षांनंतर चांदभाईबरोबर पुन्हां शिर्डीला आले.

साईबाबा मूळचे कुठले, त्यांचे आईवडील कोण होते, जन्म कुठें झाला, बालपण कसें गेलें वगैरे संबंधींची माहिती उपलब्ध नाहीं. कुणीहि त्यांच्या वयाचा योग्य अंदाज करूं शकलें नव्हतें इतकेंच नव्हे तर ते हिंदु कीं यवन याबद्दल अनेक वाद झाले. पण त्यांतून कांहींच निष्पन्न न होतां बाबांचें जन्मरहस्य कुणालाच समजलें नाहीं.

श्रीगुरुदेवांच्या बाबतींतहि तसेंच झालें. कोईमतूर शहरांत ते ईश्वर अय्यरना दिसण्यापूर्वीं कुठें होते, त्यांचे आईवडील कोण होते, ते कुठें जन्मले, त्यांचें बालपण कसें गेलें वगैरे संबंधींची माहिती मिळत नाहीं.

श्रीसाईबाबांनीं बालपणांत कडुनिंबाच्या झाडाखालीं तप केलें होतें असें सांगण्यांत येतें तर श्रीगुरुदेवांनीं बालपणांतच हिमालयांत जाऊन सहा वर्षें वानरी तप केलें होतें अशी माहिती दिली जाते. दोघांच्याहि बाबतींत या गोष्टीला पुराव्याचा आधार सांपडत नाहीं; पण दोघेहि जन्मतःच सिद्धपुरुष होते यांत शंका नाहीं.

या दोघांत दुसरें साम्य आहे तें त्यांच्या वास्तव्याबद्दल. साईबाबा सुमारें पन्नास वर्षें शिर्डीमध्येंच राहिले. या अवधींत ते फक्त शेजारच्या निमगांव व राहातें या दोन गांवांनाच अधूनमधून भेट देत होते.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 36802 दि: 7/7/77

नों दि:

श्रीगुरुदेवांनीं सर्व मंगळूर प्रांतांत संचार केला. त्याशिवाय त्यांनीं भारतांतील सर्व तीर्थक्षेत्रांना भेट दिली होती अशी माहिती मिळते. श्रीसाईबाबा औरंगाबादेहून शिर्डी येथें आले होते पण त्यांनीं त्यापूर्वी प्रवास केला नसेलच असें म्हणतां येत नाहीं.

पण या दोघां महापुरुषांनीं आपल्या वास्तव्यासाठीं शिर्डी आणि गणेशपुरीसारखीं लहान खेडींच पसंत केलीं. आणि त्यानंतर त्या स्थानांना फार मोठें महत्त्व प्राप्त झालें.

माहीतगार लोक सांगतात कीं, श्रीसाईबाबा प्रथम शिर्डीला गेले तेव्हां तें अगदींच लहानसें खेडें होतें, तेथले रहिवासी गरीब होते आणि सध्यां ज्या ठिकाणीं समाधिमंदिर, गुरुपादुका वगैरे आहे तेथें पूर्वी रानच होतें आणि सुरवातीला दर्शनासाठीं जाणाऱ्या भक्तांना कांटेकुटे तुडवून मोठ्या कष्टानें मार्ग काढावा लागत असे.

श्रीगुरुदेव गणेशपुरींत गेले त्यावेळीं तें स्थान कसें होतें याचें वर्णन आपण वाचलेंच आहे. शिर्डीमध्यें गणेशपुरीप्रमाणें वाघासारखीं क्रूर श्वापदें नसलीं तरी तेथें साप-विंचू वगैरे प्राण्यांचा तेथल्या जनतेला उपद्रव होत होताच, पण या दोघांच्या वास्तव्यानें त्या दोन स्थळांचा संपूर्ण कायापालट झाला आहे.

आज शिर्डी हें महाराष्ट्रांतील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र बनलें आहे. तेथें श्रीसाईबाबांची समाधि असल्यामुळें सर्व सुखसोयी उपलब्ध आहेत. त्या ठिकाणीं पोष्ट, टेलिफोन, शाळा, वाचनालय, पक्के रस्ते, बाजारपेठ, हॉटेलें आहेत. इकडे गणेशपुरी तर साक्षात् अमरपुरीच बनली आहे. या दोन्ही ठिकाणची सामान्य जनता आज पूर्वीपेक्षां अधिक पटीनें सुखी बनली आहे.

एक फरक मात्र जाणवतो तो हा कीं, साईबाबा समाधिस्थ झाल्यानंतर शिर्डीला आजचें वैभव प्राप्त झालें. बाबा तेथें असतांना त्या ठिकाणीं ज्या कांहीं इमारती बांधण्यांत आल्या होत्या, त्या त्यांच्या भक्तांनीं बांधल्या होत्या. उदाहरणार्थ, काकासाहेब दीक्षितांचा वाडा, नवलकरांचा वाडा, श्रीमंत बुटींनीं त्या ठिकाणीं बाबांच्या परवानगीवरून राधाकृष्णाचें मंदिर बांधलें होतें, त्याच ठिकाणीं आतां बाबांची समाधि आहे.

पण दुसऱ्या ठिकाणीं आमच्या गणेशपुरीच्या भगवंतानें स्वतःच रस्ते, धर्मशाळा, देवालयें, कुंडें, विहिरी, शाळा, पोष्ट वगैरे बांधकामें केलीं, त्या ठिकाणीं लागणारा पैसा त्यांनीं स्वतःच निर्माण केला, इतकेंच नव्हे, तर या कामासाठीं ते मजुरांबरोबर स्वतः राबले होते.

आणखी एक गंमतीचें साम्य आहे. सन १९३६ सालीं श्रीगुरुदेव गणेशपुरी येथें आले आणि तेव्हांपासून त्या स्थानाचा कायापालट होऊं लागला. आणि योगायोग असा कीं, त्याच सुमारास शिर्डीच्या आजच्या वैभवाचीहि सुरवात झाली होती.

चमत्कारांच्या बाबतींतहि या दोन महापुरुषांत साम्य आहे. साईबाबांनीं आपल्या भक्तांसाठीं अनेक चमत्कार केले होते. तेहि श्रीगुरुदेवांप्रमाणें जात-पात, धर्मभेद इत्यादि न मानतां अखील मानव जातीच्या कल्याणासाठीं अहोरात्र झटत होते, त्यांनींहि अनेकांच्या मनोकामना पूर्ण केल्या होत्या. कित्येकांचे दुःसाध्य रोग बरे केले होते. मानवाची सत्प्रवृत्ति जागरूक होऊन त्याचें देवाधर्माकडे लक्ष लागावें यासाठीं तेहि झटत होते.

गणेशपुरीच्या भगवंतानें चमत्कारांच्याबाबतींत मात्र बाबांच्याहि पुढें आघाडी मारलेली दिसते. पण दुःखितांना सुखी बनविणें अभाविकांना भाविक बनवून त्यांची धर्मावर आणि परमेश्वरावर श्रद्धा जडविणें हें श्रीसाईबाबांचें कार्य श्रीगुरुदेव बेफाम वेगानें करीत असलेले दिसतात.

बाबा पायघोळ कफनी चढवीत आणि डोक्याला शुभ्र वस्त्र बांधीत तर श्रीगुरुदेव फक्त लंगोटीवरच भागवितात. बाबा स्वतः आपल्या पेहेरावाच्या बाबतींत उदासिन असणारच पण ते भक्तांच्या आग्रहामुळें स्वतःची पूजा-अर्चा करवून घेत होते. दर गुरुवारीं त्यांच्या अंगावर मौल्यवान वस्त्रें आणि नानाप्रकारचे अलंकार चढविण्यांत येत असत आणि त्यांची द्वारकामाईपासून चावडीपर्यंत मिरवणूक काढण्यांत येत असे. असें म्हणतात कीं, तो पालखीचा सोहळा मोठा नेत्रदीपक असे.

गणेशपुरीचा महात्मा मात्र तसल्या फंदांत कधींच पडला नाहीं. श्रीगुरुदेवांनीं भक्तांकडून आपली पूजाअर्चा करविली नाहीं कीं, मिरवणूकहि काढली नाहीं. जे कुणी भक्त फुलें, नारळ इत्यादि वस्तु घेऊन जातात

त्या गुरुदेवांपासून कांहीं अंतरावर ठेवाव्या लागतात आणि त्या लागलीच गोरगरिबांना आणि मुलांना वाटण्यांत येतात. श्रीगुरुदेव त्यांतील कशाला स्पर्शहि करीत नाहींत. या ठिकाणीं विरक्तपणा अगदीं कळसाला पोंहोंचलेला दिसतो.

साईबाबांना कधीं पैशाचा तोटा नव्हता, ते आपल्या कफनीच्या खिशांत हात घालीत आणि त्यांची इच्छा होईल त्याला वाटेल तितके पैसे देत असत, पण ते भक्तांनीं दिलेल्या दक्षिणेचा स्वीकार करीत इतकेंच नव्हे तर कांहीं वेळां दक्षिणेसाठीं भक्तांजवळ हट्टहि धरीत.

गणेशपुरीच्या श्रीगुरुदेवांनांहि कधींच पैशाची उणीव पडत नाहीं. ते कुबेराचे मालक आहेत आणि तो त्यांच्या पायांजवळ हात जोडून उभा आहे असें दिसतें. त्यांनीं कुणाजवळची एक पैहि न घेतां लक्षावधि रुपयांचीं बांधकामें केलीं हें आपण पाहिलें आहे. आज गणेशपुरीला भेट देणारे भक्त त्या ठिकाणीं कांहीं पैसे ठेवीत नाहींत असें मला म्हणावयाचें नाहीं. कुणीहि भक्त रिक्त हस्तानें आपल्या देवाचें दर्शन घेत नसतो.

श्रीगुरुदेवांना दुसऱ्यांच्या पैशाची गरजच नसते. भक्तांकडून मिळणाऱ्य पैशाचा उपयोग बालभोजन गृहासाठीं करण्यांत येत असतो. त्या ठिकाणींा रोज हजारों मुलांना अन्नदान करण्यांत येतें हें मी पूर्वीं सांगितलेंच आहे. यासाठीं बाहेरचा पैसा अपुरा पडला तरी कांहीं बिघडण्यासारखें नाहीं, कारण श्रीगुरुदेव वाटेल त्या दगडाखालीं हवा तितका पैसा निर्माण करूं शकतात हेंहि आपण पाहिलेंच आहे.

शिर्डी संस्थानची मला प्रत्यक्ष माहिती आहे. तेथल्या व्यवस्थापकांशीं माझा जवळचा संबंध आहे. त्या संस्थानचें प्रति वर्षाचें उत्पन्न तीन ते पांच लक्ष रुपयांपर्यंतचें आहे. गणेशपुरींतहि शिर्डीप्रमाणें सरकारी नियमानुसार श्रीगुरुदेवांनीं एक ट्रस्ट निर्माण केला आहे, पण माझ्या माहितीप्रमाणें तेथील वार्षिक उत्पन्न दहा-पंधरा हजारांपेक्षां जास्त नाहीं.

कारण या ठिकाणीं धनसंचय करण्याची प्रवृत्तीच नाहीं, जें कांहीं तेथें जमा होतें तें तेथल्या बालकांसाठीं आणि गरजू लोकांसाठीं खर्च होतें. त्यामुळें गणेशपुरीच्या वैभवाला कोणताहि उणेपणा न येतां तें उलट अधिकच खुलून दिसतें.

या ठिकाणी भक्तांकडून दिले जाणारे फक्त नारळच विकले तरी दररोज दोन-अडीचशें रुपयांचें उत्पन्न होईल पण तसें घडत नाहीं. ते फोडून त्यांची खिरापत मुलांना वाटण्यांत येते. मेवामिठाईची आणि इतर वस्तूंचीहि तीच गत आपल्या स्थानाचें पावित्र्य राखण्यासाठीं हिशेबी श्रीगुरुदेवांनीं सर्व अनर्थांचें मूळ जो पैसा त्यास अशाप्रकारें दूर ठेवला आहे.

या दोघांहि महापुरुषांनीं भक्तांना निरनिराळ्या स्वरूपांत दर्शन घडविलें आहे. दोघांनीं कधीं स्वमुखानें प्रचार केला नाहीं. पण त्यांच्या दर्शनांतच इतकें सामर्थ्य आहे कीं, हजारों व्याख्यानापेक्षां त्यांचें तें मूक व्याख्यान प्रभावी आहे.

श्रीसाईबाबा नेहमी आपल्या मशिदींत बसत असत. श्रीगुरुदेव कैलास आश्रमामध्यें बसलेले आहेत, ज्यांची पात्रता नसेल अशांना श्रीसाईबाबांचें दर्शन घडत नसे. " माझी इच्छा नसताना माझ्या मशिदीची पायरी कोण चढू शकेल ? " असें बाबा म्हणत असत, त्याचप्रमाणें " माझी इच्छा होईल त्याला मी पायाला दोरी बांधून पांखराप्रमाणें फड्फड्त ओढून नेईन. " असेंहि ते म्हणत असत आणि त्याप्रमाणें घडतहि असे.

गणेशपुरींतहि तोच प्रकार आढळतो. श्रीगुरुदेवांची इच्छा असल्याशिवाय त्यांचें दर्शन घडणें शक्य नसतें असा अनुभव अनेकांना आणि खुद्द मलाहि आला अहे.

श्रीसाईनाथांच्या आणि भगवान श्रीनित्यानंदांच्या चरित्रांतील साम्यस्थळें दाखवितांना त्यांच्या सामर्थ्यांची तुलना करण्याचा विचार माझ्या मनांत येणेंच शक्य नाहीं, कारण मी त्या दोघांत भिन्नताच मानीत नाहीं.

श्रीगुरुदत्तात्रयांपासून विश्व कल्याणासाठी जी एक शक्ति निर्माण झाली आहे ती आतां श्रीगुरुदेवांच्या स्वरूपांत पूर्ण विकसित झाली आहे असें मी मानतों.

ही एकच अति जाज्वल्य अशी परंपरा आहे. प्रथम महासाध्वी अनसूयेचे सुपुत्र श्रीदत्तात्रय, नंतर कृष्णा नदीच्या तीरावर सांप्रतच्या युगांतील दत्तावतार श्रीश्रीपाद श्रीवल्लभ यांच्या रूपानें प्रकट झाला. त्यांनीं जें सद्धर्म रक्षणाचें कार्य सुरू केलें तेंच गाणगापूर येथें अवतार धारण करून श्रीनृसिंह सरस्वतींनीं पुढें चालू ठेवलें.

त्यानंतर गोदावरीच्या तीरावर पैठण येथें श्रीएकनाथांनीं भागवत धर्माचा प्रसार करण्यासाठीं आपलें सारें जीवन खर्च केलें, नंतर हुमणाबाद येथें तेंच कार्य पुढें चालू ठेवण्यासाठीं श्रीमाणिक प्रभु अवतरले आणि त्यापुढें श्रीअक्कलकोट स्वामी यांनीं आपलें गहनचरित्र जगाला दाखविलें.

त्यानंतर शिर्डीचे साईबाबा यांनीं पूर्वींच्या या महात्म्यांची परंपरा चालू ठेवली आणि आतां तेंच कार्य अतुलनीय तेजानें आणि अत्यंत प्रभावीपणें गणेशपुरी येथें श्रीगुरुदेव करीत आहेत.

एखादें सुंदर पुष्प हळूहळू विकसित होत जावें आणि त्याचा सुगंध दश दिशांना दरवळावा त्याप्रमाणें या सर्व मागील अवतारांचें तेज आणि सामर्थ्य प्रखर उत्कटतेनें श्रीगुरुदेवांच्या स्वरूपांत प्रकट झालेलें पहावयास मिळतें. म्हणूनच मी त्यांना साक्षात् भगवंत, चालू काळांतील श्रीगुरु दत्तात्रयांचा प्रत्यक्ष अवतार मानतों.

म्हणून जो कुणी या गणेशपुरीच्या महात्म्याचें, भूतलावर अखिल मानव जातीच्या कल्याणासाठीं सगुण स्वरूप धारण करणाऱ्या भगवंताचें श्रद्धेनें दर्शन घेईल त्याच्या सर्व मनोकामना पूर्ण होतील.

• • •

## : १२ : श्रीगुरुदेवांची अमृतवाणी !



श्रीगुरुदेवांचें आतांपर्यंतचें कार्य आणि त्यांचें दर्शन इतकें बोलकें आहे कीं त्यांनीं प्रवचन करण्याची किंवा कांहीं उपदेश करण्याची आवश्यकताच नाहीं.

पण श्रीगुरुदेवांच्या मुखांतून बाहेर पडलेलीं कांहीं वाक्यें ऐकावीं, निदान त्यांचा एखादा शब्द तरी कानीं पडावा अशी प्रत्येक भक्ताला तळमळ लागलेली असते. आपल्या मनांत एखादी शंका उद्भवल्यानंतर त्यासंबंधीं श्रीगुरुदेवांचें म्हणणें काय, हें जाणून घेण्यासाठीं तो उत्सुक आणि अधिरा बनतो.

श्रीगुरुदेव १९५७ सालच्या बुद्ध जयंतीच्या दिवशीं कैलास आश्रमांत रहावयास गेले. त्यापूर्वीं ते मोकळ्या जागेंत बसत असत आणि अनेकांशीं एखाद दुसरा शब्द बोलत असत, त्यामुळें त्या माणसाला तर परमानंद होत असेच; पण इतरांनाहि श्रीगुरुदेवांची अमृतवाणी ऐकण्याचा लाभ होत असे.

आतां ते कैलास आश्रमांत राहूं लागल्यामुळें अनेकांना आपलें पूर्वीचें सुख हिरावून घेण्यांत आलें आहे असें वाटतें. पण सध्यांहि आश्रमांत जाऊन त्यांचें दर्शन घेणाऱ्यांचे तसेंच भाग्य असलें तर श्रीगुरुदेव त्यांच्याशी बोलतीलहि. श्रीगुरुदेव आश्रमांत रहावयास गेले म्हणून त्यांनीं मूकव्रत धारण केलेलें नाहीं.

ज्या भक्तांना श्रीगुरुदेवांचें बोलणें ऐकावयास मिळत नाहीं अशासाठीं मी हें प्रकरण लिहीत आहे. यांत त्यांच्या पवित्र मुखांतून निघालेल्या कांहीं वचनांचा संग्रह केला आहे.

श्रीगुरुदेव मंगळूर येथें असतांना अधुन मधून कांहीं बोलत असत. ते

चालत असतांना बोलत, त्यावेळीं तुळसाम्मा नांवाच्या भगिनीनें श्रीमुखांतून बाहेर पडणारे शब्द लिहून घेण्याचा प्रयत्न केला होता. त्यासाठीं त्या बिचारीला श्रीगुरुदेवांच्यामागून धांवावें लागत असे आणि त्यामुळें तिला कांहीं शब्द स्पष्ट ऐकूंहि येत नसत.

या तुळसाम्मा थोर कुळांतील होत्या आणि सुविद्य होत्या. श्रीगुरुदेवांवर त्यांची नितांत श्रद्धा होती आणि त्यांची चिकाटीहि जबरदस्त होती. पण त्यांनीं श्रीगुरुदेवांचें जें बोलणें लिहून घेतलें आहे तें अधुन मधून तुटक, कधीं मधलेच शब्द गाळलेले असें आहे, त्यामुळें कांहीं वाक्यांचा अर्थ लावणेंहि बिकट आहे.

तुळसाम्मानीं श्रीगुरुदेवांची ही चिदाकाशगीता प्रथम कानडीमध्यें प्रसिद्ध केली आणि श्रीगुरुदेवांच्या वाक्यापुढें अर्थ स्पष्ट करण्यासाठीं स्वतःचीं टिपणें जोडलीं. ही चिदाकाशगीता नंतर इंग्रजींत व मराठींतहि प्रसिद्ध करण्यांत आली. मराठी आवृत्तीच्या आधारें मी श्रीगुरुदेवांच्या कांहीं वचनांचा या प्रकरणांत संग्रह केला आहे.

तुळसाम्मानीं श्रीगुरुदेवांच्या भक्तांवर हे अनंत उपकारच केले आहेत. त्या अलिकडेच चिदानंदस्वरूपीं लीन झाल्या असें समजतें, पण चिदाकाशगीतेमुळें त्या अमर झाल्या आहेत. या गीतेमुळेंच कित्येक विषयांसंबंधीं श्रीगुरुदेवांचें काय म्हणणें आहे तें समजावून घेण्याची सोय झाली आहे.

या छोट्या प्रकरणांत चिदाकाशगीतेचा संपूर्ण भावार्थ देणें शक्य नाहीं. जिज्ञासू वाचकांच्या विचारांना चालना मिळावी या हेतूनें श्रीस्वामी मुक्तानंदजींच्या सूचनेवरून श्रीगुरुदेवांच्या अमृतवाणीचा कांहीं भाग मी संक्षेपानें येथें लिहिला आहे. पण तो वाचून ज्यांचें समाधान होणार नाहीं अशा जिज्ञासूंनीं चिदाकाशगीताच वाचली पाहिजे.

आतां यानंतर श्रीगुरुदेवांचीं वचनें सांगण्यास सुरवात करतों.

**ज्ञानी कसा असावा ?**—" ज्ञानी माणसाचें मन विषयांत गुरफटलेलें नसतें, तें बुद्धींत लीन झालेलें असतें. त्याला सर्व वस्तूंत आत्मस्वरूपच दिसत असतें. त्याला निद्रा, स्वप्न, सुषुप्ति नसते. तो नेहमी आत्मानंदाच्या तंद्रींत मग्न असतो. त्याला अंधार माहीतच नसतो त्यांच्या हृदयांत सर्वकाळ ज्ञानरूपी सूर्याचा प्रकाश पसरलेला असतो. "

" दिव्याची कांच जर काळी पडली तर चांगला प्रकाश पडत नाहीं म्हणून जीवन प्रकाशित बनविण्यासाठीं मनुष्यानें मनावर चढलेली विकारांची काळिमा नष्ट केली पाहिजे. "

" माणसानें विद्या शिकायलाच हवी. पण ती विद्या कोणती ? परमात्मस्वरूप म्हणजे काय तें अभ्यासाने जाणलें पाहिजे. "

" मातीचें भांडें पाण्यानें भरलें तर त्यांत वरच्या आकाशाचें प्रतिबिंब दिसतें त्याप्रमाणें स्वतःच्या हृदयांत जर श्रद्धेनें डोकावाल तर तुम्हांला चिदाकाश चिदात्म दिसूं शकेल. "

" वृक्षाला खूप फुलें येतात पण तीं अल्पजीवी ठरतात. वृक्ष तितक्या लवकर नष्ट होत नाहीं. विषयसुखाच्या कल्पना फुलांप्रमाणें नष्ट होणाऱ्या असतात पण हृदयांतील सूक्ष्म ज्ञानविचार त्या वृक्षाप्रमाणें शरीर नाहींसे होईपर्यंत टिकत असतात. "

" मनुष्यानें मानापमानाचा त्याग केला पाहिजे. त्यानें आपल्या देहाचाहि अभिमान सोडला पाहिजे. असा जो त्याग करील त्याला आत्म्याचें ज्ञानस्वरूप दिसेल. "

" अग्नि, वायु, जल किंवा भूमि आपापसांत भेद भाव करीत नाहीं. एकाच नळांतून वहाणारें पाणी ब्राह्मण, महार, स्त्री, पुरुष मुलें या सर्वांना घेतां येते. त्याप्रमाणेंच भक्तिज्ञानविचार करण्याचा अधिकार सर्व माणसांना सारखाच असतो. "

" आपलें मन हें तिळासारखें आहे. त्याला बुद्धिरूपी घाण्यांत भरडून ज्ञानामृतरूपी तेल बाहेर काढलें पाहिजे.

" थंड पाण्यांत खोल बुडी मारल्यानंतर ज्याप्रमाणें थंडी वाजत नाहीं त्याप्रमाणें ज्याला पूर्ण आत्मज्ञानाचा अनुभव येतो त्याला क्रोध स्पर्श करूं शकत नाहीं. "

**गुरु कसा असावा ?**—" जो माणसाला जंगलांतील कांट्याकुट्यांनी भरलेल्या चिंचोळ्या पाऊलवाटेवरून राजमार्गावर आणून सोडतो तोच गुरु. गुरूचे दोन प्रकार आहेत. एक कारण गुरु आणि

दुसरा कार्यगुरु. जो हृदयरूपी विहिरींतून भक्तिज्ञानरूपी पाणी कसें काढावयाचें ते शिकवितो तो कारणगुरु. दुसरा जो प्रत्यक्ष कार्य करणारा गुरु असतो तो म्हणजे माणसाचें मनच...कारण. प्रत्यक्ष कार्य मनच करीत असतें. तेव्हां माणसाचा खरा गुरु त्याच्याच हृदयांत लपलेला असतो. तुम्ही त्याच आत्मारामाला शोधून काढा."

"आपण देहभावना म्हणून गुरूचा शोध करीत असतो. ज्याच्या पायांत पादुका नाहींत, हातांत माळ नाहीं, जो तोंडानें खूप ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगतो, पण हातांत धोंडा देतो तो गुरुच नव्हे. गुरूनें प्रथम केलें पाहिजे व नंतरच ते दुसऱ्याला सांगितलें पाहिजे."

"जो देहसुखाच्या कल्पना विसरतो, विषयसुखापासून संपूर्ण अलिप्त रहातो तोच गुरु. सद्गुरूपेक्षां कुणींहि श्रेष्ठ नाहीं. गुरु म्हणजे देव आणि देव म्हणजेच गुरु अशी श्रद्धा ठेवली पाहिजे."

**मुक्ति कशी मिळेल ?**—"साखर शरिराच्या कोणत्याहि भागावर ठेवण्यांत उपयोग नसतो. ती जर जिभेवर ठेवली तरच तिची चव समजणार. त्याप्रमाणेंच आपण सहस्र वर्षें तोंडानें रामकृष्ण, गोविंद म्हणत राहिल्यानें मुक्ति मिळणार नाहीं. आपलें मन एकाग्र करून जर देवाचा जप केला तरच ती मिळेल."

"गाईचें दूध कधीं कडू असतें काय ? त्या प्रमाणेंच मनःपूर्वक केलेली भक्ति अमृताहूनहि गोड असते. दगडांत किंवा मातींत देव नसतो, ती केवळ मनाची भ्रांति आहे. तुम्हीं काशी–रामेश्वरापर्यंत सर्व तीर्थयात्रा केली तरी मुक्ति मिळणार नाहीं. आत्मार्पण करणें हाच मनुष्य जन्माचा हेतु आहे. म्हणून माणसानें आत्मध्यान करून सत्यस्वरूप समजावून घेतलें पाहिजे."

"ज्याला दार नसेल तें घरच नव्हे. अग्नि नसला तर पाणी तापणार नाहीं, पण वायु नसला तर अग्नि चेतणारच नाहीं. माणसानें निद्रा–भोजन वगैरेचा त्याग केला तर त्याला किती दिवस जगतां येईल ? आपणांला प्राणवायूशिवाय पांच पळेंहि जगतां येणार नाहीं."

"म्हणून सद्गुरुकृपाकटाक्षाचे बुद्धिविवेक स्थान सोडतां कामा नये.

पाण्यांतलें सूर्याचें प्रतिबिंब सारखें हालत असतें. सूर्य स्थिर असतो, पण प्रतिबिंब हालतें. त्याप्रमाणें आपलें मन स्थिर बनविलें पाहिजे. तें प्रतिबिंबाप्रमाणें हालतां कामा नये."

"सागरांतील पाण्याला मर्यादा नसते, पण सरोवराच्या पाण्याला मर्यादेचें बंधन असतें. तसेंच मनाला बंधन घातलें पाहिजे. चांगलें आणि वाईट हीं दोन्हीं कार्यें मन करीत असतें. मनुष्याला आपली उन्नति साधतां येईल किंवा अधोगतीलाहि पोहोचतां येईल. देव कुणाला अज्ञानी ठेवीत नाहीं आणि ज्ञानीहि बनवीत नाहीं. बुद्धि आणि ज्ञान हे देवाचें अंश आहेत. चांगले विचार करणाऱ्या माणसाला बंदुकीच्या गोळीनेंहि अपाय होणार नाहीं पण त्यासाठीं योगसाधन केलें पाहिजे तरच बाह्यकर्में करण्याची इच्छा नष्ट होईल."

**संन्यासी कोण?**— "मर्म न जाणतां चर्माला म्हणजेच शरिराला संन्याश्याचा वेष देण्यांत काय अर्थ? जो विचारानें मर्म जाणतो, मनांतील विचारांचा वाचेनें उच्चार करतो व त्या उच्चाराप्रमाणें आचार करतो तोच संन्यासी. जो कोणत्याहि प्रकारच्या आशेचा त्याग करतो तोच ज्ञानी, परमहंस, योगी आणि संन्यासी.

"जे श्वासधारणा करूं शकत नाहींत ते योगी-संन्यासी नव्हेत. नावेला सुकाणू नसलें तर ती योग्य ठिकाणीं नेतां येणार नाहीं. आपले विचार चांगले असले तर आपणाला सारें जग चांगलें दिसेल. म्हणून चांगले विचार करण्यासाठीं प्रयत्नपूर्वक साधना केली पाहिजे."

**महात्मा कोण?**— "सर्व विषयसुखांचा त्याग करून जो योग-साधनानें आत्मज्ञानाचा अनुभव घेतो तोच ज्ञानी. इतरांच्या तोंडून ज्ञान ऐकून आत्मज्ञानानुभवाचा आनंद लाभणार नाहीं. दगडाच्या आणि मातीच्या प्रतिमेच्या मागें लागणारे ते महात्मे नव्हत. जो आपल्या हृदयस्थ आत्म्याला ओळखूं शकतो तोच महात्मा."

**अवधूत कोण?**— "अवधूत हा इच्छामरणी असतो. तो आपल्या इच्छेनुसार देहत्याग करूं शकतो. अवधूताला तुर्यावस्थेच्या साक्षीरूप-ज्ञानाचा अनुभव असतो. तो माणसांत रहातो, माणसांना पाहून त्याला

संतोष होतो; पण त्याच्याठायीं देहविचार भावना नसते. तो गांवांत फिरतो पण त्याला भूक नसते. मिळालें तर तो भरपूर खातोहि; पण मिळालें नाहीं तरी त्याला त्याची खंत नसते, त्याच्या दृष्टीनें विष देणारीं आणि दूध देणारीं, त्याच्यावर प्रेम करणारीं आणि त्याला मारणारीं माणसें सारखींच असतात. त्याला हें जग पित्याप्रमाणें रक्षण करणारें, मातेप्रमाणें प्रेमानें पालन करणारें आणि बंधूप्रमाणें कैवार घेणारें पाठीराखे दिसतें. तो तन्मयतेनें स्वतःमध्येंच जगदाधार आत्म्याला पहात असतो."

**हटयोग आणि राजयोग**—"हटयोगांत स्वार्थ असतो. त्यांत आपलें नांव झालें पाहिजे अशी इच्छा असते. आपली इच्छा नसली तर उद्यां सूर्योदय होता कामा नये आणि माती-दगडाचा पर्वत सोन्याचा बनला पाहिजे असे हटयोग्याला वाटते. पण 'अहं ब्रह्मास्मि' असें म्हणणें न्याय्य नाहीं. सर्व जगाचा आधार परब्रह्मस्वरूपच आहे म्हणून सर्वत्र परमात्माच व्यापकतेनें भरून राहिला आहे असा विचार करणेंच योग्य. आपण योगी तर सर्वच योगी म्हणून जाणलें पाहिजे. इतर सर्व आपल्यासारखेच आहेत या कल्पनेनें त्यांच्याकडे पाहिले पाहिजे.

"योग्यानें स्वतःला गुहेंत कोंडून घेण्यांत काय अर्थ? त्यानें खाल्लें तर इतरांचें पोट भरेल काय? इतर सर्वांना अज्ञानाच्या अंधःकारांतून ज्ञानरूपी प्रकाशांत आणून सोडणें हें त्याचें काम आहे. तसेंच फलाशेनें सहस्र वर्षें तप केलें तरी त्यांत फायदा नाहीं. एक घटकाभर तन्मय होऊन ध्यान केलें तर त्यांत जास्त फायदा आहे.

"हटयोग हा निखंड आहे म्हणून कनिष्ठ आहे. राजयोग हा अखंड आणि श्रेष्ठ आहे. कोणतेंहि आचरण आपणच करीत असतो म्हणून दंभाचरण करूं नये. पाण्याचें मीठ बनतें पण तें पाण्यांत मिसळले तर वितळतें. तसेंच आत्मस्वरूपांतून निर्माण झालेली माया पुन्हां आत्मस्वरूपांतच लीन होत असते."

**मोक्षपुरुषार्थाचा उत्तम उपाय**—"चांगलीं पिकलेलीं केळीं खावयास मधुर लागतात पण तींच कची असलीं तर तुरट लागतात. पाहिलें तर तीं एकाच झाडाचीं फळें, पण चव निरनिराळी लागते याचें 'वेळ'

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे [illegible]
अनुक्रम [illegible]



[illegible] एकच कारण आहे. याप्रमाणेंच स्वानुभविक माणसाचें भाषण मधुर असतें, ग्रंथाधारानें केलेलें भाषण गोड लागणार नाहीं. तसेंच सर्व माणसें एकाच परमात्म्याची मुलें असताना कांहीं ज्ञानी तर कांहीं अज्ञानी दिसतात याचें कारण ' वेळ ' हेंच आहे. म्हणून सद्गुरूला शरण जाऊन ज्ञानप्राप्ति केली पाहिजे. नाहींतर माणूस अपरिपक्व, अज्ञानीच राहील.

" पण नारळ मातींत पुरतांच त्याचें झाड होत नाहीं. त्याला प्रथम मोड फुटतो, नंतर त्याचा वृक्ष बनतो. त्याचप्रमाणें सद्गुरूला शरण जाऊन त्याचा उपदेश घेताच ज्ञानप्राप्ति होत नाहीं. जेव्हां दृढविश्वास निर्माण होऊन सूक्ष्म ज्ञानविचार खोल रुजतात तेव्हांच अनुभवज्ञान मिळतें. कोवळा नारळ हात लावताच गळून पडतो त्याप्रमाणें मन स्थिरत्व पावण्यापूर्वी दुसऱ्याचें बोलणें ऐकून चंचल बनते. पण नारळ पक्क झाल्या-नंतर तो पडत नाहीं. तसेंच मन स्थिर होऊन पवित्र बनल्यानंतर कोणीं कांहींहि सांगितलें तरी स्थिरच रहातें. मनाला स्थिर बनविलें तरच मोक्षाची म्हणजेच पुरुषार्थाची प्राप्ति होत असते.

" हें उद्दिष्ट समोर ठेवल्यानंतर स्वतःचा प्राण जाण्याचा प्रसंग आला तरी घाबरता कामा नये. आपण आपल्या मनानेंच मनाला मार देऊन तें स्थिर बनविलें पाहिजे. छडी, हात यांनी मनाला मारणार कसें आणि दोरानें तें बांधणार कसें ? तेव्हां सूक्ष्मरूपी मनाला बुद्धीच्या दोरीनें बांधलें पाहिजे. हाच मोक्षपुरुषार्थ साधण्याचा उत्तम उपाय आहे. "

**साधकानें कसें वागावे ?**—" तूं कोण आहेस म्हणजेच तुझा जीवात्मा कोण आहे हें तूंच सूक्ष्म ज्ञानविचारानें पुन्हां पुन्हां शोधून पहा. हे भेदभावाचे शब्द नाहींत तर समभावनेचे आहेत म्हणजेच आत्मप्रेम-भावनेचे शब्द आहेत. तुझ्या अंतरांत गुप्त असणाऱ्या आत्मस्वरूपाला सूक्ष्मज्ञानविचारदृष्टीनें, अनुभवानें पाहिलें पाहिजे. बाह्यजगाकडे चर्म दृष्टीला सूक्ष्मज्ञानाग्नीमध्यें घालून जाळून टाक, कारण ती भेदबुद्धिच मरणकालीं कष्ट देणारी असते.

" मनुष्या, जर तूं सर्वांकडे समान भावानें पहात असलास तर तुला सुखानें मरण येईल. आत्मवस्तु ही शाश्वत आणि परमानंद देणारी आहे.

साधका, तूं सूक्ष्मविचारानें आत्मस्वरूपाचे चिंतन कर आणि नित्यानंद देणाऱ्या त्या आत्मस्वरूपीं आनंदसागरांत राहून आत्मारामाचें महत्त्व जाणून घे.

" तुझ्या हृदयांतील इडा, पिंगला आणि सुषुम्ना या ज्ञान नाड्यांच्या सहाय्यानें आत्म्याच्या प्रभावाचें वर्णन कर आणि आत्मज्ञानानंद देणारी ज्ञानकुंडलिनी जागृत कर. बुद्धिरूपी आगपेटीमध्यें ज्ञानरूपी काडी असते, ती घासली कीं ज्ञानाग्नीचा प्रकाश पडेल. तूं ती काडी घासून ज्ञानाग्नि प्रज्वलित कर. ज्ञानविचारांचे विस्मरण होणें हें अज्ञानरूपी अंधार आहे. ज्ञानशक्ति सदा आनंदाचा अनुभव देणारी असते.

" आपल्या हृदयांत ज्ञानसूर्याचा प्रकाश देणारी जी नाडी असते, तीच सुषुम्ना, हृदयांत चंद्राचा शीतल प्रकाश पसरविणारी नाडी तीच इडा आणि हृदयाकाशांतील नक्षत्रें दाखविणारी जी नाडी ती पिंगला. आपल्या ज्ञानदृष्टीची नाडी सुषुम्ना असते, तिच्यांत ज्ञान असतें म्हणून त्या ज्ञाननाडींतच सर्व विचारांना अडकवून निद्रा करावी, बाहेरचें सर्व विसरून जागृतावस्थेंत निद्रा करावी, आणि श्वासोच्छ्वासावर दृढ विश्वास ठेवून आत्मज्ञान अनुभवाचें निजानंदसुख ज्ञानदृष्टीनें पहावें व त्या आनंदांत मिसळून जावें.

" बोलतां–चालतांना आणि बसतांनाहि मनांतील वेगवेगळ्या कल्पना दूर सारून ही निद्रा करावी. ही निद्रा मृगाची किंवा मूढत्वाची नसावी, तर अतिसूक्ष्म ज्ञान-विचारांची, माणसाची निद्रा असावी. या निद्रेंत स्थिर, पवित्र मनानें जप, ध्यान, निष्काम प्रेमभक्ति करावी आणि मुक्ति प्राप्त करावी, एक क्षणहि न दवडतां आत्मारामाची अखंड भक्ति करावी, आपला श्वास विश्वासरूपी पाशानें सारखा वर-खालीं ओढावा.

" हें श्वाससाधन पुस्तकें वाचून कधीं करूं नये. त्यासाठीं सद्गुरूला शरण जावें, या श्वासोच्छ्वासाच्या साधन प्रयत्नानें ज्ञानाग्नि प्रज्वलित करावा, सर्व नाड्या शुद्ध कराव्या, वात, पित्त, कफ ज्ञानाग्नींत जाळून टाकावा. योगसाधनानें प्राप्त झालेल्या या ज्ञानाग्नीला योगाग्नि म्हणावें.

" आपण खाल्लेलें अन्न पचविणारा जठराग्नि असतो, पण सूक्ष्म ज्ञान-विचारानें निर्माण झालेला हा योगाग्नि सूर्यासमान प्रभायुक्त असतो.

" ज्ञानशक्तीच्या स्वरूपानें आणि परमात्म्याच्या अंशानें जगांतील सर्व प्राण्यांत व्यापकत्वानें भरून असलेल्या शक्तीला चैतन्यमय जग म्हणावें. मनाच्या कल्पनेनें दिसणारें बाह्य जग सत्य नाहीं. सर्व प्राणिमात्रांत आत्मा भरलेला असतो अशा समभावनेच्या सूक्ष्म ज्ञानविचारामध्यें या सृष्टीची कल्पनाच असत नाहीं. "

" आपल्या चित्तांतील वृत्तींना स्वतःच्या हृदयांत खेळविणारा श्रेष्ठ असतो. तोच मनुष्य या पदाला पात्र असतो. तोच परमात्म स्वरूपाच्या अनुभवाचा आनंद भोगीत असतो. आपलें मन जर बाह्य जगांत फिरत राहिलें तर ते कधींहि स्थिर होणार नाहीं. तें हृदयामध्यें बंद करून साक्षीस्वरूप शिवाकडे प्रेमानें पाहूं लागलें तरच स्थिर होईल. "

" हृदयांतील स्वानुभवाच्या ज्ञानानें माणूस मनुष्य बनण्यास पात्र होतो. सूक्ष्म ज्ञानविचारानें जें ज्ञान प्राप्त होतें तें ब्रह्मज्ञान. राजयोगाच्या साधन-प्रयत्नानें साधकाला मिळणारें आत्मज्ञान तें योगज्ञान होय आणि ज्या ज्ञानाच्या अनुभवानें काळाचें भय नाहींसें होतें तें कालज्ञान होय.

" हृदयामध्यें भूत, भविष्य आणि वर्तमान काळाचेंहि ज्ञान अनुभवतां येतें. त्रिकालज्ञान म्हणतात तें तेंच. हृदयामध्येंच जिवाला त्रिगुणमाया-बंधनांतून सोडविणारी मुक्ति आहे. ती सदा आनंद, सुख प्राप्त करून देणारी नित्यानंद मुक्ति होय. "

**आत्माराम कसा दिसेल?**—" आपण हातानें जप करतों तो चांगला नाहीं, तोंडानें उच्चार करतों तो जपहि उत्तम नव्हे. तशा जपानें शिवस्वरूप समजणार नाहीं, हातापायांच्या हालचालीनें कर्म होत नाहीं, म्हणून मनानें निष्काम कर्म करीत रहा, प्रारंभीं निराशाहि होईल; पण अंतरांतील ज्ञानदृष्टीनें सारखें शोधीत रहा, म्हणजे तुम्हांला आत्माराम दिसेल. "

**अस्पृश्य कोण?**—" माणूस जन्माला येतांना श्वास बरोबरच घेऊन येतो. तो श्वास उडून गेला कीं, त्याचा कारभार आटोपतो. देह हा केवळ

मातीचा पिंजरा आहे आणि शेवटीं तो मातींतच मिसळणार आहे. सर्व प्राणीमात्रांत एकच सूक्ष्मज्ञानबीज-शक्ति व्यापून असते. प्रत्येकाच्या वृत्तींत भेद दिसतो. ती मनाची भ्रांति आहे आणि ती स्थिर नसून नाशिवंत आहे. दिसणारे आणि ऐकणारे सर्वच नाशिवंत असतें.

" दुसऱ्याला महार, अस्पृश्य म्हणणें ही मनाची भ्रांतिच आहे. तोहि तुमच्यासारखाच माणूस आहे. पण कुणी त्याच्याबरोबर एका चटईवर बसणार नाहीं किंवा त्यानें स्पर्श केलेली वस्तु खाणार नाहीं आणि एकाचें पाहून दुसराहि त्याचें तसेंच अनुकरण करतो. पण जो दुसऱ्याला अस्पृश्य समजतो तो स्वतःच अस्पृश्य असतो. सर्व माणसें एकाच परमेश्वरापासून निर्माण झालीं आहेत, त्यानें तीं निरनिराळ्या कार्याकरितां निर्माण केलीं आहेत. त्यांतील एकाला उच्च आणि दुसऱ्याला नीच समजणें अज्ञानाचें लक्षण आहे. "

" माणसांत प्रथम श्रद्धा निर्माण होते, नंतर भक्ति उत्पन्न होते. जेथें श्रद्धा नसेल तेथें भक्तीहि नसेल, एकाग्रतेनें विचार करणें यालाच श्रद्धा म्हणतात. "

" सर्पासारख्या प्राण्यालाहि अंतर-प्राणायाम असतो. तो पुंगीचा आवाज कान देऊन ऐकत असतो. त्याचप्रमाणें साधकानें एकाग्रतेनें अंतरीचा पुंगीनाद ऐकला पाहिजे. गाईचें वासरावर अतिशय प्रेम असतें. त्याप्रमाणें ज्ञानी माणसानें सर्व प्राण्यांवर समान प्रेम केलें पाहिजे. "

" ज्याला दार नसेल तें घरच नव्हे. मन हें शरिराचें दार आहे. पण मनरूपी दरवाजा स्थिर नसेल तर देहरूपी घराचा चांगला उपयोग होणार नाहीं. "

" चांगलें पात्र नसेल तर चांगला स्वयंपाक होणार नाहीं. त्याप्रमाणें बुद्धि हें पात्र स्थिर झाल्याशिवाय ज्ञानानुभवाचा स्वयंपाक तयार होणार नाहीं. "

" सोन्याच्या पात्रांत स्वयंपाक केला किंवा तो मातीच्या पात्रांत केला तरी कुत्र्याच्या दृष्टीनें तें दोन्ही पात्रांतील अन्न सारखेंच. श्रीमंत लोक

सोन्याच्या पात्रांत स्वयंपाक करतील, गरीब मातीच्या पात्रांत करतील, पण त्या अन्नानें दोघांचेंहि पोट भरूं शकतें. ”

“ जो ज्ञानी असतो त्याला श्रीमंतीचें महत्त्व वाटत नाहीं आणि गरीबींत कमीपणा दिसत नाहीं, त्याच्या दृष्टीनें ते दोघे सारखेच असतात. तो दोघांकडेहि समभावानेंच अन्न ग्रहण करील. पांखरांना उद्यांचा विचार नसतो ज्ञानीहि कधीं उद्यांचा विचार करीत नाहींत. ”

“ आपण एखाद्या पेटीमध्यें जर बीज बंद करून ठेवलें तर त्याला अंकुर फुटणार नाहींत आणि वृक्ष बनून त्याला फळेंहि लागणार नाहींत. तुम्हीं सद्‌गुरूपासून ज्ञानोपदेश बीज मिळविलेंत, पण स्वतः साधन-प्रयत्न न करतां तें तसेंच ठेवलेंत तर त्यापासून अनुभव मिळणार नाहीं आणि तृप्तिहि होणार नाहीं, फळांसाठीं बीज मातींत पुरावें लागतें, तसेंच सर्वप्रकारच्या साधन प्रयत्नानें ज्ञानबीजाला अंकुर फोडावे लागतात. माणूस स्वतःच्या प्रयत्नानें सुखी बनतो आणि आळसानें दुःखी बनतो.

“ अंधारांत चालत असतांना भीति वाटते. प्रकाशांत ती भीति नसते. अंधार म्हणजे अज्ञान आणि तो नाहींसा करणारा दिवा म्हणजे ज्ञान. हा दिवा म्हणजेच गुरु. ”

चिदाकाशगीतेमधील गुरुदेवांच्या अमृतवाणीचा कांहीं भाग मी या प्रकरणांत उद्‌धृत केला आहे. हा वाचून विचारी वाचकांना आनंद होईल आणि ते सन्मार्गप्राप्तीच्या हेतूनें प्रयत्नशील बनतील अशी मला आशा वाटते.

● ● ●

# : १३ : श्रीगुरुदेवांचा आदेश



कोणताहि ग्रंथ अनेक प्रवृत्तीच्या वाचकांच्या हातीं जातो आणि वाचक आपल्या आवडीनिवडीप्रमाणें आणि बुद्धिमर्यादेप्रमाणें त्यांतील कांहीं भाग अधिक आवडीनें वाचतो आणि स्मरणांतहि ठेवतो.

या चरित्राचे वाचकहि नाना प्रवृत्तीचे असणार. त्यांतील जे साधक असतील त्यांना गुरुदेवांची अमृतवाणी वाचतांना अपूर्व आनंद होईलच. श्रीगुरुदेवांनीं सर्वांना समजेल अशा अगदीं सोप्या भाषेंत उपदेश केला आहे. पण योगमार्गाकडे वळणाऱ्या साधकांना आपला मार्ग स्पष्ट दिसावा या हेतूनें आणखी कांहीं लिहिणें आवश्यक आहे असें मला वाटतें.

मी स्वतः ज्ञानी किंवा अधिकारी नसल्यामुळें माझे सद्‌गुरु श्रीमुक्तानंद स्वामी यांनींच माझ्या वाचकांना श्रीगुरुदेवांचा आदेश समजावून देणें योग्य होईल असें मला वाटतें. स्वामी मुक्तानंदजी हे श्रीगुरुदेवांचे सत्‌शिष्य असल्यामुळें हा आदेश देण्याचा अधिकार त्यांनाच आहे.

श्रीस्वामी मुक्तानंदजींनीं हा आदेश हिंदींत लिहिला होता. त्यांच्या परवानगीनें मी त्याचें मराठीकरण करून तो साधकांसाठीं या प्रकरणांत देत आहे.

(१) हे मनुष्या, तूं स्वतःला ओळख.

(२) तूं पंचकोशाला ओळखणारा, त्याचाच साक्षी निर्मल आत्मा आहेस.

(३) परमात्म्याचा अंश अजर, अमर, सच्चिदानंद आत्मा तूंच आहेस असें समज.

(४) जो जगाचा पिता परःशिवा तो तुझ्या हृदयकमलांतच विराजमान झालेला आहे, त्याला तूं आपल्या ज्ञानचक्षूंनीं पहा.

(५) तूं जो स्वतःला स्थूल शरीररूप समजतोस तो तूं नव्हेस, तूं त्याचा केवळ साक्षी आहेस.

(६) यजुर्वेद मंत्र "अहम् ब्रह्मास्मि" असें सांगतो कीं, जो परम ज्योतिस्वरूप परमात्मा आहे तोच तुझा आत्मा आहे.

(७) "तत्त्वमसि" महावाक्य शिकवितें कीं, तत्पद् परमात्मा तूंच (तुझा आत्मा) आहेस.

(८) "अयमात्मा ब्रह्म" आत्मा जो तुझ्या मनाला साक्षी आहे. तोच सर्वेश्वर परमात्मा आहे असें श्रुतींत सांगितलें आहे.

(९) "प्रज्ञानं ब्रह्म" प्रज्ञान घन आत्मा सच्चिदानंद स्वरूप परमात्मा आहे असें ऋग्वेदांत सांगितलें आहे.

(१०) श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ सद्गुरु, जे परमज्योतिस्वरूप आहेत त्यांच्याकडून तूं हें समजून घे.

(११) भवतारक श्रीसद्गुरु नित्यानंद समर्थांच्या चरणकमलाचें तूं निरंतर स्मरण कर !

(१२) वेदाच्या पुढें ज्ञान नाहीं आणि सद्गुरूंहून उत्तम ईश्वर नाहीं हें तूं समजून घे !

(१३) श्रीरामचन्द्र आणि श्रीकृष्ण ईश्वराचे अवतार होते. त्यांनीसुद्धां श्रीवशिष्ठ आणि श्रीसांदीपनींसारख्या महात्म्यांना गुरु करून त्यांची सेवा केली. तूं सुद्धां असेंच कर !

(१४) गुरुसेवेनेंच अष्टसिद्धी आणि नवनिधि प्राप्त होते आणि विद्या देखील गुरुसेवेच्या उपासकाची दासी बनून रहाते.

(१५) हरिहर ब्रह्मस्वरूप श्रीसद्गुरूंच्या मूर्तीबरोबर निरंतर तुझ्या मनाचें एकीकरण कर.

(१६) सात कोटि महामंत्रांची माता "ॐ नमः शिवाय" या तारक मंत्राचा निरंतर जप कर.

( १७ ) 'यज्ञानां जपयज्ञोस्मि ' सर्व पुण्यमय यज्ञांत जपयज्ञ परमात्मा स्वरूप आहे.

( १८ ) दोषयुक्त हलाहल कलियुगांत संसारसागराच्या तडीपार नेणारी नौका भगवंताचें नामस्मरण ही आहे.

( १९ ) दुर्लभ मनुष्य शरीर आणि क्षणभंगुर जीवनाला समजून घे आणि श्रीनित्यानंदाला शरण जाऊन मनुष्यजन्माचें सार्थक कर.

( २० ) नश्वर जगताला न मानतां शाश्वत ब्रह्मरूप बनविणाऱ्या श्रीसद्गुरु नित्यानंदांना मान आणि त्यांना विसरून कृतघ्न बनूं नकोस.

( २१ ) दृश्य सृष्टींत सूक्ष्म रूपांनीं सर्वत्र व्यापलेल्या श्रीसद्गुरु नित्यानंदांना जाणून सर्वांचा सन्मान कर !

( २२ ) जेव्हां आत्म्याचें यथार्थ स्वरूप तूं जाणशील तेव्हां सर्व आत्मा " मीच आहे " असें तुला वाटूं लागेल !

( २३ ) आत्मज्ञानाशिवाय तीन्ही लोकांत सुख कुठेंहि नाहीं हें तूं समज.

( २४ ) "ज्ञानात्तु परंगति !" तुझ्या आत्म्याचें तुला ज्ञान होईल तेव्हां तुझ्या आत्म्यांतच तुला संपूर्ण ब्रह्मांड दिसेल ! " आत्मा **दर्धीकम न किंचित्.** "

( २५ ) मनाच्या पाशवी वृत्तीचा त्याग कर आणि श्रीसद्गुरूच्या शास्त्रोक्तिप्रमाणें आचरण कर !

( २६ ) जग तुला तूं जसें त्याला पाहतोस तसेंच पाहील. हें जगाचें धन इथेंच राहतें म्हणून तूं अशा धनाची प्राप्ति कर कीं जें परलोकांत तुला साथ देईल.

( २७ ) सर्व कर्माचा परिणाम निश्चित आहे, यासाठीं तुझ्या हिता-करितां सत्कार्य करण्यास सुरवात कर.

( २८ ) पापतापाचा नाश करून सद्गति देणारा ' ॐ नमः शिवाय ' हा तारक महामंत्र आहे त्याचा तूं निरंतर जप कर.

( २९ ) सर्व शक्तींचे मूळ आत्मशक्तीला श्रीसद्गुरूंकडून प्राप्त करून घे.

( ३० ) जागृति, स्वप्न, सुषुप्तीचे व्यापार ज्याच्याकडून तूं समजावून घेतोस तेंच आत्मतत्त्व आहे आणि गुरुदेवहि तेच आहेत.

( ३१ ) श्रीसद्गुरूंच्या कृपेशिवाय आत्मशक्ति प्राप्त करणें अशक्य आहे. यासाठीं गुरुकृपापात्र बनण्याचा प्रयत्न कर.

( ३२ ) मनोवांच्छित कोणत्याहि गोष्टीपेक्षां श्रीगुरुकृपा श्रेष्ठ आहे.

( ३३ ) श्रीगुरुकृपेपेक्षां अधिक प्राप्त करण्यायोग्य गोष्ट जगांत नाहीं.

( ३४ ) नाशवंत तन, मन, धन गुरुसेवेला अर्पण करून शाश्वत ब्रह्मांत एकरूप होऊन जा.

( ३५ ) जात, कुळ, गोत्र कर्मामध्यें लीन शरीर मी नाहीं. परंतु निर्मल साक्षी आत्मा " मीच आहे " असा अनुभव घे.

( ३६ ) परःशिवाप्रमाणे परमेश्वर, स्तुतीसारखी पूजा, षडाक्षरीसारखा मंत्र आणि गुरुतत्त्वासारखें तत्त्व या सृष्टींत कुठेंहि नाहीं.

( ३७ ) विषयाचें चिंतन करणाऱ्या मूढ मनाला एकाग्र करून शिवस्मरण करण्यांत लीन हो.

( ३८ ) सर्व सत्कर्माचें फळ श्रीसद्गुरु नित्यानंदांच्या चरणकमलांत आहे असें समजून तूं त्यांचें ध्यान कर.

( ३९ ) गुरु हाच आईबाप, बंधुभगिनी, स्वधर्म, कर्म आहे असें समजून तूं स्वतःला त्यांच्या चरणकमलीं अर्पण कर.

( ४० ) सच्चिदानंदघन, जगाचा प्रारंभ, स्थिति, लय, रक्षक हे निर्गुण ब्रह्म आहेत तेच सगुण श्रीगुरुमूर्ति आहेत असें तूं जाण.

( ४१ ) जी वस्तु तूं अर्पण करूं इच्छितोस तीच स्वतः हो व तूं स्वतःलाच सद्गुरूंना अर्पण कर.

( ४२ ) जो भयानक असा संसाररूपी समुद्र पार करणें कठीण आहे तो श्रीनित्यानंद नामरूपी महानौकेंत बसून सुखानें पार कर.

( ४३ ) श्रीसद्गुरूंना मनुष्य समजणें महापाप आहे म्हणून त्यांना परःशिव समज.

( ४४ ) जशी मनाची स्थिति तशी गति यासाठीं मीच परमेश्वर आहे अशी भावना निर्माण कर. " या मतिः सा गतिः "

( ४५ ) काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे नरकाचे दरवाजे आहेत म्हणून तूं त्यांचा त्याग कर.

( ४६ ) सत्संग, नामस्मरण, श्रीगुरुसेवा, समान दृष्टि या स्वर्गाच्या पायऱ्या आहेत म्हणून तूं त्या आचरणांत आण.

( ४७ ) नराचे नारायण, जीवाचे शिव, पुरुषाचे पुरुषोत्तम कर्ता श्रीसद्‌गुरूंना विसरून दुराचरणी होऊं नकोस.

( ४८ ) नऊ द्वारांवाटे मल बाहेर फेकणाऱ्या या मांसल देहाचा अभिमान टाकून श्रीसद्‌गुरूंच्या चरणीं मस्तक नमव.

( ४९ ) विश्वास ठेव ईश्वर आहे, सर्वव्यापक आहे आणि सर्वशक्ति-मान आहे.

( ५० ) ईश्वर सर्व प्राणिमात्रांचा आत्मा आहे असें समजून सर्वांचा सन्मान कर.

( ५१ ) सर्व देश, सर्व पंथ व सर्व धर्मांचा ईश्वर एक आहे.

( ५२ ) वेद–उपनिषद्–पुराण–कुराण–बायबल इत्यादींत त्याचें एका-चेंच प्रतिपादन आहे.

( ५३ ) ईश्वरप्राप्तीचा अधिकार सर्वांना आहे. नामसाधन सर्वांत श्रेष्ठ व सुलभ आहे.

( ५४ ) भावयुक्त प्रार्थनेनें परमेश्वर संतुष्ट होतो.

( ५५ ) जगांत ईश्वरप्राप्तीसारखा लाभ नाहीं.

( ५६ ) मनुष्य जन्माचा अंतिम उद्देश ईश्वरप्राप्तिच आहे.

( ५७ ) मृत्यूची नागवी तलवार नेहमींच मस्तकावर झुलत आहे. सावधान होऊन हरीचें भजन कर !

( ५८ ) हें वतन शाश्वत नाहीं, न्यायानें आयुष्य घालव.

( ५९ ) जोंपर्यंत शरीरस्वास्थ्य आहे, म्हातारपण दूर आहे तोंपर्यंत भजन कर.

( ६० ) कालाचें मोल जाणून समयाचा सदुपयोग भजन कर-ण्यांत कर.

( ६१ ) कलिकालाचा परमधर्म ईश्वराचें नामस्मरण आहे. "**कलौ नामसंकीर्तियो केशव ।**"

(६२) भगवंताचें नाम आणि भगवंत एकच आहे. नामामध्यें नाम। चैतन्य निजधाम।

(६३) नामस्मरणांत जिव्हेला ईश्वराचाच प्रत्यक्ष स्पर्श होतो.

(६४) ईश्वराचें नांवहि चिन्मय आहे. " नामा म्हणे नाम। चैतन्य निजधाम।"

(६५) नामस्मरणानें परमशांति मिळते म्हणून ईश्वराचें अखंड भजन कर.

(६६) पाप आणि पतनाचें मूळ आहे विषयचिंतन आणि विषयांत सुख-बुद्धि!

(६७) अंतर्यामी स्वरूपांत ईश्वर सर्वांच्या हृदयांत आहे म्हणून सर्वांचा सत्कार कर.

(६८) जेथें निर्वैर प्रेम आहे तेथें ईश्वर आहे. जगद्रूपांत जगदीशच आहे.

(६९) जनतेंत जनार्दनच सर्व लीला करीत आहे म्हणून कुणाचीहि अवहेलना करूं नकोस.

(७०) सर्व कार्यांत प्रभूची पूजा होऊं शकते, जर आपण त्यांत लपलेल्या ईश्वराला पाहूं शकलों तर!

(७१) घरांतले सर्व लोक ईश्वराची प्रतिमा आहे. घर ईश्वराचें मंदिर आहे.

(७२) सर्वत्र ईश्वरभावना ठेवल्यानें तीच गति प्राप्त होते.

(७३) सत्संगच संसारसागर तरून जाण्यासाठीं नौका आहे.

(७४) संतांच्या हृदयांत ईश्वर वास करतो. संतांचें हृदय ईश्वराचें घर आहे.

(७५) संत नेहमीं निर्वैर, काम आणि क्रोधविरहित असतात; क्रोध, द्वेष अज्ञानाचीं लक्षणें आहेत.

(७६) कुसंगाला सत्संग मानून फसूं नकोस.

(७७) जी सर्व अनर्थांना उत्पन्न करणाऱ्या संसाराचा नाश करते, संसाराला कारणीभूत अविद्येला शिथिल करते व ब्रह्माची प्राप्ति करविते तीच ब्रह्मविद्या आहे. तिला श्रीगुरूंकडून प्राप्त कर.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.



(७८) तोच सर्वेश्वर प्रभु आहे की, जो चराचराचा शासक आणि भूत–भविष्य–वर्तमानादि कालत्रयाचें अंतर्बाह्य सर्व वस्तुभाव जाणतो तोच आपला आत्मा आणि श्रीगुरुदेव आहेत.

(७९) श्रीगुरुदेवांचा अंतिम आदेश श्रवण करा व त्याप्रमाणें आचरण करा.

(१) नेहमीं सत्य बोला.
(२) धर्माचें आचरण करा.
(३) स्वाध्याय विसरूं नका.
(४) आचार्यांना (गुरुदेवांना) विसरूं नका.
(५) सत्यापासून ढळूं नका.
(६) शुभकर्में त्यजूं नका.
(७) इतरांना देवरूप समजा.
(८) अतिथीला देवतुल्य माना.
(९) आचार्यांत देवबुद्धि बाळगा.

(८०) जीं निर्दोष कर्में आहेत त्यांचें सेवन करा, नेहमी वृद्धांचा सन्मान करा हा गुरुदेवांचा आदेश आहे, ही शास्त्राची आज्ञा आहे, हा गुरुजनांचा शिष्यांना उपदेश आहे, हेंच परंपरागत शिक्षण आणि वेदांचें रहस्य आहे.

(८१) सर्व भूतांमध्यें गुह्यरूपानें असणारा तुमचा अंतरात्मा परमेश्वर आहे. त्याची सोऽहम् भावनेनें पूजा करा हा श्रीगुरुदेवांचा आदेश आहे.

(८२) जो चेतनेचेहि चेतन आहे आणि नित्याचाहि नित्य आहे तो चिदात्मा श्रीगुरुदेव तुझा अंतरात्मा आहे, त्याला कधींहि विसरूं नकोस असा श्रीगुरुदेवांचा आदेश आहे.

सर्वेत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखमाप्नुयात् ॥ राजा शिबि.

[ अर्थः—सर्व सुखी व्हा, निरोगी व्हा, सर्वांचें कल्याण होवो, कुणालाहि दुःख न होवो. ]

● ● ●

: १४ :

# श्रीगुरुदेवांचें रहस्य



सुमारें सोळा वर्षें नित्य रहस्यकथा-लेखन करीत असल्यामुळें अंगीं पात्रता नसतांनाहि श्रीगुरुदेवांचें रहस्य शोधून काढण्याचा मोह मनाला होतो. आपण आतांपर्यंत श्रीगुरुदेवांचें चरित्र वाचलें. अर्थात या लहानशा पुस्तकाला श्रीगुरुदेवां-सारख्या महात्म्यांचें चरित्र म्हणून उल्लेखणें हें योग्य होणार नाहीं. एकतर, हें चरित्र कुणातरी तितक्याच अधिकारी व्यक्तीनें लिहावयास हवें होतें आणि दुसरें चरित्रामध्यें सर्व सामान्यपणें ज्या कांहीं गोष्टी असाव्या लागतात त्या सर्वच यांत नाहींत.

हें चरित्र लेखन करतांना मला आनंद होत होता, आपल्या हातून कांहीं विशेष घडत आहे असा थोडासा अहंकारहि माझ्या मनाला स्पर्श करीत होता, पण ते लिहितांना मला अधुनमधून अडखळावेंहि लागत होतें. कारण अशाप्रकारचें चरित्र लिहितांना लेखकामध्यें जी पात्रता असायला हवी ती माझ्यामध्यें नव्हती.

सोळा वर्षें रहस्यकथा लेखनांत गुरफटल्यामुळें मी कधीं तत्त्वज्ञानाचा, वेदांताचा अभ्यास केला नाहीं. फारसे धर्मग्रंथ आणि साधुसंतांचीं चरित्रेंहि मला वाचतां आली नाहींत आणि योगसाधना म्हणजे काय, याची मला जवळ जवळ मुळींच माहिती नाहीं. फक्त एवढेंच म्हणतां येईल कीं, मी अज्ञानाच्या अंधःकारांत चाचपडणारा आहे. याची मला जाणीव आहे आणि ज्ञानाचा प्रकाश दिसावा अशी इच्छा बाळगणाऱ्यांपैकीं मी एक आहे.

असें असतांनाहि मी हें चरित्र लिहूं शकलों याचें सर्व श्रेय परमपूज्य स्वामी श्रीमुक्तानंदजी यांना आहे. त्यांनींच माझ्याकडून हें सारें लिहवून

घेतलें आहे असें म्हणणेंच योग्य होईल. शिवाय माझ्या बाबांचे आशीर्वाद माझ्या पाठीमागे उभे होते हेंहि सत्य आहे.

हें चरित्र कसें लिहिलें गेले हाहि एक चमत्कारच आहे. माहिती मिळविण्यासाठीं मला दूरवर प्रवास करावा लागला नाहीं किंवा फार कष्टहि करावे लागले नाहींत. मला हवी असलेली माहिती भराभर मिळत गेली. शेवटीं मला गोंधळांत पाडणारे कांही प्रश्न शिल्लक राहिले होते, त्यांची मी माझ्या डायरींत नोंद केली व ते सोडविण्यासाठीं गणेशपुरी येथें गेलों. त्या ठिकाणीं कुणी माहितगार मिळाला तर पाहूं असें मी ठरविलें होतें.

पण बाबांची लीला किती अगम्य आहे हें मला त्यावेळीं पहावयास मिळालें. मीं वसई स्टेशनावर उतरून गणेशपुरीला जाणाऱ्या एस्. टी. च्या बसमध्यें बसलों आणि माझ्या शेजारीच बसलेल्या एका गृहस्थांनीं आपण होऊनच माझ्याशीं बोलण्यास सुरवात केली. मी त्यांना त्यापूर्वीं कधींच पाहिले नव्हते. बोलणें सुरू झाल्यानंतर बाबांच्याच गोष्टी निघाल्या. आणि त्यांनी मला स्वतः होऊनच माहिती सांगण्यास सुरवात केली. आश्चर्य असें कीं, मी गणेशपुरीला पोहोंचण्यापूर्वींच माझ्या सर्व प्रश्नांचीं उत्तरें मिळालीं होतीं.

हें चरित्र किती अवधींत लिहिलें तेहि पहाण्यासारखें आहे. जानेवारीच्या पहिल्या आठवड्यांत ते लिहिण्यास सुरवात केली आणि तें मार्चच्या पहिल्या आठवड्यांत संपविलें. या दोन महिन्यांच्या कालावधींत मी माझा नेहमींचा व्यवसाय सोडला नव्हता. मला सवाशें ते एकशेचाळीस पृष्ठांच्या पांच रहस्य-कथा याच काळांत पूर्ण कराव्या लागल्या. बाबांची इच्छा नसती तर हें लेखन माझ्या हातून घडणेंच शक्य नव्हतें.

श्रीगुरुदेवांच्या चरित्राला गंगानदीची उपमा द्यावी लागेल. स्वामी मुक्तानंदजींच्या कृपेनें मी त्या पवित्र गंगेच्या काठावर बसूं शकलो. सद्भाव-पूर्ण श्रद्धेनें मी माझ्या दोन्ही हातांच्या ओंजळींत कांहीं गंगाजळ उचललें. त्या ओंजळींतील घोटभर पाणी म्हणजे पवित्र गंगानदी नव्हे त्याप्रमाणेंच या चिमुकल्या पुस्तकांत जें कांहीं लिहिले आहे तें बाबांचें चरित्रहि नव्हे. त्यांच्या देदीप्यमान चरित्राचा तो लहानसा भाग आहे.

पण एक गोष्ट निश्चित आहे कीं माझ्या ओंजळींत धरलेलें सामान्य जल नसून गंगाजल आहे आणि त्यांतील प्रत्येक थेंबांत जगाचा उद्धार करण्याचें सामर्थ्य सामावलें आहे.

या चरित्रांत श्रीगुरुदेवांच्या वयाचा अंदाज बांधण्याचा प्रयत्न केला आहे. ते वज्रेश्वरी येथें येईपर्यंत कांहीं सन व महिने दिले आहेत पण ते सर्व अंदाज तर्काच्या आधारानें केले असल्यामुळें थोडे-फार चुकण्याचा संभव आहे. कांहीं मागच्या गोष्टींचें वर्णन पुढें तर पुढच्यांचें मागें असेहि झाले असेल पण त्यामुळें जें कांहीं घडलें त्याला बाधा येत नाहीं कारण तें सर्वच सत्य आहे.

साऱ्या जगानें थक्क व्हावें असे नेत्रदीपक चमत्कार श्रीगुरुदेवांनीं घडविले आहेत व ते अद्यापहि घडत आहेत यावरून ते जन्मतःच सिद्ध आहेत हें सिद्ध होतें. त्यांनीं पंचमहाभूतांवर कसा विजय मिळविला हें आपण पाहिलें आहे.

त्यांना अग्नि स्पर्शहि करूं शकत नाहीं, ते पाण्यावरून चालतात, अधांतरी चालतात, ते एकाच वेळीं अनेक ठिकाणीं असूं शकतात, त्यांना नद्याहि मान देतात, वाघ, सर्प वगैरे प्राणीहि त्यांच्या आज्ञा मानतात आणि कुबेर त्यांच्या आज्ञेंत आहेच, या संबंधीच्या सत्य गोष्टी आपण आतापर्यंत वाचल्या आहेत.

श्रीगुरुदेव त्रिकालज्ञानी आहेत यासंबंधींचा एक अनुभव सांगतों. अगदीं अलिकडेच कांहीं वकील मंडळी त्यांच्या दर्शनासाठीं गणेशपुरी येथें गेली होती. त्यांत एक न्यायाधीशहि होते. श्रीगुरुदेव ध्यानस्थ असल्यामुळें त्या मंडळींनीं हलक्या आवाजांत गप्पागोष्टी करण्यास सुरवात केली. त्यावेळीं पॅरीसमध्यें भरलेल्या शिखर परिषदेसंबंधी ते बोलत होते.

श्रीगुरुदेवांनीं अचानक बोलण्यास सुरवात केली आणि ते त्याच विषयावर बोलूं लागले. रशियन अपघातानें उतरलेल्या अमेरिकन विमानांतील गुप्त हेराजवळ कोणत्या प्रकारची साधनसामुग्री होती याचे त्यांनीं इतकें तपशीलवार वर्णन केलें कीं एका खेड्यांतील आश्रमांत स्वतःला कोंडून घेणाऱ्या त्या महात्म्याला ती माहिती कशी, याचें त्या वकील मंडळींना आश्चर्य वाटलें.

त्यानंतर त्यांनीं ॲटम, हैड्रोजन बॉम्बबद्दल बोलण्यास सुरवात केली. कधीं वर्तमानपत्रें न वाचतां जगांतील अगदीं अद्यावत घटनांची त्यांना माहिती

असते. ते रवीन्द्रनाथांच्या गीतांजलीबद्दल बोलतात, कोणत्याहि शास्त्राबद्दल अधिकारवाणीनें मतप्रदर्शन करतात आणि ऐकणारा संभ्रमांत पडतो कीं त्यांनीं कोणत्या शाळेंत जाऊन तें ज्ञान मिळविलें असेल ?

ते लौकिकदृष्ट्या, स्नान, भोजन, निद्रा करीत असले तरी त्यापासून ते अलिप्त आहेत. त्यांना क्षुधा, तृषा, निद्रा यांचा उपसर्ग नाहीं. इतकेंच काय पण त्यांना त्यांच्या देहाचाहि पूर्ण विसर पडलेला असतो. स्नान करायचें तें भक्तांना शुचिता शिकविण्यासाठीं, आपण कांहीं खाल्लें नाहीं तर भक्त उपाशी रहातील म्हणून चार घांस किंवा एखादें फळ भक्षण करावयाचें आणि सेवेकऱ्यांना जाग्रण घडूं नये म्हणून निद्रेचें सोंग करावयाचें. यापैकीं कशाचीहि त्यांना स्वतःला गरज नसते.

त्यांची लहर लागली तर ते नाना विषयावर बोलतात. मग ते मध्यरात्रीनंतरहि बोलत असतात, नाहीं तर सदा ध्यानमग्न असतात, कधीं डोळे उघडून कुणाकडे पहातहि नाहींत. पण त्यांना डोळे मिटून साऱ्या जगांत काय घडतें तें दिसतें, अगदी दूर शेंकडों मैलांवर असलेल्या भक्ताचें गाऱ्हाणें त्यांना ऐकूं जातें; याची शेंकडों उदाहरणें देतां येतील.

आणि स्वतःच्या देहाची मुळींच फिकीर न बाळगणारा, स्वतः लंगोटीशिवाय ( आणि तीहि भक्तांकरितां ) दुसरें वस्त्र न नेसणारा हा महापुरुष गेल्या अर्धशतकाहून अधिक काळ जें कार्य करीत राहिला आहे तें पाहिल्यास मन थक्क होतें.

या अवधींत त्यांनीं हजारों क्षुधितांना अन्न दिलें व वस्त्रें पुरविलीं, हजारोंना व्याधिमुक्त केलें व त्यांच्या नाना विवंचना दूर केल्या, कुणाला पुत्र दिले तर कुणाला कन्या दिली, शेंकडोंचे संसार सुखाचे बनविले, लहान मुलांवर तर इतकें अपार प्रेम करणारा संत आतांपर्यंत कधीं या भूलोकीं अवतरलाच नसेल.

ते स्वतः झाडाखालीं, राना-वनांत बसले; पण त्यांनीं भक्तांसाठीं, धर्मशाळा, विहिरी बांधल्या, शाळा-रस्ते तयार केले. आणि हें सर्व करतांना कुणाच्या पैलाहि स्पर्श केला नाहीं. ज्या कांचनगड येथें त्यांनीं आपलें

धर्मपीठ स्थापन केलें तें कसें जंगल होतें तें आपण वाचलें आहे. आज कांचनगड हें भरभराटीला आलेलें शहर बनलें आहे.

वज्रेश्वरी हा भाग तर किती मागासलेला होता. तेथें त्यांनीं भूलोकींवरील स्वर्ग कसा निर्माण केला हेंहि आपण पाहिलें आहे. या सर्व गोष्टी त्यांनीं सहज लीलेनें घडविल्या आणि आतां ते सदा ध्यानस्थ राहून भक्तांच्या मनोकामना पूर्ण करीत आहेत.

त्यांनीं लक्षावधि भक्तांचा भौतिक फायदा तर केलाच; पण खऱ्या धर्माची शिकवण दिली ती अपूर्व अशीच आहे. हजारों माणसें यांच्या केवळ दर्शनानें सन्मार्ग प्रवृत्त झालीं आहेत. त्यांची परमेश्वरावर निष्ठा बसली आहे आणि ते सद्धर्माचें पालन करूं लागले आहेत. हा त्यांचा प्रचार रात्रंदिन चालूच आहे.

हें सर्व पाहिले कीं माझ्यासारखा सामान्य माणूस विचार करूं लागतो कीं, ज्याला देव म्हणतात तो याहून कांहीं वेगळा असूं शकेल काय !

देव स्वतः कांहींच करीत नाहीं, तो फक्त तुमच्याकडे पहात असतो. असे ज्ञानेश्वरांनीं म्हटलें आहे. ईश्वरानें माणसाला बुद्धि दिली आहे तिचा तो उपयोग कसा करतो हें देव पहात असतो. असाच त्यांच्या म्हणण्याचा अर्थ आहे. माणसानें स्वतःच्या उद्धारासाठीं परमेश्वराला शरण गेलें पाहिजे.

सामान्य माणसांच्या मनांत ईश्वराबद्दल श्रद्धा निर्माण व्हावी हाच मंदिरें, धर्मस्थानें, प्रार्थनामंदिरें उभारण्यांत हेतु असतो. " प्रथम श्रद्धा निर्माण झाली तर मनुष्य देवाची भक्ति करूं लागतो. " असे खुद्द श्रीगुरुदेवांनींच म्हटलें आहे.

देवापासून आपण काय अपेक्षा करतों ? आपणाला संकटमुक्त करून आपल्या जीवनामध्ये शांति, समाधान निर्माण व्हावे, आपण सन्मार्गप्रवृत्त व्हावे आणि शेवटीं आपणाला सद्गति प्राप्त व्हावी हीच ती अपेक्षा. पण आपण एखाद्या मंदिरांत जाऊन देवासमोर उभे राहिलों तर तो देव आपणाशीं बोलत नाही, आपणांला हात उचलून आशीर्वादहि देत नाहीं. " देव त्या दगडांत किंवा मातींत नाहीं. " असें गुरुदेवांनीं सांगितलें आहे. तें मंदिर किंवा मूर्ती साधन असूं शकेल तें साध्य नाहीं.

देवापासून ज्या आपल्या अपेक्षा असतात त्या सर्व पूर्ण करण्याची शक्ति श्रीगुरुदेवांमध्ये आहे हें आपण त्यांच्या चरित्रावरून पाहिलें आहे. जें जें कांहीं देवानें केलें पाहिजे तें तें त्यांनी केले आहे व करीत आहेत म्हणून मी त्यांना प्रत्यक्ष देव, चालू युगांतील दत्तावतार मानतों आणि त्यांना भगवान श्रीनित्यानंद म्हणतों.

हा देव मला आवडतो कारण, मला त्याच्या चरणाजवळ बसून त्याची दिव्यवाणी ऐकतां येते, त्याचा आशीर्वाद मिळवितां येतो. या देवाकडे डोळे भरून पहातांना कंठ दाटतो आणि हृदयांत विलक्षण कालवाकालव होते. मला या चालत्या-बोलत्या, हंसऱ्या देवाचा मोठा धीर वाटतो.

वाचकहो, जर तुम्ही श्रीगुरुदेवांच्या जवळ गेलांत तर तुम्हांलाहि असाच अनुभव येईल. तुम्ही त्यांच्यावर श्रद्धा ठेवलीत, त्यांची भक्ति करूं लागला, त्यांच्या आदेशाप्रमाणें वागलांत, तर तुमच्या जन्माचें साफल्य तर होईलच पण तुमच्या जीवनांत निर्माण झालेल्या मांगल्यामुळें आपल्या आजुबाजूचें जगहि मांगल्यपूर्ण बनवूं शकाल.

हेंच श्रीगुरुदेवांचें रहस्य आहे.

●●●

## : १५ : श्रीगुरुदेवांचा दिव्य संदेश !



आज जगाला भीतीनें ग्रासलें आहे. माणसाला माणूस घाबरू लागला आहे. दुर्बलांना सबलाची भीति वाटावी हें निसर्गाला धरूनच आहे, पण आज जे सबल आहेत त्यांनाहि आपल्यापेक्षां दुसरा अधिक शक्तिमान बनून आपला नाश करील अशी भीति वाटत आहे. अमेरिका आणि रशिया या दोन राष्ट्रांमध्यें जी चढाओढ चालू आहे याचें कारण हीच भीति आहे.

आणि ही भीति नष्ट करण्यासाठीं मानवानें शोधून काढलेला उपाय कोणता ? इतरांना नष्ट करण्याची, त्यांचा समूळ संहार करण्याची, सर्व मुलूख बेचिराख करण्याची शक्ति कमाविणें, त्यासाठीं शास्त्रज्ञांची रात्रंदिवस धडपड चालू आहे. जास्तींत जास्त विनाश करणारीं भयानक अस्त्रें तयार करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

हें सर्व पाहिलें कीं, सामान्य माणूस बावरतो, हें असेंच चालू राहिलें तर काय होणार याचा विचार करण्यासहि तो घाबरतो. त्याच्या नजरेसमोर उभें रहाणारें कल्पनाचित्र भयानक असतें. एकमेकाच्या भीतीमुळें जो तो दुसऱ्याच्या विनाशाचाच विचार करीत असलेला दिसून येतो.

माणसांना अशी एकमेकांची भीति कां वाटावी ? कारण मानवी जीवनांतील विश्वास, श्रद्धा आणि प्रेम या गोष्टीच नाहींशा झाल्या आहेत. पहिल्या महायुद्धानतर रशियानें एक नवीन तत्त्वज्ञान तेथल्या जनतेला शिकविलें आणि त्यांतूनच आज जगाला भेडसावणारी भीति निर्माण झाली.

मानवाच्या प्रगतीपथावरील देव आणि धर्म या अडगळी आहेत असें समजून रशियानें त्यांना दूर झुगारलें, माणसाला देवाची कधीं गरजच लागत

नाहीं आणि धर्म ही त्याला अज्ञानाच्या गुंगींत ठेवणारी अफूची गोळी आहे. असें रशियानें तेथील जनतेला शिकविलें, इतकेंच नव्हे तर देव म्हणून कुणी शक्तिच नाहीं, असेंहि त्यांनीं सांगितलें.

रशियाच्या तत्कालीन परिस्थितीकडे पाहिल्यास हें तत्त्वज्ञान त्या काळाला योग्य होतें असें त्याचें समर्थन करतां येईल. आपणच देवाचे लाडके सुपुत्र आहोंत म्हणून रशियन अमीर–उमराव तेथल्या गरीब जनतेला पिळून काढीत होते आणि आपण प्रत्यक्ष परमेश्वराचा अंश आहोंत असें बोलणारा झार त्यांच्यावर जुलूम करीत होता. तेथले पाद्रीहि अज्ञ जनतेवरील आपला पगडा कायम ठेवण्यासाठीं या जुलूमाचा पाठपुरावा करीत होते आणि देवाचीच तशी इच्छा आहे असें तेथल्या अंधश्रद्धाळु जनतेला सांगत होते.

या परिस्थितीमुळें देव आणि धर्म यांच्या भीतींतून जनतेची मुक्तता केल्याशिवाय ती जुलूमाविरुद्ध बंड पुकारणार नाहीं हें साम्यवादी पुढाऱ्यांनीं ओळखून तेथें आपलें नवीन तत्त्वज्ञान प्रस्थापित केलें आणि तेथली झार–शाही उलथून टाकण्यांत यश मिळविलें.

केवळ रशियांतीलच नव्हे तर आज त्याचा प्रतिस्पर्धी समजणाऱ्या अमेरिकेंतहि देव आणि धर्म या केवळ शोभेच्या वस्तू बनल्या आहेत. अमेरिकन राष्ट्राची नीतिमत्ता किती खालावली आहे याचीं उदाहरणें आपण वाचतों तीं अंगावर शहारे आणण्यासारखीं असतात. तेथल्या शाळा-कॉलेजांतील विद्यार्थी–विद्यार्थिनीहि सुखोपभोगाच्या लालसेनें स्वैर व्यभिचार करतात असें अधिकारी लेखकांनीं लिहिलें आहे.

नाताळसारख्या सणाच्या दिवशीं एकट्या न्यूयार्क शहरामध्यें मदिरा-पानानें बेहोश बनल्यामुळें शेंकडों माणसें मोटार अपघातांत प्रतिवर्षी ठार होतात हें आपण वर्तमानपत्रांत वाचतों आणि हें सर्व वाचल्यानंतर देव धर्म मुळींच न मानणारे रशियन कितीतरी पटीनें बरे असें वाटूं लागतें.

केवळ रशिया-अमेरिकेंतच नव्हे तर इतर सर्व राष्ट्रांत आणि बहुतेक सर्व धर्मांची परिस्थिति अशीच आहे असें दिसून येतें आणि त्यामुळें सुविद्य

माणूसहि बावरतो, तर सामान्य माणसाची काय अवस्था होत असेल याची कल्पना करणें बरें.

आज भौतिक लालसांनीं जग झपाटलें आहे. देव आणि धर्म यावरील मानवाची श्रद्धा नाहींशी होऊं लागली आहे. १९१८ सालापासून जी साम्यवादी विचारसरणी प्रसृत झाली, त्यामुळें मानवाच्या या दोन मोठ्या मानबिंदूंना जबरदस्त धक्का बसला.

त्यामुळें सत्याचें महत्त्व कमी होऊन जग असत्याच्या मागें धावूं लागलें आहे आणि त्यामुळेंच माणसाला माणसाची भीति वाटूं लागली आहे.

आज शेंकडों वर्षें पृथ्वीच्या पोटांतली खनीज संपत्ति माणूस सतत खणून काढीत आहे, त्यांतील कोळसा लवकरच संपणार असें भूगर्भ शास्त्रज्ञ सांगूं लागले आहेत. अणुशक्तीनें तयार केलेलें एक टन जळण तीस लक्ष टन कोळशाचें काम करूं शकतें, पण ही अणुशक्ति आपल्या घरांत दिव्याचा प्रकाश पसरविणार आहे कीं, जगाचें कत्तलखान्यांत रूपांतर करणार आहे तें समजत नाहीं.

अशा या सध्यांच्या अंधःकारमय परिस्थितींत घाबरलेल्या मानवाला श्रीगुरुदेवांचा दिव्य संदेश ऐकूं येतो, " घाबरूं नकोस, या जगांत ईश्वर आहे ! "

आणि हा संदेश ऐकल्यानंतर बावरलेल्या मनांतील गोंधळ नाहींसा होतो, जर ईश्वर आहे, तर तो वाट चुकलेल्यांना खचित सन्मार्गावर आणून सोडील, असा विश्वास निर्माण होतो.

आपला भारत देश पुरातन काळापासून आमच्या संत महात्म्यांच्या पुण्याईनें अध्यात्मिक पायावर उभा आहे, पण आज निरनिराळ्या भौतिक संशोधनामुळें सर्व जग फार लहान बनलें आहे. त्यामुळें कुठल्याहि कोपऱ्यांत कांहीं घडलें तर त्याचा परिणाम तात्काल बाकीच्या जगावर होतो.

त्यामुळें रशियांत आणि इतर पाश्चिमात्य देशांत जें कांहीं घडलें आणि घडत आहे त्याचा परिणाम आमच्या देशावरहि झाला आहे. आमच्या आजुबाजूची परिस्थितिहि चिंताजनक बनली आहे. सर्व समाजव्यवस्था ढांसळून तिला वर-खालीं खिंडारें पडलीं आहेत. देव, धर्म सत्य आणि नीति,

कुठेंतरी दूर आणि तटस्थ राहिलीं आहे आणि अनिति, असत्य, लांचलुचपत यांची बजबजपुरी माजली आहे. कुठें श्रद्धा किंवा प्रेम आढळतच नाहीं.

प्रत्येकजण आपल्या स्वार्थासाठीं धडपडत आहे आणि तो साधतांना दुसऱ्याला खुशाल पायदळीं तुडवीत आहे. तो आपल्या मित्रांची, दूरच्या नातेवाईकांचीच काय पण आई, बाप, बंधु, भगिनी यांचीहि पर्वा करीत नाहीं. पण ही अवस्था दीर्घकाळ टिकणार नाहीं, असा विश्वास श्रीगुरुदेवांचें चरित्र पाहून निर्माण होतो.

आज अर्धशतकाहून अधिक काळ सर्वसामान्य जनतेंत मिसळून त्यांनीं लक्षावधींना ईश्वराचें अस्तित्व आणि सामर्थ्य पटविलें आहे. या काळाला अत्यंत आवश्यक असलेली अध्यात्मिक एकात्मता प्रस्थापित करण्याचें त्यांचें दैदीप्यमान कार्य रात्रंदिवस चालू आहे.

मानवी जीवन सुखी बनविण्यासाठीं हवें असलेलें अध्यात्मिक अधिष्ठान भक्तियोगानें साध्य करतां येतें हें ते जनतेला शिकवीत आहेत. एकदां जीवनाचें अधिष्ठान अध्यात्मिक झाले कीं माणूस सुखोपभोगाच्या मागें न जातां परमेश्वराला शरण जातो. तो असत्याची कास सोडून सत्याच्या मागें लागतो आणि स्वतःचें व इतर जनांचें जीवन सुखी करतो.

निरीश्वरवादी लोकांची, साम्यवाद्यांची आम्हांला भीति वाटण्याचें कारणच नाहीं, कारण जे ते आज म्हणत आहेत ते हजारों वर्षापूर्वी आमच्या चार्वाकानेंहि म्हटलें होतें. तो म्हणत असे, "भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनम् कुतः" एकदां तुमच्या शरिराची राख बनली कीं, तुम्हीं परत येणार कोठून ? तेव्हां तो पुढें म्हणत असे, "ऋणम् कृत्वा घृतम् पिवेत्." खा, प्या, जिवंत आहांत तोंपर्यंत मौज करा. अगदीं कर्ज काढून सण साजरे करा–तूप पीत जा, कारण तुम्हीं कर्ज काढलेत तर सावकार तुम्हीं मेल्यानंतर तुमच्या मागे लागूं शकणार नाहीं.

पण चार्वाकानंतर त्याचें तत्त्वज्ञान विलयाला गेलें. त्याप्रमाणें साम्यवादी राष्ट्रांतहि तेथली जनता पुन्हां देवाकडे आणि सत्यधर्माकडे वळेलच. भौतिक सुखांत अगदीं मानेपर्यंत बुडालेल्या अमेरिकेंत आतां तेथल्या सिनेटच्या बैठकीपूर्वी ईश्वराची प्रार्थना होऊं लागली आहे.

रशियांतहि तेथल्या जनतेला देवालयांत जाण्यास बंदी नाहीं, त्या देशांत नुकताच जाऊन आलेला माझा एक साम्यवादी मित्र मला म्हणाला कीं, त्या देवालयांत फक्त म्हातारी माणसेंच जात असतात. पण म्हातारी माणसें तेथें नेहमीच जात रहातील. कारण आजची तरुण मंडळी उद्यां म्हातारी बनणारच, असाहि एक काळ येईल कीं, त्या देवालयांत मध्यम वयाची, नंतर तरुण मंडळीहि जाऊं लागतील.

कोट्यवधि माणसांचें जीवन एकसांची बनविण्याचा प्रयत्न सुरवातीला जरी यशस्वी झालेला दिसला तरी तो शेवटीं असफल ठरणारच, कारण प्रत्येक माणसाचें व्यक्तिमत्व वेगळें असतें. एकासारखा दुसरा माणूस आढळणार नाहीं. एक लक्ष माणसांना एका रांगेत उभे केलें असतांना ज्याप्रमाणें प्रत्येकाचा चेहरा वेगळा असतो त्याप्रमाणें त्याची प्रकृतिहि भिन्न असते.

म्हणूनच आम्हांला साम्यवादी विचारसरणीची किंवा प्रयोगांची भीति बाळगण्याचें कारण नाहीं. माणूस कितीहि धांवला तरी त्याला ईश्वरापुढें धांवता येत नाहीं असें आजवरच्या इतिहासानें सिद्ध केलें आहे. आज माणूस अंतराळावर चढाई करण्यांत गुंतला आहे. चंद्रावर आणि मंगळावर जाण्याचे प्रयोग चालू आहेत. पण अंतराळांत चंद्र-मंगळासारखे लक्षावधि ग्रह आहेत. युगानुयुगें लोटलीं तरी तुम्हांला हे सर्व ग्रह काबीज करणें शक्य होणार नाहीं.

पण काळ याचें उत्तर देणार आहे. सर्व शास्त्रांचा आणि संशोधनांचा उपयोग मानवजातीच्या कल्याणासाठीं करण्याची प्रेरणा जेव्हां निर्माण होईल तेव्हां जगाचें स्वरूप कांहीं वेगळें बनेल आणि आज जगाला भेडसावणारे प्रश्न निर्माण झाले आहेत तेहि नष्ट होतील.

हें सर्व घडवून आणणारा ईश्वर जगांत आहे हा श्रीगुरुदेवांचा संदेश आहे. ते आज जगाला सत्यधर्म शिकवीत आहेत. ते सर्वांना सांगत आहेत कीं, ईश्वराला शोधण्यासाठीं देवळांत, जंगलांत जाण्याची जरूरी नाहीं. देवाला शोधून काढण्यासाठीं तुम्हांला पाद्री, मौलवी, पुजारी यांच्यासारख्या मध्यस्थांची जरूरी नाहीं. देव तुमच्या हृदयांतच आहे आणि तुम्हीं त्याला प्रयत्नानें शोधून काढूं शकाल.

मराठा ... ग्रंथसंग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
वि: ...
दाखल दि. ...

## श्रीगुरुदेवांचा दिव्य संदेश

देवस्थानांची, धर्मस्थानांची गरजच नाहीं असें श्रीगुरुदेव म्हणत नाहींत, नाहींतर त्यांनी जुन्या देवालयांचा जीर्णोद्धार केला नसता, त्यांनीं मच्छींद्रनाथ, गोरक्षनाथ हे वज्रेश्वरी येथें कोणत्या ठिकाणीं उतरले होते ते शोधून काढून त्यांच्या पादुका स्थापिल्या नसत्या, नवीन देवालयें बांधलीं नसतीं आणि गणेशपुरी येथें दर्शनाला येणाऱ्या प्रत्येकाला वज्रेश्वरी मातेचें दर्शन घेण्यास सांगितलें नसतें. ईश्वरावर श्रद्धा आणि भक्ति जडण्यासाठीं या देवालयांची आणि तीर्थक्षेत्रांची आवश्यकता आहे.

पण देव तुझ्या हृदयांतच दडी मारून बसला आहे, त्याला तूं योगाभ्यासानें शोधून काढ आणि भक्तिमार्गानें त्याला प्रसन्न करून घे. हा त्यांचा संदेश आहे. जात, पंथ, भेद, वंश असा भेदाभेद न करतां भक्तीच्या बळावर समता निर्माण केली पाहिजे असा त्यांचा आदेश आहे.

नवविधा भक्तींतील योग ही एक पायरी आहे, त्या योगाचें सामर्थ्य किती अफाट आहे याचें त्यांनीं जगाला प्रात्यक्षिकच दाखविलें आहे, तो मार्ग कसा चोखाळावा हें त्यांनीं आपल्या अमृतवाणीनें अगदीं सोप्या शब्दांत सांगितलें आहे आणि त्या मार्गांत प्रवेश करण्यासाठीं कोणती तयारी करावयास हवी, हें त्यांचे सत्‌शिष्य श्रीस्वामी मुक्तानंदजी यांनीं आदेशाद्वारें स्पष्ट केलें आहे.

म्हणूनच आजची आजुबाजूची परिस्थिति जरी नैराश्यमय अंधःकारानें भरून राहिलेली दिसत असली तरी आपणाला गोंधळून जाण्याचें, घाबरण्याचें कांहींच कारण नाहीं, "मानवा, तूं घाबरूं नकोस, मागें पाहूं नकोस, परमेश्वरावर श्रद्धा ठेवून पुढें पाऊल टाक!" हा श्रीगुरुदेवांचा दिव्य संदेश आहे.

●●●

: १६ :

# श्रीगुरुदेवांचें दर्शन



गणेशपुरी येथें जमणाऱ्या दर्शनोत्सुकांना पाहून माझ्या मनांत जे विचार येतात ते वाचकांच्या कानांवर घालण्यासाठीं हें प्रकरण लिहिलें आहे.

दर रविवारीं आणि गुरुवारीं बारा वाजण्याच्या सुमारास कैलास आश्रमाचें दार दर्शनासाठीं उघडलें जातें. त्या आधींच त्या दाराजवळ दर्शनोत्सुकांची गर्दी जमूं लागते आणि दाराजवळ जी गडबड व गोंधळ माजविण्यांत येतो तो पाहिला कीं मन खिन्न बनतें. ज्याला त्याला आंत घुसून दर्शन घेण्याची अतिशय घाई झालेली असते.

दार उघडलें जातांच त्या ठिकाणीं जी जोराची रेटारेटी होते ती दुरून पाहून हे लोक सिनेमागृहांतील चांगली जागा पटकाविण्यासाठीं इतकी धडपड करीत असावेत किंवा लोकलगाडीमध्यें जागा मिळविण्यासाठीं धडपडणारे असावेत असा भास होतो. व हें पाहिलें कीं, श्रीगुरुदेवांनीं पूर्वीची खुली जागा सोडून स्वतःला आश्रमांत कां कोंडून घेतलें हें कोडें सुटतें. कारण जर ते पूर्वीप्रमाणें उघड्या धर्मशाळेंत बसते तर या फाजील उत्साही माणसांनीं काय अनर्थ माजविला असता याची कल्पनाच करतां

कोलाहल माजतो, जो तो किल्ला सर करण्याच्या आवेशानें
तो. त्या रांगेत कांहीं स्त्रिया असतात, लहान अर्भकें असतात.
रा त्यांच्याकडे मुळींच लक्ष देत नसतो. त्यामुळें स्त्रिया
किंचाळतात, पाठीमागले लोक ओरडत असतात. आणि हे
पवित्र दर्शन घेण्यासाठीं आले नसून कांहीं अन्य शिकार

साधण्यासाठीं आले असावेत असा संभ्रम निर्माण होतो. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या रेटारेटीमध्यें कांहीं सुशिक्षितहि सामील झालेले दिसतात.

या सर्व दर्शनोत्सुकांनीं—मी त्यांना मुद्दामच भक्त म्हणत नाहीं—आपण कुणाच्या दर्शनासाठीं ही रेटारेटी, चेंगराचेंगरी चालविली आहे, याचा क्षणभर तरी विचार केला पाहिजे. त्यांत जो भाविक नसेल, श्रद्धावान नसेल, ईश्वराचें अस्तित्वहि मानणारा नसेल त्यानेंहि इतर हजारो हें एक पवित्र तीर्थस्थान मानतात या गोष्टीची कदर केली पाहिजे.

जे श्रद्धावान भाविक असतील त्यांना तर असल्या वागणुकीबद्दल लज्जा वाटली पाहिजे. जेथें शांतिस्वरूप परब्रह्म प्रत्यक्ष नांदतें तेथें इतकी घाई आणि अशांति असावी ? ज्या महात्म्याच्या दर्शनासाठीं आपण आश्रमांत प्रवेश करतों त्यांना या अशांततेपासून किती त्रास होत असेल याचा प्रत्येकानेंच विचार केला पाहिजे. आपल्या गैरवर्तनानें आपण त्या पवित्र स्थानाचा किती अनादर करतों, हें प्रत्येकानें लक्षांत घेतलें पाहिजे.

तुम्हीं इतकी घाई कां करता ? स्वार्थसाधण्यासाठीं आपणा सर्वांची नेहमींच धांवपळ होत असते. व्यवहाराची गाडी जर वेळेवर गांठली नाहीं तर आपलें नुंकसान होईल अशी त्यावेळीं भीति असते. पण देवतुल्य महात्म्याचें दर्शन घेतांनाहि घाई करायला हवी काय ?

या ठिकाणीं तिकीट काढायचें नसतें आणि त्यासाठीं पैसेहि मोजावे लागत नाहींत. येथें कनिष्ठ–चांगली जागा असाहि प्रश्न नसतो. दर्शनासाठीं आलेला अगदीं शेवटचा माणूस निघून जाईपर्यंत श्रीगुरुदेव कितीहि त्रास झाला तरी आपल्या आसनावर बसलेले असतात. त्यामुळें एकदां आश्रमाचें दार उघडलें कीं तुम्हांला दर्शन घडेल कीं नाहीं, ही चिंता करण्याचें कारण नसतें. तेव्हां आया-बहिणींकडे, मुलांकडे, वृद्धांकडे दुर्लक्ष करून आपण प्रवेश-द्वारांतून आंत घुसण्याचा प्रयत्न करणें कितपत योग्य आहे ?

मला माहीत आहे कीं या दर्शनोत्सुकांमध्यें कांहींना मुंबईला जाणारी गाडी पकडायची असते, कांहींचा इतर मनोरंजक कार्यक्रम खोळंबलेला असतो आणि त्यांच्या वज्रेश्वरी येथील कार्यक्रमाचा एक भाग म्हणून दर्शन

घ्यायचें असतें. पण मला असें विचारायचें आहे कीं येथे येण्याची आमंत्रण-पत्रिका तुम्हांला पाठविली कुणी ? तुमच्यावर दर्शन घेण्याची जबरदस्ती करण्यांत आली आहे काय ?

तुम्ही निरनिराळ्या हेतूनें स्वेच्छेनें तेथें येता. कुणाला साधु कसा दिसतो ही गंमत पहावयाची असते, कुणाला फक्त दर्शन हवें असतें, कुणी अंतरीच्या तळमळीनें, कांहीं हेतूनें तेथें येतो. पण जर तुम्हांला या देवाच्या दरबारीं यायचें असेल तर तुम्हीं तितकी सवड काढूनच आलें पाहिजे.

देवदर्शनासाठीं ऋषीमुनी तपःसाधना करीत होते. बारा वर्षें सतत ध्यान केल्यानंतर दर्शन घडत होतें. तुम्हांला तर तें अगदीं सहजासहजीं घडतें. असे असतांना फक्त दोन–तीन तास शांतपणें ईश्वर चिंतन करीत उभे रहाणें इतकी साधी गोष्टहि तुम्ही करूं नये ?

जे हा मजकूर वाचतील त्या सर्वांना माझी नम्र विनंती आहे कीं, जर गणेशपुरी येथें जाऊन दर्शन घेण्याची तुमची इच्छा झाली तर तें तुम्ही अगदीं शांततेनें, श्रद्धेनें आणि शिस्तीनें घेतलें पाहिजे आणि इतरांनाहि तसे वागावयास सांगितलें पाहिजे. देवाला प्रसन्न करण्याचा हाच योग्य मार्ग आहे.

केवळ गणेशपुरींतच नव्हे तर इतरत्रहि असले बेशिस्तीचे प्रकार दिसून येतात. आपण अशा वागणुकीमुळें आपलें अतिशय नुकसान करीत असतों, पण तें आपल्या लक्षांत येत नसतें. आपल्या जीवनामधील शिस्त नाहींशी झाली आहे. घरीं–दारीं, शाळेंत, देवळांत, प्रवासांत, करमणुकीच्या ठिकाणींहि आणि गणेशपुरीसारख्या तीर्थक्षेत्रींहि आपणाला शिस्त सांपडणार नाहीं.

आपली संस्कृति उदात्त आणि परंपरा उज्ज्वल असताना, बुद्धीच्या किंवा कलेच्या कोणत्याहि क्षेत्रांत आपण मागे नसतांना आपणांला हजार वर्षांचें पारतंत्र्य भोगावें लागलें आणि आजहि आपण मोठ्या कष्टानें मिळविलेलें स्वातंत्र्य टिकवायचें कसें हा प्रश्न आपल्या राष्ट्रधुरीणांना भेडसावीत असतो. याचीं जीं कांहीं कारणें आहेत यांतील आपणांतील शिस्तीचा अभाव हें एक प्रमुख कारण आहे.

आपल्या धर्मस्थानाबद्दल विचार करतांना इतर धर्मीय आणि आपण कसे वागतों याची तुलना केली तर आपणांला लज्जेनें खालीं मान घालावी लागेल.

तुम्हीं एखाद्या ख्रिश्चनांच्या चर्चमध्यें-प्रर्थनामंदिरामध्यें डोकावून पहा. हजारों स्त्री-पुरुष तेथें प्रार्थनेसाठीं एकत्र झालेले असतात. पण त्या ठिकाणीं इतकी शांतता नांदत असते कीं, जर एखादी टांचणी पडली तर तिचाहि आवाज ऐकूं यावा.

हे सर्व स्त्रीपुरुष शिस्तीनें आणि एकमेकांपासून थोडें अंतर राखून बसलेले असतात. ते आपणांसारखे सोंवळेओवळें पाळीत नाहींत तरीसुद्धां आजु-बाजूच्या कुणाला आपल्या स्पर्शानेंहि त्रास होऊं नये यासाठीं जपत असतात. आपल्या धर्मगुरूंचें प्रवचन शांतीनें, चित्त एकाग्र करून श्रद्धेनें ऐकतात आणि ज्यावेळीं तीं हजारों माणसें एका सुरांत प्रार्थना म्हणूं लागतात त्यावेळीं वातावरण इतकें गंभीर आणि पवित्र असतें कीं, परधर्मी-यांनासुद्धां ब्रह्मानंदाचा साक्षात्कार घडावा.

तीच गोष्ट मुसलमानांची. ख्रिश्चन धर्मीय दर रविवारीं प्रार्थनामंदिरांत जातात तर मुलमान दर शुक्रवारीं मशिदींत जाऊन नमाज पडतात. या नमा-जाच्यावेळींहि त्या ठिकाणीं निस्तब्ध शांतता पसरलेली असते. तेथें अमीर असो वा फकीर असो, सर्व एकाच ठिकाणीं गुडघे टेकून प्रार्थना करतात, ते तर मुळींच शिवाशिव न पाळणारे, पण तेहि नमाजाच्या वेळीं बाजूच्या माणसाला स्पर्श होणार नाहीं किंवा इतर त्रास होणार नाहीं अशी दक्षता बाळगितात.

तुम्हीं जर नीट बारकाईनें पाहिले तर तुम्हांला आढळून येईल कीं, आपसांत भांडणारे दोघे मुसलमान जर मशिदीवरून जात असले तर दोघेहि बोलणें थांबवितील आणि मशिदीपासून कांहीं अंतरावर गेल्यानंतर पुन्हां भांडावयास सुरवात करतील.

केवळ ख्रिश्चन किंवा मुसलमानच नव्हेत तर पारशी, बुद्ध, जैन इतर धर्मियांचें आचरणहि असेंच असतें. ते आपल्या धर्मस्थानाबद्दल कधींहि आणि कोणत्याहि प्रकारचा अनादर दर्शविणार नाहींत.

आमची वागणूक मात्र अगदीं विरुद्ध असते, आम्हीं कधीं देवळांत जावें याला नियम नसतो, मनांत येईल तेव्हां आम्हीं देवदर्शनाला जातों, जर कधीं कीर्तन-प्रवचनाला गेलों, किंवा यात्रेला अथवा देवाच्या उत्सवाला हजर

राहिलों तर इतकी गडबड माजवितों कीं, तेथें जर खरोखरीच देव असला तर तो पळून जावा.

पवित्र ठिकाणीं अगदीं निस्तब्ध शांतता हवी. ही साधी गोष्टसुद्धां आपणाला समजत नाहीं, आपण प्रेमानें गप्प बसणार नाहीं, कुणी दहशत दिली तर मात्र आपल्या तोंडाला कुलूप लागतें. जेथें कुणाचेंहि विशेष समाधान होणार नाहीं अशाप्रकारचा साधारण न्याय मिळतो, त्या कोर्टांत जर आपण हजर राहिलों तर तेथल्या नियमांच्या दहशतीमुळें आपण गप्प बसतों, पण ज्या देवाच्या दरबारीं आपण संपूर्ण न्यायाची मागणी करीत असतों तेथें आपण संपूर्ण गोंधळ माजवितों.

आपण एखाद्या पवित्र ठिकाणीं गेलों तर तेथें कसें वागावें यासंबंधीं आपल्या धर्मशास्त्रांत नियम केले आहेत. आपण ते नियम विसरतों हा धर्मशास्त्राचा दोष नाहीं.

आपण एखाद्या तीर्थस्थानीं गेलांत तर तेथें निदान तीन रात्री तरी राहिलें पाहिजे असा नियम आहे आणि गणेशपुरींत तर दोन-तीन तासच काढावयाचे असतात. तेवढा वेळ तरी आपण शांततेनें आणि शिस्तीनें काढायला नको काय ? जेथें शांति तेथे देवाची वसति आणि शिस्त हें तर मानवतेचें सौंदर्य आहे.

हिंदुधर्माच्या ऱ्हासाचीं जीं कांहीं कारणें आहेत त्यांतील शिस्तीचा अभाव हें प्रमुख कारण आहे. आपण शिस्तीनें देवळांत जात नाहीं, शिस्तीनें आपल्या धर्मतत्त्वाचा अभ्यास करीत नाहीं. इतर धर्मीय बायबल-कुराणादि आपल्या कठीण धर्मग्रंथाचें वाचनच करीत नाहींत, तर पठण-मननहि करतात.

आम्हांला आमच्या वेद, मंत्र, संध्या यांची ऐकीव माहितीहि नसते. आमच्या रामदास–तुकारामासारख्या संतांनीं आपल्या श्लोक–अभगाद्वारें हिंदु धर्मशास्त्र अगदीं सोपें करून ठेवलें आहे; पण रामदासांचे दोन श्लोक किंवा तुकारामांचे दोन अभंग ओळीनें विनचूक म्हणून दाखविणारा माणूस हजारांत एक सांपडेल कीं नाहीं, याची शंकाच आहे.

अशी आपली आजची अवस्था आहे आणि आपणांला योग्य मार्गदर्शन करण्यासाठीं गणेशपुरी येथें योगीराज नित्यानंदजी बसले आहेत हें आपलें सद्भाग्य होय.

केवळ पैशाची नव्हे तर धर्माची कमाई करणारा माणूसच श्रीमंत असतो आणि माणसाला संकटांतून केवळ धर्मच सोडविणार, धन सोडविणार नाहीं हें सत्य आपणांला श्रीगुरुदेवांपासून शिकावयाचें आहे.

धर्म गुरुमुखी नसून मनोमुखी आहे हा त्यांचा संदेश लक्षांत ठेवूनच त्यांच्या दर्शनाला गेल्यानंतर आपलें मन अत्यंत पवित्र राखलें पाहिजे आणि श्रद्धेनें, शांततेनें आणि शिस्तीनें वागलें पाहिजे.

आपण आपली पात्रता ओळखली पाहिजे आणि गणेशपुरीचें पावित्र्य सांभाळलें पाहिजे, आपण तसें केलें तर श्रीगुरुदेव प्रसन्न होतील आणि आपला इच्छित कार्यभाग साध्य झाल्यावाचून रहाणार नाहीं.

नित्यानंदाय गुरुवे शिष्यसंसार हारिणे ।
भक्तकार्यैकदेहाय नमस्ते चिद्सदात्मने ॥

• • •

## : १७ : श्रीगुरुदेव प्रसन्न कसे होतील ?



गणेशपुरी येथें दर्शनासाठीं जाणाऱ्या बहुतेकांच्या मनांत एकच विचार खळबळ माजवीत असतो, श्रीगुरुदेव आपणांवर प्रसन्न कसे होतील ? देव आपणांवर प्रसन्न व्हावा असें कुणाला वाटणार नाहीं ? त्या संबंधींचे माझे विचार मी या प्रकरणांत मांडणार आहे.

स्वार्थ निरपेक्ष बुद्धीनें केवळ दर्शनासाठींच जाणारा भक्त श्रीगुरुदेवांना जास्त प्रिय असतो, हें जरी खरें असलें तरी दर्शनोत्सुकांमध्यें तसलीं माणसें बोटावर मोजण्याइतकींच असणार. जीं हजारों माणसें तेथें जातात त्यांचें कांहीं ना कांहीं गाऱ्हाणें असतें आणि श्रीगुरुदेवांच्या दरबारीं आपली दाद लागावी असें त्यांना स्वाभाविकपणेंच वाटतें.

मागे एकदां मी म्हटलें आहे कीं, बुद्धीची मर्यादा संपल्यानंतर श्रद्धेची सुरवात होते. बहुतेक सामान्य माणसांची तशीच अवस्था असते. संकटमय परिस्थितीशीं झगडतांना बुद्धीनें सुचविलेले सारे प्रयत्न फोल ठरल्यानंतर माणूस देवाचा धांवा करूं लागतो.

अशा माणसाला साधुसंताबद्दल, मांत्रिकाबद्दल, ज्योतिष्याबद्दल आकर्षण वाटतें, जग हें अनंत दुःखानें भरलें आहे. " सुख पहाता जवापाडे, दुःख पर्वताएवढें " हा सामान्यांचा नेहमींचाच अनुभव असतो. दुःखानें गांजलेला माणूस वेडा बनतो आणि तो असामान्यांकडे आकर्षिला जातो. तसें घडणें अपरिहार्य व क्रमप्राप्त असतें. जन्मल्यापासून मृत्यूपर्यंत माणसाची सुखासाठीं धडपड चाललेली असते. आपणांवरील संकट नाहीसें व्हावें आणि आपणांला सुख लाभावें असें कुणाला वाटणार नाहीं ?

परिस्थितीमुळें किंवा अज्ञानामुळें अगतिक बनलेल्या माणसाला गणेश-पुरीच्या श्रीगुरुदेवांची माहिती मिळाली आणि त्यानें त्यांच्याकडे धांव घेतली तर त्यांत नवल नाहीं. श्रीगुरुदेवांबद्दल त्याला खात्रीलायक माहिती मिळालेली असते आणि त्याला वाटत असतें कीं, हा देव आपणांवर प्रसन्न झाला पाहिजे.

अनेक कल्पना उराशीं बाळगून गणेशपुरी येथें आलेला हा माणूस रांगेंत उभा राहून श्रीगुरुदेवांचें कसेंबसें दर्शन घेतो. ते आपणांकडे नीट पहात नाहींत, बोलत नाहींतच, पण आशीर्वादहि देत नाहींत तेव्हां त्यांना कांहीं विशेष सांगण्यासाठीं आलेल्या त्या माणसाचें समाधान होत नाहीं आणि तो विचारांत पडतो कीं, हा देव प्रसन्न कसा होईल ?

गणेशपुरी येथें दर्शनासाठीं आश्रमांत शिरणाऱ्यांत अनेक प्रवृत्तीचीं माणसें असतात हें मी आपणांला यापूर्वीं सांगितलें आहे. त्यांतील सर्वच श्रद्धावान किंवा भाविक नसतात, कांहीं गंमतीनें तर कांहीं कुतूहलानें श्रीगुरुदेवांना पहाण्यासाठीं जात असतात आणि या मेळाव्यांत जमणाऱ्यांची संख्या कधीं शेंकड्यानी तर कधीं हजारानी मोजण्यासारखी असते. इतक्या लोकांबरोबर श्रीगुरुदेवांना बोलणें शक्यच नसतें, पण त्यामुळें कांहीं खास हेतूनें तेथें आलेला माणूस निराश बनतो. या अशा माणसालाच मला कांहीं अनुभवाचे बोल सांगावयाचे आहेत.

प्रथम या माणसाची अशी कल्पना होते कीं, श्रीगुरुदेव जर आपणांला पूर्वींप्रमाणें मोकळ्या जागेंत भेटले असते तर आपलें काम झालें असतें. आणि त्यांना कांहीं विशिष्ट कंपूनें आश्रमांत कोंडून ठेवलें आहे.

ज्यांनीं हें चरित्र लक्षपूर्वक वाचलें असेल अशांना ही त्याची कल्पना चुकीची आहे असें ताबडतोब लक्षांत येईल. पंचमहाभूतांना गदगदा हलविण्याचें ज्यांच्यांत सामर्थ्य आहे अशा श्रीगुरुदेवांना कुणी त्यांच्या इच्छेविरुद्ध कोंडून ठेवूं शकेल काय ? गणेशपुरींतील कोणतीहि गोष्ट त्यांच्या इच्छेनुसारच घडत असते यांत मुळींच शंका नाहीं.

ते बोलत नाहींत म्हणून मी वर उल्लेखिलेला भक्त खिन्न बनतो, पण त्यांनीं तुमच्याबरोबर बोलण्याची कांहीं अवश्यकताच नाहीं. ते त्रिकालज्ञानी आहेत,

ते तुमच्याकडे न पहाताहि तुमच्या अंतरंगाचा ठाव घेऊं शकतात. तुम्हीं त्यांच्यासमोर हात जोडून उभे रहाताच कशाकरितां आला आहांत हें त्यांना कळतें, त्यामुळें त्यांनीं तुमच्याबरोबर बोलण्याची कांहींच गरज नाहीं. तुम्हीं तुमच्या इच्छेचा उच्चार तुमच्या मनांत केलात कीं पुरे.

कधीं कधीं श्रीगुरुदेवांचें दर्शनच घडत नाहीं. त्यामुळें तर वर सांगितलेल्या प्रकारच्या भक्ताची अतिशयच निराशा होते. पण त्यासंबंधी अगदीं अलिकडेच घडलेली एक हकीकत सांगतों.

नागपूर येथील विजय पंडित नांवाचे एक तरुण गृहस्थ श्रीगुरुदेवांवर उत्कट भक्ति करणाऱ्यांपैकीं एक आहेत. ते दर्शनासाठीं मुद्दाम नागपूरहून गणेशपुरीला अधुन मधून येत असत. पुढें उच्च शिक्षणासाठीं त्यांनी अमेरिकेला जाण्याचें ठरविलें आणि प्रवासाची सर्व सिद्धता झाल्यानंतर त्यांनीं विमानाचें तिकीट काढलें.

प्रयाण करण्याच्या आदल्या दिवशीं ते गुरुदेवांचें दर्शन आणि आशीर्वाद घेण्यासाठीं गणेशपुरी येथें आले. श्रीगुरुदेवांची काय लहर फिरली असेल तें त्यांचें त्यांनाच माहीत, त्यांनी त्यांच्या या लाडक्या भक्ताशीं बोलण्याचें आणि आशीर्वाद देण्याचें तर राहिलेंच पण त्याला दर्शनहि दिलें नाहीं.

दुसऱ्या दिवशीं विमानानें अमेरिकेस जाणाऱ्या या तरुणाची काय स्थिति झाली असेल याची कल्पनाच करावी. सर्व दिवसभर दर्शनासाठीं नानाप्रकारचे प्रयत्न करून थकल्यानंतर तो तरुण निराश बनला, श्रीगुरुदेव दर्शन देत नाहींत तेव्हां आपण आपला प्रवासाचा बेत रहीत करावा अशी तर त्यांची इच्छा नसेल, अशी शंका त्याच्या मनांत येऊं लागली.

शेवटी विजय पंडित श्रीमुक्तानंदजींना भेटला आणि त्यानें आपली हृदयव्यथा त्यांना सांगितली. स्वामी मुक्तानंदजी त्याला म्हणाले, " तूं तुझ्याकडून कांहीं चूक केली नाहींस, तूं प्रवासापूर्वीं त्यांचें दर्शन घेण्यासाठीं आलास आणि त्यासाठीं मनोभावाने सर्व प्रयत्न केलेस तूं तुझें काम केलें आहेस तेव्हां त्यांनीं काय केलें पाहिजे हें त्यांच्यावरच सोंपविले पाहिजे. तूं निःशंक मनानें प्रवासाला जा, प्रवासाचा बेत लांबणीवर टाकूं नकोस. "

स्वामी मुक्तानंदजींचें तें बोलणें ऐकून त्या तरुणाला बराच धीर आला आणि तो आश्रमाला नमस्कार करून पूर्वीं ठरल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं विमानानें अमेरिकेस निघून गेला, प्रथम इंग्लंडला जाऊन तेथून तो दुसऱ्या विमानानें अमेरिकेस पोहोंचणार होता.

तो इंग्लंडहून विमानानें अमेरिकेस जात असतांना प्रवासांत त्याचा डोळा लागला. आणि त्याला श्रीगुरुदेव उभे आहेत असें दिसलें. त्यांच्याजवळ कांहीं पुस्तकें होतीं. तीं त्यांनीं त्याला दाखविलीं आणि सांगितलें, " या पुस्तकांचीं नांवें नीट लक्षांत ठेव, परीक्षेंत तुला यांचा उपयोग होणार आहे. "

तो तरुण खडबडून जागा झाला, त्या विलक्षण स्वप्नाबद्दल आश्चर्य मानीत त्यानें प्रथम त्या पुस्तकांचीं नांवें आपल्या डायरींत लिहिलीं. प्रवासापूर्वीं जरी आपणांला दर्शन घडलें नव्हतें तरी प्रवास चालू असतांना स्वप्नांत कां होईना पण श्रीगुरुदेवांनीं आपणाला दर्शन दिलें याचा त्या श्रद्धाळू तरुणाला आनंद झाला होता.

अमेरिकेंत पोहोंचल्यानंतर जरी अभ्यासक्रमासाठीं त्या पुस्तकांची निवड झाली नव्हती तरी श्रीगुरुदेवांच्या आदेशानुसार त्यानें तीं वाचलीं आणि आश्चर्य असें कीं, परीक्षेंत जे महत्त्वाचे प्रश्न विचारण्यांत आले ते त्या पुस्तकांतीलच होते. विजय पंडितनें त्या परीक्षेंत चांगल्या प्रकारें यश मिळविलें हें सांगावयास नकोच. नंतर त्यानें ही सर्व हकीकत स्वामी मुक्तानंदजींना पत्रद्वारें कळविली.

अगदीं अलिकडच्या काळांत घडलेल्या या सत्य घटनेवरून आमच्यासारख्यांनीं बोध घ्यावयाचा तो हा कीं, जर श्रीगुरुदेवांवर आमची नितांत श्रद्धा असेल, त्यांनीं दिलेला आदेश जर आम्हीं भक्तिभावानें आचरणांत आणीत असलों तर त्यांनीं दर्शन दिलें नाहीं किंवा आशीर्वाद दिला नाहीं तरी कांहीं बिघडत नाहीं. तुमच्या गाऱ्हाण्याची दाद त्यांच्या दरबारीं लागणारच.

पण त्यासाठीं तुम्हांला तुमचें कर्तव्य चोख बजाविलें पाहिजे. तुम्हीं जर अर्ध श्रद्धावान असाल तर पूर्ण श्रद्धावान बनलें पाहिजे आणि श्रद्धावंत अंतःकरणानें भगवंताची अशी भक्ति केली पाहिजे कीं ज्या योगें तो प्रसन्न

८

मराठी ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम ...३८६०२ वि: ....५।६७...
१६-९-६५
क्रमांक ...१३३.१२५१...


होईल. आपण साशंक असलों आणि आपली श्रद्धा डळमळीत असली तर भगवंताच्या आशीर्वादाची अपेक्षा करण्याचा आपणाला कांहींच हक्क नाहीं.

तेव्हां श्रीगुरुदेवांचें दुरून दर्शन घेण्याला फार मोठें महत्त्व आहे. तुम्हीं तात्पुरत्या श्रद्धेनें गेलांत तर केवळ दर्शनानेंहि तुमची विवंचना तात्पुरती दूर होईलच; पण श्रीगुरुदेवांना प्रसन्न करण्यासाठीं तुम्हींहि कांहीं कष्ट केलेच पाहिजे. परमेश्वरकृपा इतकी सवंग नाहीं कीं, जी तुम्हांला सहजासहजीं मिळूं शकेल. परमेश्वराला श्रद्धेनें आणि भक्तीनें आळविलें पाहिजे आणि आपण त्याचा आदेश पाळणारच अशी त्याची खात्री पटविली पाहिजे. " जशी श्रद्धा तसें फळ " असें आतांपर्यंतच्या अनेक साधुसंतांनीं सांगितलें आहे हें लक्षांत ठेवा.

श्रीगुरुदेवांची भक्ति करणें ही एक साधना आहे. तपस्या आहे. पण त्यासाठीं सर्वांनीं संसार सोडून वैरागी बनावें असें श्रीगुरुदेवांचें म्हणणें नाहीं. सर्वांना साधु बनता येणारच नाहीं, पण संसारांत राहूनहि माणसाला श्रद्धायुक्त अंतःकरणानें परमेश्वराची भक्ति करतां येते आणि त्याला प्रसन्नहि करतां येतें.

चारी बाजूनें बंद असलेल्या आश्रमांत बसूनहि श्रीगुरुदेवांना बाहेर असलेलीं हजारों माणसें कोणत्या उद्देशानें तेथें येतात हें समजतें, त्याबद्दलचें एक ताजें उदाहरण मी आपणांला सांगतों.

लिप्टन कंपनीच्या प्रचारकाचें काम करणारे माझे एक मित्र श्रीगुरुदेवांच्या दर्शनासाठीं गणेशपुरी येथें जात असतात. त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्याला ती माहिती मिळाल्यानंतर श्रीगुरुदेवांचें दर्शन घ्यावें अशी त्यांच्याहि मनांत इच्छा निर्माण झाली.

दर गुरुवारीं हमखास दर्शन घडते हें माहीत असल्यामुळेंच माझा मित्र आपल्या तिघां अधिकाऱ्यांना बरोबर घेऊन एका गुरुवारीं गणेशपुरी येथें गेला. पण श्रीगुरुदेवांची लहर फिरली आणि त्यांनीं त्या दिवशीं कुणालाच दर्शन दिलें नाहीं, त्यामुळें या चौघांची, विशेषतः माझ्या मित्राची अतिशय निराशा झाली.

नंतर तो माझा मित्र श्रीस्वामी मुक्तानंदजींचें दर्शन घ्यावें या विचारानें त्या तिघांना घेऊन तेथें गेला. ते चौघे तेथें बसले असतांना कैलास आश्रमांतील एक माणुस प्रसाद घेऊन आला आणि म्हणाला, " कीं जे चौघे गृहस्थ मुंबईहून दर्शनासाठीं आले होते, त्यांना बाबांनीं हा प्रसाद पाठविला आहे. " हें ऐकून त्या चौघांना काय वाटलें असेल याची कल्पनाच करणें बरें.

काल-परवांच मला एक गुजराथी गृहस्थ भेटले होते. श्रीगुरुदेव कांहीं बोलत नाहींत तेव्हां आपणांला त्यांचें नुसतें दर्शन नको, त्यांनीं आपणांबरोबर बोललें पाहिजे, अशा हट्टानें सतत पांच वर्षे ते आपल्या घरींच बाबांचें ध्यान करीत असत. शेवटीं गेल्या होळीच्या दिवसांत त्यांची इच्छा पूर्ण झाली. ते आपल्या मित्रांबरोबर तेथें गेले असतांना बाबांनीं त्या सर्वांना तीन दिवस आपल्या आश्रमांतच ठेवून घेतलें, त्यांच्या बरोबर ते भजन करण्यासाठीं बसले, खूप बोलले, शेवटीं त्यांना स्वहस्तानें प्रसादहि दिला.

माझा स्वतःचा अनुभव आहे कीं, बाबांचा नुसता हुंकार ऐकण्यासाठीं मला सतत पांच वर्षे घालवावी लागलीं, तुमची श्रद्धा जर बळकट असेल तर श्रीगुरुदेव तुमच्याशीं बोलतीलहि.

म्हणून तुम्हीं गणेशपुरी येथें गेल्याबरोबर ते तुमच्याशीं बोलले नाहींत किंवा त्यांनीं आशीर्वाद दिला नाहीं, म्हणून कष्टी होण्याचें कारण नाहीं, इतकेंच काय पण दर्शन घडलें नाहीं, तरीहि नाउमेद होऊं नका, श्रीस्वामी मुक्तानंदजींच्या आदेशाप्रमाणें " तुम्हीं तुमचें काम करा, म्हणजे, श्रीगुरुदेव आपलें काम करतीलच. "

• • •

: १८ :

# श्रीगुरुदेवांचा आशीर्वाद



श्रीगुरुदेवांच्या चरित्रगंगेंत आपण आतां-पर्यंत अनेक उड्या घेऊन पावन बनलों आहोंत, आतां आपणांला त्यांचा आशीर्वाद मिळवून त्यांच्या आदेशानुसार यापुढें वागण्याचा निश्चय करावयाचा आहे.

भगवान् श्रीनित्यानंदांच्या चरित्रांत भक्ति आणि योग यांचा परिणामकारक, विलक्षण आणि मनोहारी संगम झाला आहे. योगचमत्कार करणारे अनेक योगी आपणांला अधून मधून पहावयास मिळतात, पण त्यांचे चमत्कार कधींकाळीं घडतात आणि क्वचित् प्रसंगीं तें त्यांच्या करतांच असतात.

माझ्या लहानपणींची एक आठवण आहे. आमच्या अर्नाळा गांवांत एक योगी आला होता, तो बारा वाजण्याच्या सुमारास आमच्या घरीं येऊन फक्त शिजविलेला भात मागत असे. नंतर तो आमच्या समोर उन्हांत बसून सूर्याला नमस्कार करीत असे आणि तांब्याभर पाणी त्या भातांत ओतीत असे, त्याबरोबर त्या पाण्याचें ताकांत किंवा दुधांत रूपांतर होत असे आणि तो योगी आनंदानें भोजन करीत असे.

कांहीं दिवस हा चमत्कार आम्हीं रोज पहात होतों. आम्हांला त्या योग्याबद्दल स्वाभाविकपणेंच कुतूहल वाटत असे, पण त्या चमत्कारामुळें कुणाचाच फायदा होत नव्हता. तो योगी कांहींना आशीर्वाद देऊन त्यांच्या कांहीं विवंचना दूरहि करीत होता असें म्हटलें जात होते.

योगचमत्कारानें कांहीं असाध्य रोग दूर करणारे योगीहि पहावयास मिळतात. या योगाची अधिकृत माहिती देणारे कांहीं ग्रंथ संस्कृत भाषेंत

आहेत. योगोपनिषद, योगसूत्रशिवसंहिता, योगवाशिष्ठ, गांधर्वसंहिता, गोरक्षपदार्थि, इष्टसिद्धि, शांडिल्यसूत्र, हटयोगप्रदीप वगैरे ग्रंथ आहेत. आतां तर नेपाळमध्यें महायानकाळांतील पालीभाषेंत लिहिलेलीं कांहीं दुर्मिळ ताडपत्रें उपलब्ध झालीं आहेत, त्याबद्दल संशोधन करणाऱ्या विद्वानांचीच उणीव आहे.

अशाप्रकारें योगविद्या अभ्यासितां येते आणि त्यायोगें कांहीं चमत्कार घडूं शकतात. योगाचा अभ्यास करणारे योगी अबूच्या पहाडावर आणि हिमालयांत आहेत हे आपण वाचतों. पण हे सर्व योगी सामान्य जनतेपासून दूर रहातात.

याबद्दल श्रीगुरुदेवांनींच म्हटलें आहे कीं, "योग्यानें स्वतःला गुहेंत कोंडण्यात काय अर्थ ? त्यानें खाल्लें तर इतरांचें पोट भरेल काय ? इतर सर्वांना अज्ञानाच्या अंधःकारांतून ज्ञानरूपी प्रकाशांत आणून सोडणें हें त्याचें काम आहे."

श्रीगुरुदेव हें फक्त सांगूनच थांबले नाहींत. गेल्या अर्धशतकाहून अधिक काळ ते लोकांमध्यें राहिले आणि अजूनहि रहात आहेत आणि कोणत्याहि प्रकारची व्याख्यानबाजी किंवा जाहिरातबाजी न करता केवळ आपल्या आचरणानें, आपल्या मूक व्याख्यानानें लक्षावधि जनतेच्या प्रत्यक्ष उपयोगी पडत आहेत आणि त्यांना योग आणि भक्ति यांचें प्रात्यक्षिक दाखवून ज्ञानमार्गावर आणून सोडीत आहेत.

त्यांनीं जे चमत्कार केले आहेत, ते आतांपर्यंत आपणांला कोणत्याही योग्याच्या चरित्रांत वाचावयास मिळत नाहींत, तसल्या लीला फक्त देवादिकांनीं केल्या असें आपण पुराणांत आणि इतर धर्मग्रंथांत वाचतो आणि त्या व त्याहून अतर्क्य अशा लीला सहजतेनें भगवान श्रीनित्यानंदजी करीत असलेले दिसतात आणि तें पाहून आमच्या कल्याणाकरितां परमेश्वरानें गणेशपुरींत अवतार धारण केला आहे याची मनाला साक्ष पटते.

म्हणून वाचकांनो, माझी तुम्हांला आग्रहाची विनंती आहे कीं, तुम्हीं एकदां तरी भगवान श्रीनित्यानंदांचें दर्शन घ्या आणि आपल्या जीवनांतील अंधःकार नाहींसा करून मनुष्यजीवनाचें सार्थक करा.

मी हें चरित्र लिहिण्याची तयारी झाल्यानंतर श्रीगुरुदेवांसमोर उभा राहिलों आणि हात जोडून प्रार्थना केली, " देवा, तुझ्या कृपाप्रसादानें हें अवघड कार्य पूर्ण होवो, माझ्या मार्गांतील विवंचना नाहींशा होऊन तुझें ध्यान करण्याइतकी उसंत माझ्या जीवाला मिळो आणि जे कोणी श्रद्धेनें आणि प्रेमानें हें तुझें संक्षिप्त चरित्र वाचतील त्यांच्या सर्व मनोकामना पूर्ण होवोत ! "

माझे बाबा कांहीं वेळ विचार करीत आणि आपलीं बोटें नाचवीत खालीं पहात होते. नंतर त्यांनीं माझ्याकडे प्रसन्न मुद्रेनें पाहिलें, आपले दोन्ही हात वर उचलून मला आशीर्वाद दिला आणि मान डोलावीत म्हटलें, " हूं ऽऽ ! "

प्रिय वाचकांनो, बाबांच्या त्या हुंकारामध्यें साऱ्या पृथ्वीला गदगदां हलविण्याचें आणि गगनाला गवसणी घालण्याचें सामर्थ्य आहे. त्यांनीं अगदीं प्रसन्न चित्तानें तुम्हांला आणि मला आशीर्वाद दिला आहे, त्यामुळें या चरित्रवाचनानें आपल्या मनोकामना पूर्ण होतील यांत मला यत्किंचितहि शंका नाहीं.

पुन्हां एकदां मी माझ्या बाबांची प्रार्थना करतों,

असतो मा सद्गमय ।
तमसो मा ज्योतिर्गमय ।
मृत्यो अमृतं गमय ॥
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः

REFBK-0011638

समाप्त

# कृतज्ञता

श्रीबाबांच्या कृपेनें आयुष्याच्या शेवटच्या कालखंडांत प्रवेश करीत असतांना मला थोरांचे आशीर्वाद लाभले आहेत हें माझें सद्‌भाग्यच होय. हा कालावधि किती दीर्घ किंवा अल्प असूं शकेल याची मला अर्थातच कल्पना नाहीं. पण यापुढें हातून कांहींतरी चांगलें घडावे अशी तळमळ लागली आहे आणि त्यांतूनच हें चरित्र निर्माण झाले आहे.

या छोट्या ग्रंथासाठीं ज्यांचें मला सहाय्य झाले आहे, त्यांच्या विषयींची कृतज्ञता व्यक्त करणे हें माझे कर्तव्य ठरते. सुरवातीलाच मला श्रीबाबांचे सद्‌शिष्य स्वामी मुक्तानंदजी यांना कृतज्ञतेनें प्रणाम केला पाहिजे, कारण त्यांच्या आशीर्वादानेंच मी हें संक्षिप्त चरित्र लिहूं शकलो आहे.

आपल्या महाराष्ट्र-राज्याचे राज्यपाल श्री. श्रीप्रकाश यांनीं आपलीं हजार कामें बाजूला ठेवून माझ्या विनंतीनुसार या ग्रंथाला प्रस्तावना लिहिली त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

महाराष्ट्र-राज्य-विधानसभेचे अध्यक्ष नामदार स. ल. सिलम यांनीहि अत्यंत आपुलकीनें या ग्रंथाचा पुरस्कार केला आहे त्याबद्दल त्यांना जितके धन्यवाद द्यावे तितके थोडेच होतील.

ज्यांनीं दिलेल्या माहितीमुळें मी हें चरित्र अल्पावधीत लिहूं शकलो त्या सर्वांचेंच मी आभार मानतो. पण त्यांतल्या त्यांत श्रीबाबांचे भक्त, सर्वश्री शंकरराव कर्नाड, बाबूराव खाडे, रामकृष्ण शेणाय, अनंतराव जोथाडी, व. गो. निगुडकर, अॅड. दि. मु. परुळेकर, हरीभाऊ तांबे, बांगो गोमा पाटील, चिमणलाल वाडीलाल शहा आणि श्री. हडकर यांचा खास नामनिर्देश करणे हें मी माझे कर्तव्य समजतो.

ज्यांनी पुरविलेल्या खास छायाचित्रांमुळें या चरित्रग्रंथाची शोभा वाढली ते माझे मित्र श्री. करुणाकर एन्. शेट्टी यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

त्यानंतर ज्यांनीं स्वतःचेच काम समजून मोठ्या प्रेमानें आणि आपुलकीनें मला मदत केली त्या न्यू भारत प्रिंटिंग प्रेसच्या सर्व कामगार बंधूंचे विशेषतः

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत २
अनुक्रम ३८९०२ दि. ५।८।७५
(१२८)
क्रमांक २२५१ ३८९-५५

श्री. गणेशराव देसाई, श्री. पाटील, श्री. कानेटकर, मामा सावंत इत्यादींचे मी आभार मानतो. हें चरित्र इतके सुंदर स्वरूपात प्रसिद्ध करण्याचे सारें श्रेय त्यांचेंच आहे.

आणखी दोघां तरुणांबद्दल कृतज्ञता व्यक्त केल्याशिवाय हे आभार प्रदर्शनाचें कार्य पूर्ण होणार नाहीं. केवळ या दोघांच्या मदतीमुळेंच मला हें चरित्र इतक्या अल्पावधीत वाचकांच्या हातीं देता आले आहे. त्यांतील एक श्री. वसंतराव पांडुरंगराव भोगले हे होत आणि दुसरे न्यू भारत प्रिंटिंग प्रेसचे मालक श्री. चिंतामणराव रघुनाथराव देसाई, या दोघांचाहि मी अत्यंत ऋणी आहे. त्यांच्या सर्व मनोकामना पूर्ण व्हाव्यात अशी श्रीबाबांच्या चरणांजवळ माझी प्रार्थना आहे.

आणि वाचकांना माझी विनंती आहे कीं, त्यांना जर या लेखनात कांहीं दोष आढळले, किंवा बाबासंबंधीं कांहीं अधिक माहिती पुरवितां आली तर त्यांनीं माझ्याबरोबर पत्रव्यवहार करावा, या चरित्राची द्वितीयावृत्ति लवकरच निघेल अशी माझी खात्री आहे. शिवाय कांहीं इतर भाषांत हें चरित्र प्रसिद्ध करावयाचे आहे. त्यामुळें वाचकांनीं पुरविलेली माहिती उपयोगी पडेल.

शेवटी आपल्या या अज्ञ बालकावर सतत कृपादृष्टि असावी आणि त्याला अधिकाधिक सेवा करण्याची शक्ति प्राप्त व्हावी अशी श्रीबाबांची प्रार्थना करून मी येथेंच थांबतो.

—बाबूराव अर्नाळकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २२५१